15-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SMT/ 12:00

15-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SMT/ KGS/ 12:00

**<u>सभापतीस्थानी</u> <u>माननीय उपसभापती</u>**

**<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत</u>**

**उपसभापती** : आज माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व डॉ. नीलम गोऱ्हे यांनी लातूर येथील शिरुर अनंतपाळ येथील पोलिसांनी वारकऱ्यांवर केलेल्या अमानुष अत्याचारा विरुध्द दाद मागण्यासाठी गेलेल्या वारकऱ्यांवर पोलिसांनी पुन्हा वेगवेगळया प्रकारे मानसिक व शारीरिक अत्याचार करणे तसेच पाच वारकऱ्यांवर ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करुन त्यांना पोलीस कोठडीत डांबणे" या विषयावर नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. सदर सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्र आज चारही बाजूने पंढरीच्या वारींनी दुमदुमत आहे. माऊलीची वारी निघालेली आहे. तुकोबांची वारी निघालेली आहे. महाराष्ट्रातील गावागावातून पंढरीची ओढ घेत अनेक वाऱ्या निघालेल्या आहेत. अशीच एक वारी लातूरमधून निघत असताना काही गावकऱ्यांनी त्यांना गुंडगिरी करुन रोकण्याचा प्रयत्न केला. म्हणून ते पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवावयास गेले असता पोलिसांनी या वारकऱ्यांना बूट चाटायला लावले ही गंभीर बाब आहे. सभापती महोदय, आपण ही सूचना नाकारलेली आहे. माझे म्हणणे असे आहे की, आपण ही सूचना जशी नाकारलेली आहे तसे मुख्यमंत्र्यांनी आणि उप मुख्यमंत्र्यांनी त्या पांडुरंगाच्या अभिषेकाला जाता कामा नये आणि हे ढोंगही करता कामा नये. वारकऱ्यांना न्याय देण्याकरिता या विधिमंडळामध्ये जर परवानगी नाकारली जात असेल आणि त्यांचा एवढा अवमान होणार असेल तर मग सरकारने हे ढोंग करु नये. सरकार या संदर्भामध्ये काही निवेदन करणार नसेल, बोलणार नसेल तर पोलिसांनी या वारकऱ्यांना बूट चाटायला लावणे ही साधी गोष्ट आहे काय? वारकरी सोडा पण इतर कुठल्याही बाबतीत कोणीही तक्रार नोंदवायला गेला तर पोलिसांनी बूट चाटायला लावणे ही गंभीर बाब आहे. या महाराष्ट्रामध्ये एवढे पोलीस मातले आहेत काय? सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. संपूर्ण महाराष्ट्र पंढरीच्या वारीने दुमदुमत असताना वारकऱ्यांवर ही पाळी आली असताना या सदनामध्ये त्यांच्या संदर्भात चर्चा करण्याकरिता परवानगी नाकारली जाते म्हणजे या विधिमंडळाच्या माध्यमातून कोणाच्या बाजूने कौल दिला जात आहे हे आम्हाला कळेनासे झालेले आहे. सभापती महोदय, आपण चर्चेला परवानगी नाकारली आहे. प्रथा,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

परंपरेनुसार आम्हाला आपल्या आदेशाच्यापुढे जाता येत नाही. आता नवीन प्रथा पडत चाललेली आहे. सभापतींनी आमच्यावर सुप्रिम कोर्टासारखे कोणतेही आदेश थोपवावेत आणि आम्ही गप्प बसावे. माननीय सभापतींपुढे बोलायचे नाही. सभापती महोदय, या सदनामध्ये एकही अपशब्द न बोलता सुध्दा माननीय सभापती सभागृहाच्या रेकॉर्डवरुन ते काढून टाकतात, ही नवीन मनमानी प्रथा सुरु झालेली आहे. या सदनामध्ये सभापतीपद हे सर्वोच्च पद सर्वांना न्याय देण्याकरिता आहे. हुकूमशाही चालविण्या करिता नाही. परंतु तो आपला अधिकार आहे. आम्ही त्याबद्दल काहीच बोलणार नाही.आपला अधिकार आहे तो आम्हाला मंजूर आहे. वारकऱ्यांना पोलीस बूट चाटायला लावणार असतील तर या सदनाच्या माध्यमातून किमान त्याची चौकशी करतो एवढे तरी शासनाने सांगावयास पाहिजे होते. पण सभापती महोदय, आपण परवानगीच नाकारल्यामुळे हा विषयच संपतो. अशा पध्दतीने वारकऱ्यांचा अवमान होणार असेल तर पंढरीच्या पांडुरंगाला अभिषेक करण्याचे आणि गळयात तुळशीमाळा घालून मिरवण्याचे काम या राज्याच्या प्रमुखांनी करु नये अशा प्रकारची सभापती महोदय, आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सुध्दा आज सकाळीच ती बातमी वाचलेली आहे. महाराष्ट्रात लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने जात असतात. त्या संदर्भात वेळोवेळी मी सुध्दा मिटिंग घेतलेल्या आहेत. पोलिसांचा अनुभव असा आहे की, वारीमध्ये इतके लोक असताना कमीत कमी बंदोबस्तामध्ये संपूर्ण देशात कुठला धार्मिक कार्यक्रम जर पार पाडला जात असेल तर तो हा वारीचा कार्यक्रम आहे. त्या वारीबरोबर चालणारे पोलीस सुध्दा कधी लाठया-काठयांचा वापर करीत नाहीत. माऊली-माऊली असे म्हणत वारकऱ्यांकडून सहकार्य मागत असतात. आणि वारकऱ्यांकडून पोलिसांना योग्य पध्दतीचे सहकार्य नेहमी दिले जाते.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ......

आपण सांगितलेली घटना जर खरी असेल तर ती निश्चित गंभीर बाब आहे. केवळ वारकऱ्यांच्याच संदर्भात नव्हे तर आपली फिर्याद देण्यासाठी पालीस स्टेशनला कोणीही गेला तरी सुध्दा पोलिसांनी त्यांना सन्मानाची वागणूक दिली पाहिजे अशा शासनाच्या सूचना आहेत. त्या वारकऱ्यांना जो अनुभव आला असेल त्याबाबत मी इतकेच सांगतो की, तीन दिवसांच्या आत आय.जी.कडून आम्ही याचा रिपोर्ट मागवू आणि त्यामध्ये थोडे जरी तथ्य असेल तर असे अधिकारी आम्ही नोकरीत ठेवणार नाही या गोष्टीची मी सदनाला ग्वाही देतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सहवेदना दाखवली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु आपल्याकडून सहवेदनेची अपेक्षा होती. याबाबतीत चर्चा नको हे मला मान्य आहे पण माननीय सभापतींनी आपल्या नेतृत्वाखाली किंवा आपल्या विचाराने माननीय गृह मंत्र्यांना याची तातडीने चौकशी करण्याचे आदेश द्यावेत यासाठी आम्ही चर्चेला अनुमती मागत होतो. वारकऱ्यांचा सन्मान करावा हे अपेक्षित होते पण तो झाला नाही त्याबद्दल खंत व्यक्त करतो. शासनाने जी सहवेदना दाखवली त्याबद्दल माननीय गृह मंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो. तसेच मी प्रमुखांच्या बाबतीत त्यांनी पूजा वगैरे करु नका असे जे बोललो त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करुन माघार घेतो.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु. शी.** : तोंडी उत्तरे

**उंच इमारतींना परवानगी देण्यासंदर्भात समिती सदस्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक**

**(१) * ७४६६ श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंच इमारतींना परवानगी देण्यासंदर्भात समिती सदस्य श्री.शैलेश माहिमतुरा यांना इमारतीच्या परवानगीसाठी ३० लाख रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व या प्रकरणी संबंधितांविरुद्ध काय कारवाई केली आहे,

(३) अद्याप चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील (एफ.एस.आय.) चटईक्षेत्र निर्देशांक निश्चित करण्यासाठी नेमलेल्या समितीमध्ये ज्येष्ठ वास्तूरचनाकार श्री.शैलेश माहिमतुरा व त्यांच्या दोन साथीदारांना रुपये १५,००,०००/- लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १७/०५/२०१० रोजी अटक केली आहे.

(२) व (३) आरोपी श्री.शैलेश माहिमतुरा व त्यांच्या दोन साथीदारांविरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक २७/२०१० दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपी श्री.शैलेश माहिमतुरा यांची उंच इमारतीच्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी नेमलेल्या तांत्रिक समितीमधील सभासद पदी केलेली नियुक्ती तसेच हेरिटेज कन्झर्वेशन कमिटीवरील नियुक्ती रद्द करण्यात आलेली आहे व गुन्ह्याचा तपास चालू आहे.

सभापती महोदय, सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये मला आपल्या अनुमतीने थोडी सुधारणा करावयाची आहे. प्रश्न क्रमांक 1 च्या उत्तरामध्ये "मुंबईतील (एफ.एस.आय.) चटईक्षेत्र निर्देशांक निश्चित करण्यासाठी" असे म्हटले आहे त्याऐवजी "मुंबईतील उंच इमारतीच्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी" असे वाचावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मूळ प्रश्न आम्ही नगरविकास खात्याच्या अंतर्गत दिला होता. हा प्रश्न गृह खात्याकडे कसा आला हे माहीत नाही. आता गृह खात्याकडे प्रश्न आला असला तरी आम्ही प्रश्न विचारतो. नंतर नगरविकासच्या बाबतीत काही आले तर बघू. सभापती महोदय, हायराईज समिती ही मोठे भ्रष्टाचाराचे कुरण झालेली आहे. त्यामुळे त्याबाबतच्या काही तक्रारी शासनाकडे उपलब्ध आहेत काय ? अशा प्रकारच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे शासन

..3...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

याबाबतीत उच्च स्तरीय चौकशी नेमणार आहे काय ? ती चौकशी नेमल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी भ्रष्टाचार झाल्याचे आढळून येईल ती प्रकरणे थांबविणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात ती गोष्ट खरी आहे की, यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धाड टाकल्यामुळे गृह खात्याकडे हा प्रश्न आलेला आहे. अन्यथा हा नगरविकास विभागाचा प्रश्न आहे. तरी सुध्दा एक स्पष्ट झालेली आहे की, अशी परवानगी देत असताना या प्रकरणात कोठे तरी लाच खाल्लेली आहे आणि लाच खाताना एक अधिकारी सापडलेला आहे. तो त्या समितीचा सदस्य आहे. नगरविकास विभागाकडे अशा पध्दतीच्या काही तक्रारी आहेत काय हे बघितले जाईल. जर अशा प्रकारच्या तक्रारी असतील तर एक सेल निर्माण करुन त्या सगळ्या तक्रारींची छाननी करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गेल्या पाच वर्षामध्ये अशा प्रकारच्या ज्या परवानग्या दिल्या असतील त्याची चौकशी करुन त्यामध्ये उंच इमारतींच्या बाबतीत जी काही लपवाछपवी झाली असेल त्याची चौकशी करणार काय ? जशी ही समिती आहे तशीच पुरातन वास्तू म्हणजे हॅरिटेज समिती आहे. त्या समितीकडून एन.ओ.सी. च्या बाबतीत अडविले जाते आणि नंतर एन.ओ.सी. दिली जाते. ठराविक पैसे घेतले जातात. आपले काही जुने निवृत्त अधिकारी त्या समितीवर आहेत. त्यांचीही अशा प्रकारे चौकशी करणार काय हा एक विषय आहे. कारण त्या ठिकाणी सर्रास पैसे दिले की एन.ओ.सी. मिळते. पैसे दिले नाही तर एन.ओ.सी. मिळत नाही. महापौर बंगला ही पुरातन वास्तू आहे आणि त्या वास्तूपासून 200 यार्डामधील कोणत्याही इमारतीला परवानगी द्यावयाची नाही असे आहे. या महाराष्ट्रामध्ये यासंदर्भात देवाणघेवाण हा एक नवीन विषय महाराष्ट्रात सुरु झालेला आहे. म्हणून जशी ही समिती आहे तशीच पुरातन वास्तू समिती ही अत्यंत उच्च दर्जाची समिती आहे. त्यावर जे सदस्य आहेत त्यांची नावे घेतली तर कारवाई करु शकतो की नाही अशी परिस्थिती आहे. म्हणून मी त्यांची नावे रेकॉर्डवर घेत नाही. याही बाबतीत चौकशी करणार काय ? तसेच सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे गेल्या पाच वर्षाची चौकशी करणार काय ?

...4..

RDB/ KGS/ MMP/

ता. प्र. क्र. 7466....

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे. तरी सुध्दा नगरविकास विभागाला तशा सूचना देण्यात येतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी व्यापक प्रश्न विचारला. श्री. शैलेश माहिमतुरा यांनी ज्या ज्या परवानग्या दिलेल्या आहेत त्याची शासन खास चौकशी करणार काय ? त्या परवानग्यांबाबत उच्चस्तरीय कमिटी नमून त्याची चौकशी करणार काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7466....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट स्पष्ट आहे की, श्री.माहिमतुरा यांना पैसे घेताना पकडले आहे. त्यामुळे त्यांची नेमणूक झाल्यापासून जेवढया परवानग्या दिल्या आहेत त्याची ॲण्टी करप्शन ब्युरोमार्फत चौकशी करण्यात येईल.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील भूमिपुत्रांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यासाठी शासनाने नेमलेला अभ्यास गट**

**(२) * ६८४२ डॉ.दीपक सावंत , श्री.रामदास कदम , श्री.किरण पावसकर , श्री.परशुराम उपरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ६६४० ला दिनांक २० एप्रिल, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **रोजगार व स्वयंरोजगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढती बेरोजगारांची संख्या लक्षात घेता भूमिपुत्रांना न्याय मिळावा म्हणून राज्य शासनाने २००७ साली अप्पर मुख्य सचिव याचे अध्यक्षतेखाली अभ्यासगट नेमला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासगटाने आपला अहवाल दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या शिफारशीचे स्वरुप काय आहे त्या शिफारशीनुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा :** (१) होय.

(२) होय.

(३) शासनाने सदर अहवाल अद्याप स्विकारण्याचा निर्णय घेतलेला नाही. मात्र सदर अहवालातील शिफारशींबाबत संबंधित विभागाकडून अनुपालन अहवाल मागविण्यात आला असून त्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने या प्रश्नाच्या भाग तीन मधील दुस-या ओळीमध्ये "अनुपालन अहवाल मागविण्यात" याऐवजी "अभिप्राय मागविण्यात" अशी दुरुस्ती करु इच्छितो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यातील भूमिपुत्रांना नोक-यांमध्ये प्राधान्य देण्यासाठी शासनाने अभ्यास गट नेमलेला आहे. यासंबंधीचा हा प्रश्न आहे. माझ्याकडे उद्योग विभागाचा एक जी.आर.आहे. या जी.आर.मध्ये 1968 सालापासून 2008 पर्यंत या जी.आर.मध्ये वेगवेगळया सुधारणा करण्यात आल्या आहेत. या जी.आर.मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, पर्यवेक्षक श्रेणीत 50 टक्के व इतर श्रेणीत 80 टक्के कर्मचा-यांची नियुक्ती करावी. नोक-यांमध्ये भरती करताना उमेदवार मराठी भाषा जाणणारा असावा. तसेच या जी.आर.मध्ये कमिटी नेमल्याचे नमूद केलेले आहे. विकास आयुक्त, उद्योग संचालनालय या कमिटीत आहेत. अशाप्रकारची कमिटी असताना व जी.आर.असताना शासनाने पुन्हा अभ्यास गट नेमण्याचे कारण काय ? रोजगार व स्वयंरोजगार खात्यामध्ये नोंदणी झालेल्या बेरोजगारांची संख्या किती आहे, आजपर्यंत किती बेरोजगारांना सेवायोजन कार्यालयाकडून रोजगार दिला आहे ?

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6842.....

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, 2007 सालच्या पावसाळी अधिवेशनामध्ये तत्कालीन विधानपरिषद सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी ठराव क्र.22 मांडला होता. त्यावेळी तत्कालीन रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री यांनी चर्चेअंती अभ्यास गट नेमण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार दिनांक 22.11.2007 रोजी एक जी.आर.काढला आणि एक अभ्यास गट नेमण्यात आला. पुढे प्रधान सचिव, रोजगार व स्वयंरोजगार यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट पुनर्गठित करण्यात आला. या अभ्यास गटाच्या 2008 साली 3 बैठका झाल्या होत्या. त्यानंतर दिनांक 31.12.2008 रोजी या अभ्यास गटाने शासनाला शिफारशी सादर केल्या होत्या. या अभ्यास गटाने वेगवेगळया 24 मुद्यांवर आपले मत प्रदर्शित करुन सूचना केल्या होत्या. या सूचना विविध खात्यांकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आल्या होत्या. सभापती महोदय, या क्षणापर्यंत रोजगार स्वयंरोजगार विभागाकडे 28 लाख 72 हजार उमेदवारांची नोंद झालेली आहे.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी प्रश्न विचारत आहे. सेवायोजन कार्यालयाकडून भरती केली पाहिजे असा आपला नियम आहे. परंतु अनेक उद्योजक सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवार मागवून त्यांच्या मुलाखती न घेता सरळ नोकर भरती करीत आहेत त्याच्यावर शासनाचा काही अंकुश आहे काय, किंवा शासनाने त्याबाबत काही उपाययोजना केली आहे काय ? 28 लाख 72 हजार बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे आणि त्यांना किती अवधीत रोजगार दिला जाणार आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी सांगितले की 28 लाख 72 उमेदवार नोंदणीकृत झ ालेले आहेत. याचा अर्थ ते सर्व बेरोजगार आहेत असे म्हणता येणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6842 (श्री. राजेंद्र दर्डा...

10वी झाल्यानंतर व्यक्ती आपले नाव सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदवू शकते. त्यानंतर एखाद्या ठिकाणी नोकरीला लागल्यानंतर ती आपले नाव रद्द करीत नाही. नियमा प्रमाणे 3 वर्षांनी पुनर्नोंदणी केली नाही तर नाव आपोआप काढून टाकण्यात येते. त्यामुळे हे सर्व बेरोजगार आहेत असे म्हणता येणार नाही.

श्री. रामदास कदम : मग माननीय मंत्री महोदयांच्या दृष्टीने जे बेरोजगार आहेत त्यांना रोजगार देण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे ? तसेच या बेरोजगारांना किती अवधित रोजगार उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ? जे उद्योजक परस्पर परप्रांतीयांना नोक-या देतात त्यांच्या बाबतीत शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. रोजगार व स्वयंरोजगार विभाग या बाबतीत काय करीत आहे हे मला सांगितले पाहिजे. रोजगार आणि स्वयंरोजार विभागाच्या संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण झालेले आहे. मागील वर्षी 1 लाख रिक्त जागांसाठी 8 लाख 16 हजार उमेदवाराची नावे विविध उद्योजक आणि संस्थांकडे पाठविली होती. 134 रोजगार मेळावे घेतले होते.

श्री. दिवाकर रावते : 1 लाख जागांसाठी 8लाख 16 हजार उमेदवारांची नावे पाठविली त्यांचे काय झाले ? किती जणांना नोक-या उपलब्ध झाल्या ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी असा प्रश्न विचारलेला आहे की माननीय मंत्री महोदयांच्या दृष्टीने बेरोजगारांची संख्या किती आहे ? मेळावे किती घेतले आणि त्यामध्ये किती लोक आले असा प्रश्न मी विचारलेला नाही. 28 लाख 72हजार बेरोजगारांना नोक-या देण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे ? या बेरोजगारांना शासन किती अवधीत रोजगार उपलब्ध करुन देणार आहे ? जे उद्योजक स्थानिक मराठी माणसाला नोक-या न देता परस्पर परप्रांतीयांना नोक-या देतात. त्यांच्या बाबतीत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6842

श्री. राजेंद्र दर्डा : उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाच्या माध्यमातून विविध माहिती संकलित करण्यात आलेली आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम अशा 1 लाख 59 हजार 705 उद्योगांचा सर्व्हे केलेला आहे. त्यामध्ये स्थानिक उमेदवारांची टक्केवारी 89 टक्के आहे.

श्री. दिवाकर रावते : स्थानिकांना म्हणजे मराठी उमेदवारांना नोक-या दिलेल्या आहेत काय ?

श्री. रामदास कदम : गुजराथी, हिंदी आणि मराठी जाणणारा तो स्थानिक अशी स्थानिकांची व्याख्या आहे काय ?

...नंतर श्री. भोगले....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6842....... श्री.रामदास कदम......

सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थानिकांबद्दल जी घोषणा केली आहे ती चुकीची आहे. हिंदी, गुजराथी हे स्थानिक होऊ शकत नाहीत.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, स्थानिकाची जी व्याख्या आहे त्यानुसार 15 वर्षे महाराष्ट्रात वास्तव्य असणे आवश्यक आहे. त्या पध्दतीने सर्वेक्षण झाले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शासनाच्या जी.आर.मध्ये काय म्हटले आहे? मराठी जाणणारा जो आहे तो स्थानिक असे जी.आर.मध्ये म्हटलेले आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची जी भावना आहे त्या भावनेशी मी सहमत आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या व्यक्तीला मराठी भाषा बोलता आली पाहिजे. जो स्थानिक आहे त्याला मराठी भाषा अवगत असणे आवश्यक आहे. अभ्यास गटाने अहवाल दिला आहे. त्या अहवालामध्ये अभ्यास गटाने नोकरी देत असताना मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे अशा पध्दतीची सूचना केलेली आहे. सन्माननीय सदस्यांचे मत आणि माझे मत वेगळे नाही. महाराष्ट्रात रहायचे असेल तर मराठी भाषा अवगत असणे आवश्यक आहे. नोकरी देण्याच्या संदर्भात काही नियम केलेले आहेत. नोकर भरती करीत असताना सुपरवायझरी केडर असेल तर 50 टक्के परंतु नोकर भरती करीत असताना एकूण 80 टक्के स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले पाहिजे अशा प्रकारचा निर्णय आहे. त्यानुसार स्थानिक लोकांना महाराष्ट्रात नोकरी मिळते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. जे उद्योजक परस्पर परप्रांतीय उमेदवारांची भरती करतात त्याबद्दल शासनाची भूमिका काय आहे? जे बेराजगार उमेदवार आहेत त्यांना रोजगार देण्यासाठी शासनाचे धोरण काय आहे? किती दिवसात त्यांना रोजगार दिला जाणार आहे?

श्री.राजेंद्र दर्डा : पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी यापूर्वीच दिलेले आहे. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी देत आहे. माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, जे 28 लाख नोंदणीकृत बेरोजगार आहेत त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे? किती अवधीत त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला जाणार आहे? जे उद्योजक सेवायोजन कार्यालयामार्फत नोकर भरती न करता परस्पर परप्रांतीय उमेदवारांची भरती करतात त्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6842........

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, नोकर भरती करीत असताना रिक्त पदांची जी माहिती प्राप्त होते त्याबाबत दोन पध्दतीने नोकर भरती केली जाते. एक म्हणजे सेवायोजन कार्यालयात जे नोंदणीकृत उमेदवार आहेत त्यांची नावे संबंधित आस्थापनेला कळविण्यात येतात. त्याचबरोबर न्यायालयाचा निर्णय आहे त्यानुसार सरळ सेवेने नोकर भरती केली जाते. सेवायोजन कार्यालयाकडे 28 ते 29 लाख सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांची नोंदणी झ ाालेली आहे. त्यातील पात्र उमेदवारांची नावे संबंधित आस्थापनेला कळविली जातात.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6842...... श्री. राजेंद्र दर्डा ......

त्याचबरोबर जाहिरातीच्या माध्यमातून सरळ सेवा पध्दतीने भरती करुन लोक येतात आणि दुसऱ्या बाजूला जी यादी आपण पाठवितो त्यातूनही भरती केली जाते. अशा प्रकारे आमच्याकडून गेलेल्या संपूर्ण यादीला अतिशय चांगला रिस्पॉन्स मिळतो हे मला सभागृहाला आनंदाने सांगावेसे वाटते.

श्री. भाई जगताप : महोदय, या सर्व वादामध्ये मूळ प्रश्न बाजूलाच राहतो. मूळ प्रश्न असा आहे की, बेरोजगारांची जेवढी यादी आहे त्यातील किती लोकांना रोजगार मिळाला आहे ? त्यामुळे राज्याच्याच नव्हे तर देशातील विविध राज्यातील जे निकष आहेत त्यानुसार 80 टक्के अकुशल आणि 50 टक्के कुशल हा क्रायटेरिया असून आपण सांगितल्यानुसार या 89 टक्के लोकांमध्ये तो पूर्णत: भरलेला आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, झालेल्या सर्व्हेक्षणानुसार 80 टक्के आणि 50 टक्के हे अकुशल व कुशलचे स्थानिक लोकांचे प्रमाण आहे त्याचे पूर्णत: पालन करण्यात येते. त्यात कोठेही फरक नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना 30 डिसेंबर, 2008 रोजी शासनाला यासंबंधीचा अहवाल सादर केला असे सांगितले आहे. प्रश्न विचारण्याचा उद्देश असाच असतो की, अहवालातील चांगल्या शिफारशींचा पाठपुरावा करावा आणि ज्या वाईट असतील त्यांना विरोध करावा. परंतु त्याचे उत्तर येथे दिलेलेच नाही. तसेच हा अहवाल स्वीकारण्याचा निर्णय अद्याप शासनाने घेतला नाही. माझा प्रश्न असा आहे की, यासंबंधीचा निर्णय शासन घेईल तेव्हा घेऊ दे पण माहितीच्या आधारे या अहवालात किती शिफारशी चांगल्या आहेत व त्या मंत्री महोदयांनी सुध्दा बोलून दाखविल्या. मग या अशा कोणत्या शिफारशी आहेत की, त्या अनुषंगाने प्रश्न विचारलेला असूनही त्याला उत्तर दिलेले नाही. हे उत्तर न देण्याचे कारण काय आहे ? त्या शिफारशी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील काय ?

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6842......

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत पॉइंटेड प्रश्न विचारलेला आहे. या अभ्यास गटाच्या महत्वपूर्ण शिफारशी म्हणजे "सध्याच्या शिक्षण पध्दतीत बदल होऊन रोजगाराभिमूख शिक्षण पध्दती असावी" ही अत्यंत महत्वाची सूचना आहे. त्यानंतर दुसरी म्हणजे "नोकरी देताना मराठीचे ज्ञान आवश्यक आहे "नोकर भरती करताना 80 टक्के स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे. "हाऊसिंग सोसायटी, बँक किंवा इतर कार्यालयांच्या ठिकाणी सुरक्षारक्षक हे स्थानिक असावेत. "रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या वेबसाईटवर बेरोजगार आणि स्वयंरोजगारांची अद्ययावत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी" ही सुध्दा महत्वाची सूचना आहे. तसेच "सक्तीने रिक्त पदे भरण्याच्या सक्तीचे पालन न केल्यास जो 500 रुपये दंड आकारला जातो त्यात भरीव वाढ करावी". शेवटी रोजगार आणि स्वयंरोजगार कार्यालयांचे सक्षमीकरण करणे, त्यांना आवश्यक असलेले कर्मचारी, अधिकारी पुरविणे आणि जागा रिक्त न ठेवणे, वाहन व्यवस्था आणि कार्यालयासाठी जागा मिळणे" अशा या महत्वपूर्ण शिफारशी केलेल्या आहेत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 6842....**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी मूळ प्रश्नाला उत्तरच दिलेले नाही.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मूळ प्रश्न काय विचारलेला आहे तो प्रथम सन्माननीय सदस्यांनी वाचून घ्यावा. या ठिकाणी सन्माननीय सदस्य मूळ प्रश्नाच्या कार्यकक्षेच्या बाहेर जाऊन प्रश्न विचारीत आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आम्ही ज्या पोटतिडकीने प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाला मंत्रीमहोदयांनी उत्तर न दिल्यामुळे आम्ही सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत बर्हिगमन करतात. )

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संबंधित विभागाची परवानगी घेतल्याशिवाय अतिमहत्वाच्या घटनेविषयीची माहिती परस्पर मिडीयाला देऊ नये असे दिलेले आदेश**

**(3)* 7456 श्री. सुभाष चव्हाण, प्रा. सुरेश नवले, श्री. राजन तेली : सन्माननीय गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संबंधित विभागाची परवानगी घेतल्याशिवाय अतिमहत्वाच्या घटने विषयीची माहिती परस्पर प्रसारमाध्यमांना देऊ नये असे आदेश मा. गृह राज्य मंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

2) असल्यास, उक्त आदेश केव्हा देण्यात आले आहेत,

3) तसेच प्रसार माध्यमांना सदर आदेश देऊनही अतिमहत्वाच्या घटनेबाबत परस्पर माहिती देणाऱ्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आर.आर. पाटील** : (1) नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी अर्ध्यातासाची चर्चा सुध्दा मागितली होती. राज्यातील पोलीस खात्याकडे असलेली माहिती अत्यंत गोपनीय प्रकारची असते. गोपनीय माहिती मिडीयाच्या दडपणाखाली किंवा खाते अंतर्गत वैमनस्यामुळे किंवा अन्य प्रलोभनामुळे मिडीयाला दिली जाते. ही गोष्ट सामाजिक सुरक्षितता व एखाद्या राजकीय नेत्यालाही अत्यंत धोकादायक ठरु शकते. या गोष्टीमुळे समाजात अशांतता,दंगली सारख्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे गृहविभागाने या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते संपूर्ण चुकीचे आहे, बेजबाबदार आहे. राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी संबंधित विभागाची परवानगी घेतल्याशिवाय अतिमहत्वाच्या घटनेविषयीची माहिती परस्पर प्रसार माध्यमांना देऊ नये असे आदेश मा. गृह राज्यमंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय, असा मी प्रश्न विचारला होता परंतु या प्रश्नाला "नाह " असे उत्तर दिलेले आहे. यासंबंधीचे डॉक्युमेंटस् माझ्या हातात आहेत. दिनांक 14.12.2009 च्या पावसाळी अधिवेशनात गृह राज्यमंत्री माननीय श्री. नितीन राऊत यांनी उत्तर दिलेले आहे की,..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न पुकारल्यानंतर या प्रश्नाच्या संदर्भात अगोदर माहिती सांगण्यासाठी मी हात वर केला होता परंतु विरोधी पक्षाने घोषणा देऊन बर्हिगमन केले त्या आवाजात मला उत्तर दुरुस्त करण्याची संधी मिळाली नाही. मागील अधिवेशनात गृह राज्यमंत्र्यांनी अशा प्रकारचे आदेश दिलेले नाहीत तरी सुध्दा केंद्र शासनाच्या निर्देशाच्या आधारे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी परिपत्रक दिनांक 3 नोव्हेंबर, 2009 तसेच दिनांक 9 मार्च, 2010 अन्वये पोलीस अधिका-यांनी प्रसार माध्यमांना गुन्हया बाबतची माहिती देतांना घ्यावयाच्या खबरदारीच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेवर बोलत असतांना माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी अतिशय पोटतिडकीने भाषण केले आहे ते भाषण मी आपल्याला वाचून दाखवतो. त्यांनी असे म्हटले होते की, "एखादा अधिकारी आपण शासकीय सेवेत आहोत, पोलीस वर्दीत आहोत, याचे भान न ठेवता पुढा-यांपेक्षा अधिक तावा-तावाने जर मिडियाशी बोलत असेल, वर्तमानपत्रांना जर मुलाखती देत असेल आणि सेवेचे उल्लंघन करीत असेल तर, मी आतापर्यंत सहन केले पण सहनशक्तीला सुध्दा काही मर्यादा असतात. आता त्या सहन करण्याची भूमिका माझीही नाही आणि राज्य सरकारची असणार नाही. केवळ एका लिपिकाला निलंबित केले परंतु पोलीस अधिका-याचे काय, मी तर त्याहीपेक्षा पुढे जाऊन सांगू इच्छितो की, पोलीस अधिकारीच काय अतिमहत्वाची व्यक्ती, प्रधान सचिव आणि वरिष्ठ पोलीस अधिका-यावर सुध्दा कारवाई केली जाईल." त्यामुळे मी माननीय गृह मंत्र्यांना एक उपप्रश्न विचारु इच्छितो की, या प्रश्नाचे ज्यांनी उत्तर दिलेले आहे ते गृह विभागाचे प्रधान सचिव आणि अतिरिक्त मुख्य सचिव यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? दुसरा माझा प्रश्न असा आहे की, सभागृहात यासंदर्भातील भाषण केल्यानंतर 8 महिने होऊन गेलेले असतांना सुध्दा त्यावर शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे यासंदर्भात आपण कारवाई करणार आहात काय ? यासंदर्भात आदेश पारित केले जाणार आहे काय ? मागच्या वेळेस एक अधिकारी यासंदर्भात गोत्यात आले होते, त्यामुळे माननीय गृहमंत्री कारवाई करणार आहे काय ?

प्रा. बी.टी.देशमुखः सभापती महोदय,तावातावाने मंत्री महोदयांनी बाहेर मुलाखत दिली असेल किंवा माननीय गृह मंत्र्यांनी तावातावाने सभागृहात उत्तर दिले असेल तर त्याच्यावरील प्रश्न सुध्दा तावातावानेच विचारला पाहिजे, असा काही नियम आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

BGO/ KGS/ जुन्नरे.. 12:35

ता.प्र.क्र.7456....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, पोटतिडकीने प्रश्न विचारण्याचा अधिकार फक्त विरोधी पक्षाच्या सदस्यांनाच आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, प्रश्न कसाही विचारला तरी शासन मात्र जबाबदारीनेच उत्तर देईल. केंद्र सरकारचे पत्रक दिनांक 3 नोव्हेंबर 2009 रोजी निघाले असून दिनांक 9 मार्च 2010 रोजी आम्ही पत्रक काढून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. कोणत्याही घटनेचा तपास पूर्ण झाल्याशिवाय प्रसिद्धी माध्यमांसमोर जाऊन पुढच्या तपासावर परिणाम करणारे कोणतेही वक्तव्य करू नये अशा प्रकारच्या सूचना दिल्या आहेत. सन्माननीय सदस्यांची काही तक्रार असेल तर त्यासंबंधी मी चौकशी करीन.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, जर्मन बेकरीच्याबाबत झालेला प्रकार सर्वांना ज्ञात आहे. सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. श्री.आर.आर.पाटील नेहमीप्रमाणे पोटतिडकीने बोलले होते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नेहमीप्रमाणे म्हणजे काय ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, पोटतिडकीने ते बोलतात त्याला सन्माननीय सदस्यांना आक्षेप आहे असे दिसते. तो असू नये. जर्मन बेकरी प्रकरणातील आरोपी पकडला गेला होता. त्यावेळी सर्व अधिकाऱ्यांनी आपण जणू काही ऑलिंपिकचे मेडल मिळविले आहे अशा अविर्भावामध्ये मोठा गाजावाजा करून मुलाखती दिलेल्या आहेत. तेव्हा ज्या ज्या अधिकाऱ्यांनी या परिपत्रकाचे उल्लंघन करून मुलाखती दिलेल्या आहेत त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जर्मन बेकरी प्रकरणात समद या आरोपीला पकडले असे पोलिसांनी किंवा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कधीही वक्तव्य केलेले नव्हते. समद या आरोपीला शस्त्रासंबंधी पोलिसांनी पकडले. त्याला बंगळूर येथून पोलीस पकडून आणले होते. प्रसार माध्यमांनी कयास बांधून बातमी दिली होती. तेव्हा राज्य शासनाच्या वतीने स्पष्ट केले होते की, जर्मन बेकरी प्रकरणासंबंधी समद याला अटक केलेली नाही. शस्त्र बाळगल्यासंबंधी अटक केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H 2

ता.प्र.क्र.7456....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सांगलीमध्ये पोलीस अधीक्षकांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले आहे. तेव्हा आपण पोलीस अधिकाऱ्यांना पाठिशी घालू नका. ही संवेदनशील बाब आहे. जबाबदार अधिकारी बेजबाबदार वागत असतील तर ते योग्य नाही. आपण गृह विभागाचे प्रमुख असताना सांगली जिल्ह्यामध्ये झालेल्या दंगलीसंबंधी जाहीररित्या पत्रकार परिषद घेऊन जी काही लक्तरे समोर आणली ती सर्वांना ज्ञात आहे. अशा अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जर्मन बेकरी प्रकरणासंबंधी समद याला अटक केली नव्हती. त्याच दिवशी शासनाने स्पष्ट केले होते. तथापि, प्रसार माध्यमातून कयास बांधला गेला आणि बातमी दिलेली आहे. सरकारने आपणहून खुलासा केला आहे. सांगली घटनेसंबंधी आम्ही खुलासा मागितला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, प्रसार माध्यमांसमोर जाण्यासाठी पोलिसांना प्रतिबंध करण्यात आला होता. असे असताना माननीय गृह राज्यमंत्र्यांच्या विरोधात आयुक्तांनी वक्तव्य केले आहे. त्यांच्या विरूद्ध शासन कोणती कारवाई करणार आहे ? माननीय राज्यमंत्री हे आमचे नेते आहेत. महाराष्ट्राचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या विरोधात पोलीस अधिकारी आरोप करण्याची हिंमत करीत असतील तर त्या अधिकाऱ्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, स्वत: पोलीस आयुक्तांनी वक्तव्य केले होते हे माझ्या निदर्शनास आलेले नाही. आपण आणून द्यावे. जर त्यांनी तसे केले असेल तर मी त्याची निश्चितपणाने चौकशी करीन.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मोठ्या प्रमाणावर आरोप झालेले आहेत. प्रेसमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर बातम्या आल्या आहेत. महाराष्ट्राभर याची चर्चा होती. यासंबंधी श्री.बागवे यांना नोटीस देखील देण्यात आली होती. एवढी मोठी केस कुठल्या दबावाखाली दाबण्यात येत आहे हे तरी आम्हाला कळू द्यावे. आम्हाला जर न्याय मिळत नसेल तर बोलायचे तरी कशासाठी ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, श्री.सत्यपाल सिंह यांना श्री.आर.आर.पाटील यांनी चांगले काम करतात म्हणून प्रशस्तीपत्र दिलेले आहे. तेव्हा त्यासंबंधी ठोस भूमिका असणे अपेक्षित आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7456...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री श्री.रमेश बागवे, पोलीस आयुक्त श्री.सत्यपाल सिंह आणि मी पुणे येथील एक कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र आलो होतो. त्यावेळी सन्माननीय राज्यमंत्री श्री.रमेश बागवे यांनी प्रथम श्री.सत्यपाल सिंह यांना प्रशस्तीपत्रक दिले त्यानंतर मी त्यांना प्रशस्तीपत्रक दिले... पुणे शहरातील लोकांनी सुध्दा त्यांना प्रशस्तीपत्रक दिले.

( विरोधी पक्षातील अनेक सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास सुरु आहे. एकाचवेळी चार-पाच सदस्य बोलू लागले तर माननीय मंत्रिमहोदय उत्तर कसे देऊ शकतील ? आता मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना प्रश्न विचारण्याची संधी देत आहे. त्यांच्यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी प्रश्न विचारतील.

श्री.जयत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी उपस्थित झालेली चर्चा गांभीर्याने घेतली जात नसल्याचे दिसून येत आहे. मी या प्रश्नाच्या बाबतीत गंभीर आहे. या सभागृहात सन्माननीय राज्यमंत्री श्री.रमेश बागवे यांनी डोळ्यात पाणी आणून त्यांची हकिकत सांगितली होती. त्यावेळी मी त्यांना पाठिंबा दिला होता. राज्यमंत्र्यांवर सरकारी अधिकाऱ्याने केलेले आरोप टी.व्ही.वर दाखविण्यात आले. ते रेकॉर्ड झालेले आहे. आता सरकारी अधिकाऱ्यांची मजल माननीय मंत्रिमहोदयांपर्यंत गेली आहे. हे कुठे तरी थांबविण्याची आवश्यकता आहे. माननीय राज्यमंत्र्याना पासपोर्ट देणार नाही असे राज्यातील आय.पी.एस. अधिकारी सांगतात. ही लोकशाही आहे की नोकरशाही आहे हे शासन जाहीर करेल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे की, या संदर्भात शासनाने दोन परिपत्रके काढून सरकारी अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. एखादा अधिकारी या सूचनांचे उल्लंघन करीत असेल तर त्याबाबत चौकशी करण्यात येईल. जर अधिकारी दोषी आढळला तर त्याच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7456...

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अतिशय पोटतिडकीने प्रश्न मांडलेला आहे. सरकारचे या संदर्भात नेमके काय धोरण आहे असा त्यांनी प्रश्न विचारला, परंतु त्यांच्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. माननीय राज्यमंत्री श्री.रमेश बागवे आणि आयुक्त श्री.सत्यपाल सिंह यांच्यात समेट झाला म्हणून महाराष्ट्रातील प्रश्न सुटले काय ? सांगलीचे एस.पी.सांगतात,किक मारल्यावर गोल होणार, त्याबाबतची माहिती आम्ही मागवावयाची काय ? राज्यातील आय.ए.एस.आाणि आय.पी.एस.अधिकाऱ्यांना वाटत असेल की शासन आम्ही चालवितो तर तो त्यांचा भ्रम आहे. अशा अधिकाऱ्यांवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे काय, असल्यास सांगलीच्या एस.पी.वर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सरकारने काढलेल्या परिपत्रकाच्या पुढे जाऊन एखाद्या अधिकाऱ्याने तपासाच्या संदर्भात काही वक्तव्य केल्यास त्यांच्याकडून खुलासा मागविला जातो. अनेकवेळा अधिकारी काही बोलत नाही, तरी सुध्दा वर्तमानपत्रात बातमी येते. असे आपल्या बाबतीत देखील घडले आहे. काही वेळा बातम्या लीक केल्या जातात. काही वेळा नाव न सांगण्याच्या अटीवर बातम्या दिल्या जातात. म्हणून आपणास शहानिशा करावी लागते. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे सरकारने काढलेल्या परिपत्रकाचे कोणी उल्लंघन केल्यास त्याबाबत चौकशी करुन चौकशीत दोषी आढळल्यास त्याच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, भारतीय सैन्यामध्ये एखादी बाब सांगावयाची असेल त्यासाठी त्यांचा एक अधिकृत प्रवक्ता नेमलेला असतो, त्याच्यामार्फतच माहिती देण्यात येते. पोलीस विभागात सुध्दा अशाप्रकारे अधिकृत प्रवक्ता नेमण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली बाब शासनाच्या अगोदरपासूनच विचाराधीन आहे. त्याबाबत निश्चितपणे लवकरात लवकर विचार करण्यात येईल.

----------

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुण्याच्या शिवाजीनगर न्यायालयाच्या आवारात ॲड. रेखा करंडे यांच्यावर झालेला खूनी हल्ला व राहूल नायर यांचा झालेला खून**

**(४) * ७६०५ डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.किरण पावसकर , डॉ.दीपक सावंत , श्रीमती वंदना चव्हाण :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याच्या शिवाजीनगर न्यायालयाच्या आवारात दिनांक ६ मे, २०१० रोजी वा त्यासुमारास ॲड. रेखा करंडे यांच्यावर खूनी हल्ला होऊन, श्री. राहूल नायर यांचा खून करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील :** (१) व (२) होय. तथापि दिनांक ०६/०५/२०१० रोजी शिवाजीनगर न्यायालयाच्या आवारात आपसातील पुर्व वैमनस्यातून दोन्ही गुन्हे घडले आहेत.

(३) दिनांक ०६/०५/२०१० रोजी शिवाजीनगर न्यायालयाच्या आवारात ॲड.रेखा करंडे यांच्यावर २० ते २५ इसमांनी हल्ला करुन त्यांना मारहाण केली व त्यांचे अंगावरील रु.१,३५,०००/- किंमतीचे सोन्याचे दागिने झटापटीत हिसकावून चोरुन नेले. याबाबत ॲड.रेखा करंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र.८८/२०१० भा.दं.वि.कलम ३९५, ३२३, १४३, १४७, १४८, १४९, ५०६ (२), आर्म ॲक्ट ३ (२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

दिनांक ०६/०५/२०१० रोजी शिवाजीनगर न्यायालयाच्या आवारात घडलेल्या दुसऱ्या घटनेत एकूण सात आरोपींनी मयत याच्यावर वार करुन त्यास ठार मारले. याबाबत फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक ८७/२०१०, भा.दं.वि.कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९, ५०६ (१), मु.पो.कायदा कलम ३७ (१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणी एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली असून इतर फरार आरोपींचा शोध सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

ता.प्र.क्र.7605....

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पुण्याच्या शिवाजीनगर न्यायालयाच्या अवारात महिला वकील ॲड. रेखा करंडे यांच्यावर खुनी हल्ला झाला त्याचबरोबर श्री राहूल नायर यांचा खून करण्यात आला होता. प्रत्यक्षात कोर्टाच्या आवारात सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत त्यामध्ये मेटल डिटेक्टर बसविण्यात आले आहेत. चार गेटवर स्टेनगन घेऊन पोलीस उभे असतात, चेक पॉईट असतात . त्याचप्रमाणे् पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्था उत्तम प्रकाराची आहे म्हणून पुण्याच्या पोलिसांना माननीय गृहमंत्र्यांनी वारंवार प्रशस्तिपत्रक दिलेले आहे. असे असतांना पुण्याच्या शिवाजी नगर न्यायालयाच्या आवारात ॲड रेखा करंडे यांच्यावर खुनी हल्ला झाला आहे. या संदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. कुमार दांगट यांचा अगोदर खून झाला होता आणि ॲड रेखा करंडे ही त्यांची बहिण आहे. या खून प्रकरणात आपली बाजू मांडण्यासाठी ही सर्व मंडळी कोर्टात तारखेसाठी आलेली असतांना कुमार दांगट यांची बहिण ॲड रेखा करंडे यांच्यावर तेथेच हल्ला

झाला होता त्याचबरोबर पंधरा वीस जणांनी मिळून श्री.राहूल नायर यांचा खून केला होता दुर्देवाने त्याला आंतरधर्मीय सबंधाचा सुध्दा ॲगल आहे. "ऑनर किलीग" सारख्या विषयाशी हा ॲगल संबंधित आहे. शासनातर्फे वारंवार असे सांगण्यात येते की व्हिडिओ कॉन्फरसिंगव्दारे कोर्टातील कामकाज करण्यात येणार आहे असे असतांना या प्रकरणामध्ये व्हिडिओ कॉन्फरसिंगव्दारे कामकाज करण्याची उपाययोजना का करण्यात आली नाही ? त्या ठिकाणी पंधरा ते वीस जण शस्त्र घेऊन आले होते तेव्हा त्यासदर्भात योग्य ती प्रतिबंधात्मक दक्षता का घे्ण्यात आली नाही. ? पुण्याचे शहर पोलीस उपायुक्त श्री.सोनवणे यांनी पत्रकार परिषद घेऊन हे सांगितले होते की, हे प्रकरण ग्रामीण भागातील असल्यामुळे सबंधितांना ग्रामीण पोलिसांनीच संरक्षण द्यावयास पाहिजे होते. परंतु शिवाजीनगर कोर्ट पुणे शहराच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्याठिकाणी कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम पुणे शहर पोलिसांचे आहे. ज्या प्रमाणे पुणे शहरातील न्यायालयात हा प्रकार घडला आहे त्याचप्रमाणे राज्यात अनेक कोर्टात आरोपी आणि फिर्यादी यांच्यात वारंवार मारामा-या होत असतात. असे प्रकार घडू नयेत म्हणून कोण्ंती उपाययोजना करण्यात येणार आहे ? या प्रश्नाला उत्तर देतांना असे सांगण्यात आले होते की या प्रकरणातील आरोपी अजूनही सापडलेले नाहीत. तेव्हा हे आरोपी शोधून काढण्यासाठी काय प्रयत्न

3..



VTG/ KGS/ KGS/ प्रथम श्री.अजित शिगम 12.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आलेले आहेत ? विविध न्यायालयामध्ये अंतर्गत सुरक्षा रहावी या दृष्टीकोनातून ओळखपत्रासारखी पध्दत सुरु करुन न्यायालयामध्ये पाच दहा व्यक्तिंना प्रवेश दिला जाणार आहे काय ? आज एका प्रकरणामध्ये 20 - 25 लोक कोर्टाच्या आवारामध्ये येत असतात आणि कोर्टाच्या आवारात मारामा-या करतात तेव्हा असे प्रकार होऊ नयेत यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ? त्याचबरोबर सीसी टी.व्ही. न्यायालयाच्या आवारात बसून पोलीस अधिकारी मॉनेटरींग करणार आहेत काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, न्यायालयाच्या आवारातील सर्वच अधिकार न्यायालयाला असतात. त्यामुळे त्या ठिकाणी पोलीस अधिकारी काहीही करु शकत नाही.त्या ठिकाणी जी घटना घडली होती ती घटना टाळता येण्यासारखी होती.कोर्टमध्ये रेग्युलर जेवढा बंदोबस्त ठेवतो तेवढा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या प्रकरणातील दोन गटामध्ये वाद होता. या अगोदर जो खून झाला होता त्याची रिॲक्शन म्हणून दुस-या गटाच्या लोकांना मारहाण करण्यात आली होती.एका गटाचे चार आरोपी पकडण्यात आले असून दुस-या गटाचे बारा आरोपी पकडण्यात आले आहेत. अजूनही चार आरोपी फरारी आहेत ही गोष्ट खरी आहे.पोलीस या आरोपींचा शोध घेत आहेत. अशा प्रकारच्या खुनासारख्या वा अन्य गंभीर स्वरुपाच्या ज्या संवेदनशील घटना घडल्या असतील त्या प्रकरणी या पुढच्या काळात जमावाला तेथे येण्यास प्रतिबंध करणे किंवा अधिक पोलीस बळ ठेवणे या बाबीच्या सूचना कोर्टाची परवानगी घेऊन नक्की देण्यात येतील.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, व्हिडिओ कॉन्फरसिगंसाठी कोटयावधी रुपये खर्च करण्यात आल्याचे वारंवार सांगितले जाते. परंतु या प्रकरणामध्ये व्हिडिओ कॉन्फरसिगव्दारे कामकाज करण्याची विनंती न्यायालयाला का करण्यात आली नव्हती ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही व्यवस्था काही कारागृहात केलेली आहे परंतु सर्वच कारागृहामध्ये ती व्यवस्था झालेली नाही. व्हिडिओ कॉन्फरंसिंगचा उपयोग कोर्टात आरोपीला हजेरी देण्यासाठी केला जातो त्याचा जबाब नोंदविण्यासाठी अजून केला जात नाही.

------

4.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## तळेगांव, दाभाडे (जि.पुणे) येथे जिल्हा परिषदेतर्फे तपासणी सर्वेक्षणात बालके कुपोषित असल्याचे आढळून आल्याबाबत

**(५) * ७८१६ श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगांव, दाभाडे (जि.पुणे) येथे जिल्हा परिषदेतर्फे माहे ऑक्टोबर, २००९ अखेर करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी सर्वेक्षणात जिल्ह्यात १०१ बालके अतिकुपोषित, ९६ हजार ७५६ साधारण कुपोषित आढळल्याची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १२ डिसेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आरोग्य विभागाने कुपोषित बालकांसाठी कोणती उपाययोजना केली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.सुभाष झनक यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये मिळून ० ते ६ वर्षे वयोगटातील वजन घेतलेल्या ३२२६१३ बालकांपैकी मध्यम कुपोषणात श्रेणी-१ व श्रेणी-२ मध्ये ९६७५६ बालके व तीव्र कुपोषणात श्रेणी-३ व ४ मध्ये ७४ बालके होती.

(२) व (३) कुपोषणाला आळा घालण्याबाबत व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सुधारित दराने अतिरिक्त पुरक पोषण आहार, कुपोषित बालकांची दर पंधरवड्याला नियमित आरोग्य तपासणी, वैद्यकीय उपचार, बालकांचे लसीकरण, स्तनपान व शिशुपोषणावर भर देण्याबाबत व सामुदाय वृद्धीपत्रकाद्वारे पालकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे, इ.उपाय-योजना करण्यात आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रश्न विचारला असून तो प्रश्न वाचून त्यावर सही करीत असतांना मला असे वाटले होते की, एक लाख बालके कुपोषित आहेत तेव्हा हा प्रश्न आदिवासी भागातील असला पाहिजे परंतु पुण्यातील एक लाख बालके कुपोषित आहेत. माननीय केन्द्रीय मंत्री पुण्यातील आहेत,श्री. अजित दादा पवार यांच्या सारखे मातब्बर मंत्री पुण्यातील आहेत. श्री.रमेश बागवे यांच्यावर अन्याय करणारे शासकीय अधिकारी पुण्यातील आहेत ..............

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7816....

श्री. विनोद तावडे...

लोकलेखा समितीचे समिती प्रमुख पुण्यातील आहेत. असे असतांना या पुण्यामध्ये 96,756 म्हणजे जवळपास 1 लाख बालके कुपोषित आहेत. जर पुण्यासारख्या जिल्हयामध्ये ही स्थिती असेल तर आदिवासी भागामध्ये काय स्थिती असेल? ही स्थिती निर्माण होण्यास कोणते अधिकारी कारणीभूत आहेत? त्यांनी याबाबत वेळच्या वेळी काळजी कां घेतली नाही? त्याबाबत आपण काय कारवाई करणार आहात?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी परिस्थिती नाही. याठिकाणी श्रेणी 1 आणि 2 मधील बालकांची संख्या 96,756 दाखविण्यात आली आहे. आणि श्रेणी 3 व 4 मध्ये 74 बालके आहेत. माननीय सदस्यांनी ज्या पोटतिडिकीने याठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे तो मी नाकारीत नाही. संपूर्ण देशामध्ये कुपोषित बालकांचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा झाला आहे. त्यासंदर्भात आपल्याला उपाय योजना करावयाची असेल तर त्यामागील मूळ कारण शोधले पाहिजे. म्हणून त्याकरिता आदरणीय मुख्यमंत्र्यांबरोबर एक बैठक घेण्यात आली. त्या बैठकीमध्ये चर्चा होऊन काही निर्णय घेण्यात आले ते मी सभागृहाला अवगत करु इच्छिते. आदरणीय मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीला संबंधित विभागाचे मंत्री, राज्याचे मुख्य सचिव तसेच वित्त व नियोजन विभागाचे सचिव उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये कुपोषणाचे मूळ कारण हे बालकाच्या आरोग्याशी संबंधित नसून सामाजिक कारणही त्यामागे आहे. त्याबाबत राज्याच्या 17 विभागामार्फत कुपोषण निर्मूलनाचे काम होत असून त्यामध्ये समन्वय आणण्याकरिता गाव पातळीपासून आपण प्रयत्न करीत असून त्याकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. त्या समितीमार्फत राज्य स्तरावर, विभागीय स्तरावर, जिल्हा स्तरावर व गाव पातळीवर सर्व विभागांमध्ये समन्वय साधून व लोक सहभागाच्या माध्यमातून उपाय योजना करण्यात येत आहे. त्यामध्ये कुपोषणमुक्त गावासाठी एक ॲवॉर्ड डिक्लेअर करण्यात आला आहे. तसेच, लोकसहभागामध्ये कम्युनिटीचे मेंबर, ग्रामपंचायतीचे सदस्य, लोकप्रतिनिधी, सॅनिटरी व हेल्थचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे.त्याचप्रमाणे ब्रेस्ट फिडींग प्रॅक्टिसेस व लसीकरण करणे इत्यादी गोष्टींकडे अधिक लक्ष देऊन कुपोषणाचे निवारण करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने शासन उपाय योजना करीत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/

ता.प्र.क्र. 7816....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 1 लाख बालके कुपोषित होईपर्यंत शासनाचे अधिकारी काय करीत होते?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, याकरिता महिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे पुण्यामध्ये श्रेणीवर्धन करण्यामध्ये आपल्याला यश आले आहे. तसेच, लोकसहभागाच्या माध्यमातून काही प्रयास करण्यात येत आहेत, अतिरिक्त पूरक पोषण आहार देण्याचे काम सुरु आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य व जिल्हा परिषदेचे सदस्य, लोकप्रतिनिधींनी या श्रेणी 3 व 4 च्या बालकांना दत्तक घेतले आहे. या उपाय योजनेमुळे कुपोषित बालकांचे श्रेणीवर्धन झाले आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र...7816...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी निबंधाचे वाचन केलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी एक लाख मुलांमध्ये श्रेणी-1 व श्रेणी-2 मधील मुले जास्त आहेत आणि श्रेणी -3 व 4 मध्ये फक्त 74 बालके आहेत." असे स्टेटमेंट केलेले आहे. हे स्टेटमेंट बेजबाबदारपणाचे आहे असे माझे मत आहे. कारण कुपोषण हे कुपोषण आहे. ग्रेड-2 मधून ग्रेड-3 मध्ये मूल जाण्यास फार वेळ लागत नाही. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांचे अशा प्रकारचे वक्तव्य असेल तर अधिकारी असे म्हणतील की, मुले श्रेणी-1 आणि श्रेणी-2 मध्ये आहेत तर ठीक आहे. हे असेच चालू देत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, पुण्या सारख्या शहरामध्ये कोणती कारणे मिळाली की, ज्यामुळे कुपोषण झालेले आहे. ?

प्रा. फोजिया खान : सभापती महोदय, फक्त पुणे शहरातच नव्हे तर संपूर्ण देशात याचे मूळ कारण गरिबी आणि दारिद्रय हे आहे. जर पोषण व्यवस्थित मिळाले तर कुपोषण होत नाही. हा प्रश्न फक्त पुणे शहरापुरताच मर्यादित नाही तर संपूर्ण देशाचा हा प्रश्न आहे, एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगांव जिल्ह्यातील विशेषत: अंमळनेर तालुक्यातील बोगस डॉक्टर बाबत**

**(६) * ६९२९ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात विशेषत: अंमळनेर तालुक्यात अनेक बोगस डॉक्टर्स अवैध व्यवसाय करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) उक्त प्रकरणी कारवाई करण्यात विलंब करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) नाही, जळगाव जिल्ह्यात सन २००७ मध्ये बोगस डॉक्टर्सच्या अवैध व्यवसायासंदर्भात सन २००७ व २००८ मध्ये प्रतिवर्षी दोन गुन्हे दाखल झालेले आहेत. यापैकी अमळनेर तालुक्यात सन २००७ मध्ये केवल एक गुन्हा दाखल झाला असून त्याचा क्रमांक अमळनेर पो.स्टे.भाग-५ गु.र.नं.८४/०७ असा आहे. सन २००९-१० मध्ये अमळनेर तालुक्यात तसेच जळगाव जिल्ह्यात या संदर्भात एकही गुन्हा दाखल झालेला नाही.
(२) होय.
(३) व (४) २००७ व २००८ मध्ये दाखल गुन्ह्याबाबत न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आली आहेत. सदर गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा आणि लोकांच्या आरोग्याशी व जीवनाशी निगडीत असा हा विषय आहे. बोगस डॉक्टर्स आणि अवैध व्यवसायाशी निगडीत असा हा विषय आहे. यासंदर्भात अतिशय विसंगत उत्तर आलेले आहे. सन 2007 मध्ये एक,2008 मध्ये एक आणि 2009 व 2010 मध्ये एकही गुन्हा घडलेला नाही अशा पध्दतीचे उत्तर देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, या बोगस डॉक्टरांकडे जे प्रमाणपत्र असते तेही खोटे असते, रजिस्ट्रेशन नसते, ज्ञान नसते त्यामुळे औषधे निरनिराळया पध्दतीने दिली जातात. त्या औषधांच्या परिणामांची जाणीवही त्यांना होत नाही. त्यामुळे रुग्णाच्या जीवाशी खेळले जाते. त्यामुळे अनेक रुग्ण दगावतात. तालुका स्तरावर यासंदर्भात एक समिती आहे. ही समिती बी.डी.ओ., सचिव, टी.एम.ओ. तहसीलदार, पोलीस विभाग यांच्या माध्यमातून बैठक घेऊन एमओपीएचसीच्या माध्यमातून बोगस डॉक्टरांची यादी तयार करते. ती यादी खूप मोठी असते. जळगाव जिल्हयातील एकटया अंमळनेर तालुक्यामध्ये 50 डॉक्टर बोगस डिग्री घेऊन व्यवसाय करीत आहेत. असे असताना पोलीस त्यांच्या विरुध्द कुठल्याही प्रकारची कारवाई करीत नाहीत. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, कारवाई न करणाऱ्या आणि विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय आणि समितीचे धोरण बदलण्यात येईल काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6929....

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, नांदेड, धामणगाव या ठिकाणी जो बनावट डॉक्टर आहे. त्याने कोणतीही पदवी घेतलेली नसताना आणि त्याच्याकडे कुठलेही प्रमाणपत्र नसताना लोकांना फसविण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्याला कलम 31 (1) (2) व कलम 36 (1) (2) प्रमाणे अटक करुन न्यायालयापुढे हजर केले असता त्याला कोर्टाने जामीनावर सोडलेले आहे.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, मूळ विषय असा आहे की, लोकांच्या आरोग्याशी खेळले जात आहे.. एका तालुक्यात 50-50 बोगस डॉक्टरांची यादी आहे. तर दहा ते पंधरा तालुक्यात किती बोगस डॉक्टर्स असतील.? सभापती महोदय, जळगाव जिल्हयामध्ये जवळ जवळ 200 ते 250 बोगस डॉक्टर्स आहेत. असे असताना कारवाई शून्य आहे. सभापती महोदय, या संदर्भात तालुका समिती काम करीत नाही. जिल्हा समिती आढावा घेत नाही आणि कुठल्याही प्रकारचे गुन्हे नोंदविले जात नाहीत. त्यामुळे हे बोगस डॉक्टर्स सर्रास पैसे कमवत आहेत आणि लोकांच्या आरोग्याशी खेळत आहेत हा विषय आहे याबाबतीत काही कारवाई करता येईल काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7466 ....

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, अशा प्रकारची जी समिती आहे ती जिल्हा आणि तालुक्‍यावार बैठका घेऊन त्या समितीमार्फत समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केले जाते. सन्माननीय सदस्यांनी जो स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, असे काही आढळून आले तर नक्की अशा बोगस डॉक्टरांवर कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बोगस डॉक्टर किंवा बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसायासंबंधीचा प्रश्न नेहमी सभागृहामध्ये चर्चेला येतो. याचे कारण असे आहे की, महाराष्ट्र शासन वर्षानुवर्षे ग्रामीण भागामध्ये डॉक्टर्स देण्यामध्ये अपयशी ठरत आहे आणि त्याचीच ही परिणती आहे. हे डॉक्टर्स म्हणजे त्या ठिकाणी बुडत्याला काडीचा आधार आहेत. ते लोकांना काही तरी औषधे देऊन वाचवितात अशी परिस्थिती ग्रामीण भागामध्ये आहे. ते लुटतात की नाही हा नंतरचा भाग आहे. जोपर्यंत शासन त्या ठिकाणी डॉक्टर्स देत नाही तोपर्यंत असे जे डॉक्टर्स आहेत त्यांना काही तरी प्रशिक्षण देऊन, त्यांची परीक्षा वगैरे घेऊन त्यांना अनुमती द्यावी असे काही तरी करावे. एक तर त्यांच्यामागे गुन्ह्याची टांगती तरलावर आहे आणि दुसरेकडे शासन ग्रामीण भागात डॉक्टर्स देत नाही. शासनाने ग्रामीण भागामध्ये पूर्ण डॉक्टर्स देण्याची व्यवस्था करावी. या सदनामध्ये वारंवार प्रत्येक अधिवेशनामध्ये बोगस डॉक्टरांसंबंधीचा प्रश्न येतो. किती डॉक्टरांना पकडले, कोणाला तुरुंगात टाकले यापेक्षा ग्रामीण भागामध्ये पूर्ण डॉक्टर्स देण्याची काय व्यवस्था आहे हे सांगावे. अन्यथा हे जे डॉक्टर्स बुडत्याला काडीचा आधार आहेत त्यांच्या संदर्भात काही तरी कोर्स वगैरे निर्माण करुन त्यांना मान्यता देणार काय ?

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी सजेशन फॉर ॲक्शन असे म्हणावे.

श्री. रमेश बागवे : ठीक आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/

**पृ.शी.**: छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रामध्ये उभारावयाच्या स्मारकासंबंधी काढलेले उदगार

**मु.शी.**: छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रामध्ये उभारावयाच्या स्मारकासंबंधी काढलेले उदगार या विषयावर सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार,वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय सामान्य प्रशासन राज्यमंत्री यांचे निवेदन

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रामध्ये उभारावयाच्या स्मारकासंबंधी मे. बेन्सले डिझाईन स्टुडिओ, यांच्या संचालकांनी गोव्यामध्ये एका परिषदेत स्मारकासंबंधात विचारण्यात आलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने काढलेल्या उद्‌गाराबाबत दिनांक 23 एप्रिल, 2010 रोजी डॉ. वसंत पवार, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मी पुढील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: विधान परिषद नियम समितीचा अहवाल सादर करणे

श्री. अरुण गुजराथी ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद नियम समितीचा अहवाल सादर करतो.

**उपसभापती** : विधान परिषद नियम समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/

**पृ.शी.**: नियमातील विशिष्ट तरतूद स्थगित करणे

**मु.शी.**: विधान परिषद नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत पाच दिवसांची करण्याबाबत सदस्य विधान परिषद नियम समिती यांचा प्रस्ताव

श्री. अरुण गुजराथी ( सदस्य, विधान परिषद नियम समिती ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"विधानपरिषद नियम समितीच्या आज दिनांक 15 जुलै, 2010 रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील म.वि.प. नियम 219 (1) व 219 (3) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती म.वि.प. नियम 289 अन्वये स्थगित करण्यात येवून सदरहू मुदत पाच दिवसांची करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : गृह राज्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न होणे

**मु.शी.**: गृह राज्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न होणे यासंबंधी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गृह राज्यमंत्री यांच्याविरुध्द दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गृह राज्यमंत्री यांच्या विरोधात एक विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 241 अन्वये मी विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, दिनांक 20 एप्रिल, 2010 रोजी मी सभागृहात "राज्यामध्ये महिलांवरील बलात्काराच्या वाढलेल्या घटना" या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती. सदर अल्पकालीन चर्चेवर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, शिवसेना गटनेते श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, ॲड. वंदना चव्हाण, श्रीमती अलका देसाई, यांनी अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेऊन या विषयावर आपले विचार व्यक्त केले होते. सदर चर्चेमध्ये आरोपींविरुध्द कडक कारवाईची मागणी करताना या अत्याचारग्रस्त महिलांच्या संदर्भात दिरंगाई करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता मी प्रतिपादित केली होती. तसेच अशा अधिकाऱ्यांच्या बढत्या, प्रमोशन थांबविण्याची सुध्दा मी मागणी केली होती. त्यावेळेस सदर मागणीला इतर माननीय सदस्यांनी समर्थन दिले होते.

सभापती महोदय, सदर चर्चेला माननीय गृह राज्यमंत्री नामदार श्री. रमेश बागवे यांनी सभागृहात उत्तर दिले त्यावेळी त्यांच्या भाषणामध्ये गुन्हेगारांना जरब बसावी म्हणून कायद्यात जेवढा जास्तीतजास्त बदल करता येईल त्यासाठी प्रयत्न करण्याचे सुध्दा मान्य केले. तसेच गुन्हेगारांवर मोका कायद्यान्वये देखील कारवाई करण्याचे सभागृहाला आश्वासन दिले. तसेच ज्या पोलीस आयुक्ताच्या म्हणजे श्री. सत्यपाल सिंहाच्या काळात पुणे शहरातील गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आहे त्याची शासनाने गंभीर दखल घेऊन त्यांची त्वरित बदली करुन त्या ठिकाणी चांगला, सक्षम आणि गुन्हेगारांवर वचक ठेऊ शकेल अशा पोलीस अधिकाऱ्यांची आयुक्त म्हणून नेमणूक केली जाईल असेही सभागृहाला आश्वासित केले होते. त्या आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे याबाबत मी महाराष्ट्र विधान परिषद नियम 241 अन्वये माननीय गृह राज्यमंत्री ना. श्री. रमेश बागवे यांच्या विरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना काल, दिनांक 14 जुलै, 2010 रोजी दाखल केलेली आहे. सदर विशेष हक्कभंगाची सूचना आपण मला आज दिनांक 15 जुलै, 2010 रोजी सभागृहात मांडण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करते.

**उपसभापती** : या हक्कभंगाच्या सूचनेबाबतचा निर्णय नंतर देण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अंधेरी (पूर्व), मुंबई येथील सेव्हन हिल्स हॉस्पिटलने मुंबई महानगरपालिकेशी केलेल्या करारातील अटीचा भंग करणे

**मु.शी.**: अंधेरी (पूर्व), मुंबई येथील सेव्हन हिल्स हॉस्पिटलने मुंबई महानगरपालिकेशी केलेल्या करारातील अटीचा भंग करणे याबाबत डॉ.दीपक सावंत यांनी श्री.जितेंद्रदास मंगतजी चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक, सेव्हन हिल्स हॉस्पिटल, मुंबई यांच्याविरुद दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अंधेरी (पूर्व), मुंबई येथील सेव्हन हिल्स हॉस्पिटलने मुंबई महानगरपालिकेशी केलेल्या करारातील अटीचा भंग करणे याबाबत श्री.जितेंद्रदास मंगतजी चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक, सेव्हन हिल्स हॉस्पिटल, मुंबई यांच्याविरुद विशेष हक्कभंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, आपण मला विशेष हक्कभंगाची सूचना मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल सर्व प्रथम मी आपले आभार मानतो. सभापती महोदय, अंधेरी (पूर्व) मरोळ येथे सेव्हन हिल्स हॉस्पिटल हे महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर बांधण्यात आले आहे. सेव्हन हिल्स हॉस्पिटल लिमिटेड व सोमा इंटरनॅशनल या संयुक्त निविदाकाराने सदर भूखंड अटी व शर्तीनुसार घेतला आहे. दिनांक 4.7.2010 रोजी सकाळी 10.00 वाजता देशाच्या महामहिम राष्ट्रपती महोदया यांच्या हस्ते या हॉस्पिटलचे उद्घाटन झालेले आहे. या हॉस्पिटलने वैद्यकीय शिक्षण संचालकांची व आरोग्य सेवा संचालकांची परवानगी सुध्दा घेतलेली नव्हती. त्यामुळे हा एक प्रकारे महामहिम राष्ट्रपतींचा अपमान ठरतो. महत्वाची गोष्ट म्हणजे या कोटयवधी रुपयांचा भूखंड अत्यल्प दरात घेतला असून नियमानुसार 20 टक्के खाटा गरीब रुग्णांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत. हे रुग्णालय मल्टि स्पेशालिटी हॉस्पिटल आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.......

कॅन्सरचा विभाग असो, ब्रेन सर्जरीचा विभाग असो, कार्डियाक सर्जरी या विभागात नियमानुसार 20 टक्के खाटा गरीब रुग्णांसाठी राखून ठेवणे आवश्यक होते. अशाप्रकारच्या अटी व शर्ती देखील त्यांनी पायदळी तुडविल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या करारानुसार केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या, मुंबई महानगरपालिकेच्या व एम.सी.आय.च्या नियमांचे पालन श्री.जितेंद्रदास मंगलजी चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक, सेव्हन हिल्स हॉस्पिटल, मुंबई यांनी केलेले नाही. त्यांच्या विरोधात मी हक्कभंगाची सूचना देत आहे. कृपया आपण ती ॲडमिट करुन घ्यावी अशी नम्र विनंती करतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

-----

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>हरकतीच्या मुद्यासंबंधी</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण मला बोलण्याची परवानगी दिली तर मी बोलतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल देशाचे माननीय पंतप्रधान यांना राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय शिष्टमंडळ भेटण्यासाठी गेले होते. तेथे या सभागृहाचे मत योग्य पध्दतीने मांडले गेले नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यासंदर्भात शासनाने अधिकृतपणे निवेदन केले पाहिजे. शासनाने निवेदन केले तर ते राज्यातील संपूर्ण जनतेला कळते.

श्री.दिवाकर रावते : सरकारच्या वतीने निवेदन केले जात नाही. या सदनामध्ये अशी एक व्यवस्था आहे की, सभागृहात कोणताही विषय चालू असल्यावर एखाद्या मंत्री महोदयांना निवेदन करावयाचे असते त्यावेळी ते आपल्या परवानगीने निवेदन करण्यासाठी उभे राहतात आणि सभागृहात चालू असलेला विषय थांबविला जातो. मंत्री महोदयांना तो अधिकार आहे त्याप्रमाणे येथे निवेदन केले गेले. परवा मी माझे विचार मांडत असताना सन्माननीय उपमुख्यमंत्री यांना निवेदन करावयाचे असल्यामुळे आपण मला थांबविले. त्यामुळे मी थांबलो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते :

माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सीमा प्रश्नासंबंधातील ठराव वाचून दाखवला आणि सभागृहातून निघून गेले. ठराव वाचल्यानंतर असे लक्षात आले की, त्यांनी जो ठराव वाचला होता तो विधिमंडळातील सर्व पक्षांनी मंजूर केलेला ठराव होता. बेळगाव, कारवार मधील मराठी जनतेवर कानडी सरकारकडून जो अत्याचार चालू आहे त्यांचा आम्ही निषेध केला. आख्ख्या महाराष्ट्रामध्ये संतापाची लाट निर्माण झालेली आहे. तेथील मराठी जनतेवर 60 वर्षापासून सातत्याने अत्याचार होत आहेत. तेथील महापौर देखील सुरक्षित नाहीत. त्यांना काळे फासले जाते~~ण्यात आले.~~, बहुसंख्य मराठी नगरसेवक असलेल्या महानगरपालिकेमध्ये जबरदस्तीने अल्पसंख्यांकाचा महापौर केला गेला. अशा प्रकारे वारंवार होणारे अत्याचार शिवसेनेच्या वतीने आम्ही येथे मांडत आलो आहोत. ही सर्व परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शिवसेना कार्याध्यक्ष श्री. उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले की, न्यायालयातील लढा ~~ा~~ पूर्ण होई~~-~~पर्यत सीमा भाग ~~सीमा भाग~~ हा कोणत्याही परिस्थितीमध्ये केन्द्रशासित झाला पाहिजे. ही त्यांची भूमिका होती. आम्ही आमची भूमिका येथे मांडली . या सभागृहामध्ये ठराव मांडला गेला. यामध्ये केन्द्र शासनाने लक्ष घालावे, केन्द्र शासनाने पहावे अशा अर्थाचा ठराव होता. तो सीमा भाग केन्द्रशासित करावा अशा प्रकारचे वाक्य त्या ठरावामध्ये नव्हते. सर्व पक्षाच्या वतीने ठराव केला जातो त्यावेळी सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये सर्व पक्षाच्या प्रतिनिधींना बोलावले जाते. किंबहुना विधिमंडळातील आपल्या पदाचे स्थान लक्षात घेता महत्वाच्या प्रश्नासंबंधी सर्व पक्षाच्या गटनेत्यांची बैठक सभापतींच्या दालनात होते आणि ठरावाचा मसुदा काय असावा या संदर्भात चर्चा होते. ठरावाचा मसुदा तयार झाल्यानंतर तो कायद्याच्या भाषेत कसा असावा, शब्द रचना कशी असावी हे निश्चित करण्यासाठी सचिवांची मदत घेतली जाते. परंतु ठरावामध्ये "सीमा भाग केन्द्रशासित करावा" असे शब्दच नव्हते. माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या माननीय पंतप्रधाना भेटण्यासाठी शिष्टमंडळ गेल्यानंतर त्यांना ~~कोणते निवेदन देण्यास~~द्यावयाचा ठराव जेव्हा सभागृहामध्ये वाचून दाखविलो त्यावेळी त्यामध्ये महत्वाचे शब्दच नव्हते. हा सीमा भाग केन्द्रशासित झाला पाहिजे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी चर्चेला उत्तर देत असताना सांगितले होते आणि ते रेकॉर्डवर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी "हा सीमा भाग केन्द्रशासित झाला पाहिजे" अशा प्रकारचे मत मांडले होते. असे असताना ठरावामध्ये हे शब्द का घातले नाहीत अशी मी विचारणा केल्यानंतर त्यांनी सांगितले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

–की, "मी बोललो हे बरोबर आहे. तरी सुध्दा सर्व पक्षांचा मिळून असलेल्या ठरावाच्या बाहेर मला जाता येत नाही. माझ्यावर बंधने आहेत." मी म्हटले की, अशा प्रकारच्या ठरावाला आमची मान्यता नव्हती. हा ठराव माननीय सभापतींनी केला पाहिजे...(अडथळा).. या सदनामध्ये सर्वानुमते एखादा ठराव ____ झालाच नाही. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनीही हे काल देशाचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या भेटीला सीमा प्रश्नासंबंधी महाराष्ट्राची ठोस भूमिका मांडण्यासाठी जात असताना "माझ्यावर सभागृहाचे बंधन आहे आणि जो ठराव मंजूर झालेला आहे त्याच्या बाहेर मला जाता येत नाही" असे सांगितले.

दिल्लीमध्ये आम्ही सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी बसलो होतो. पण आमच्यातच एक मत नसल्यामुळे आम्ही कसे काय भांडणार ? तू तू, मी मी नको म्हणून आम्ही संयमाने घेतले आणि निवेदनामध्ये नव्हती ती बाब मांडली. ती बाब म्हणजे केन्द्राच्या मानव आयोगाने तेथे जावे, तेथील एकूण परिस्थितीची चौकशी करावी आणि जे जे अत्याचार झालेले आहेत त्याबाबतीत योग्य त्या व्यक्तीवर गुन्हे दाखल करावेत. या सभागृहामध्ये पटकन उभे राहून निवेदन करण्याचा माननीय उपमुख्यमंत्र्यांचा अधिकार आहे. परंतु सर्व पक्षाच्या वतीने एखादी गोष्ट ठरविली जाते त्यावेळी गृहीत धरुन जर असा प्रकार होत असेल तर त्यामुळे बाहेर वेगळा संदेश जावर सभागृहाचे बंधन आहे आणि ईल. माझ्या पक्षाची भूमिका ठाम आहे, सीमा भाग केन्द्रशासित व्हावा असा आमचा आग्रह आहे आणि हा आमचा आग्रह आणि आमची भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वीकारलेली असताना सुध्दा ती भूमिका केन्द्रामध्ये नेण्यात आम्ही अपयशी ठरलो आहोत. माननीय पंतप्रधानांनी जे काही सांगितले त्याबाबतचा अहवाल शासन देईल. त्यांनी आमच्याशी काय काय चर्चा केली हे सांगण्याचा मला अधिकार नाही.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

शेवटी माननीय पंतप्रधान महोदय म्हणाले की, हा विषय सर्वोच्च न्यायालयात असल्यामुळे माझ्यावर फार मर्यादा आहेत. त्या मर्यादा आम्हालाही कळतात. परंतु आमचे म्हणणे असे होते की, सर्वोच्च न्यायालयाचा जो निर्णय यायचा असेल तो येईल, तोपर्यंत सीमा भागातील मराठी भाषिक जनतेवर होणारा अत्याचार थांबविण्यासाठी हा संपूर्ण प्रदेश केंद्रशासित व्हावा, ही आमची ठाम व ठोस भूमिका होती. आमच्या पक्षाचे नेते श्री.उध्दवजी ठाकरे यांनीही पक्षाच्या वतीने ही भूमिका जाहीर केली होती. ही भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वीकारली असतानाही माननीय पंतप्रधानांपुढे ती मांडता आली नाही. आम्हाला जनतेला तोंड द्यावे लागत आहे. आम्ही दिल्लीत जाऊन काय केले? सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या माध्यमातून आम्ही ही भूमिका मांडू शकलो नाही हे अयोग्य आहे असे आमचे मत आहे. आमचे आजही मत आहे की, हा संपूर्ण वादग्रस्त प्रदेश केंद्रशासित झाला पाहिजे. सीमा भागातील मराठी बांधवांना योग्य न्याय मिळावा म्हणून आम्ही माननीय पंतप्रधानांची भेट घेतली, तेथे काय भूमिका मांडली हे लोकांपर्यंत पोहोचले का? या भेटीतून काय निष्पन्न झाले हे लोकांना कळले पाहिजे. केवळ औपचारिकता पूर्ण करुन आलो का? सीमा भागातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सर्वजण उभे आहोत का? हा विषय त्यांच्यापर्यंत पोहाचू शकत नाही म्हणून हरकतीच्या मुद्याद्वारे मी हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सभागृहात सीमा प्रश्नाच्या मुद्यावर उत्तर देत असताना ठामपणे म्हटले होते. त्यानुसार पुन्हा एकदा ठराव या सभागृहात मंजूर करण्यात यावा आणि त्या ठरावाची प्रत माननीय पंतप्रधानांकडे पाठविण्यात यावी अशी मी ठाम भूमिका मांडत आहे. धन्यवाद.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हरकतीच्या मुद्याद्वारे जो विषय उपस्थित केला त्या मुद्याबाबत पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, यापूर्वी अनेकदा विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात एकमताने ठराव मंजूर झालेला आहे. बेळगाव, कारवार, धारवाड आणि निपाणीसह 865 मराठी भाषिक गावातील जनतेवर होणारा अन्याय दूर करण्याबाबत माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी सभागृहात भूमिका स्पष्ट केली होती की, जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत हा भाग केंद्रशासित झाला पाहिजे ही मागणी करण्यासाठी आम्ही माननीय पंतप्रधानांची भेट घेण्यासाठी

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.........

दिल्लीत जाणार आहोत ही भूमिका शासनाच्या वतीने स्पष्ट केली होती. या भूमिकेपासून शासनाला मागे येता येणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात भूमिका स्पष्ट केल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी झाली, या महाराष्ट्राची प्रॉपर्टी झाली. यापासून आता मागे जाता येणार नाही.

सभापती महोदय, मी आज माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करणार आहे. या सभागृहाचा आणि सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राचा अवमान करण्याचे काम त्यांनी केले आहे. काल माझी प्रकृती बरी नव्हती. मला तपासण्यासाठी डॉक्टर येऊन गेले होते. त्यामुळे मी शिष्टमंडळासोबत दिल्ली येथे जाऊ शकलो नाही, मी तसे पत्र माननीय मुख्यमंत्र्यांना दिले होते. मी शिष्टमंडळासोबत जाऊ शकलो नाही त्याबद्दल क्षमा मागतो. आजही माझी प्रकृती तितकीशी बरी नाही. केवळ महाराष्ट्रातील जनतेचाच नव्हे तर बेळगाव, कारवार, धारवाड, निपाणीसह 865 गावातील 40 लाख मराठी बांधवांचा अवमान करण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम माननीय मुख्यमंत्र्यांनी केले आहे. याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे? माननीय पंतप्रधानांसमोर हा प्रदेश केंद्रशासित व्हावा ही भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी का मांडली नाही? जे शिष्टमंडळ गेले होते त्यांनी या भूमिकेपासून माघार का घेतली? या विषयाबाबत या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला शासनाची भूमिका स्पष्टपणे कळली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. आज सायंकाळपर्यंत मी माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करणार आहे. महाराष्ट्रातील जनतेचा आणि या सभागृहाचा अवमान झालेला आहे. सभागृहाची फसवणूक केलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्रातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा अधिकार नाही, एवढेच मला सांगावयाचे आहे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अत्यंत मूलभूत आणि महत्वाच्या विषयावर भाष्य केलेले आहे.

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या बाजूने अजिबात संभ्रम निर्माण झालेला नाही. शिष्टमंडळ घेऊन जात असताना त्या शिष्टमंडळामध्ये एकीकरण समितीच्या प्रमुखांसह सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश करण्याचे ठरले होते. त्याबद्दल आमच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला नाही. दुर्दैवाने वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली त्यामुळे विरोधी पक्षाच्या बाजूने संभ्रम निर्माण झालेला दिसून येतो. सीमा प्रश्नासंबंधी विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात जो ठराव मंजूर झाला

...3..

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी......

त्याचे इंटरप्रिटेशन करीत असताना सीमा भागातील मराठी बांधवांवर जो अन्याय होत आहे तो अन्याय दूर होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत हा संपूर्ण वादग्रस्त प्रदेश केंद्रशासित करावा ही या सभागृहाची भावना होती.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ......

तेच आपण या ठिकाणी बोलून दाखविले आहे. पण उद्या कशा पध्दतीने निषेध करावा, कशा पध्दतीने मांडणी करावी याबाबत दिल्लीमध्ये चर्चा झाली आणि त्या अनुषंगाने वर्तमानपत्रात छापून आलेले आहे व ते अत्यंत दुर्दैवी आहे. पण आज कर्नाटक सरकारने जो अत्याचार चालविला आहे, जो अन्याय चालविला आहे त्या भागात नवीन विधानसभेची इमारत बनविण्यासंबंधीचा निर्णय घेतला आणि त्यासाठी कुमारस्वामी एकत्र येतात. जे इतिहासात कधी घडले नाही ते आता घडत असून दुर्दैवाने ठिणगी लावण्याचे प्रयत्न सीमा भागात केले जात आहेत. नवीन विधान भवनाची इमारत बांधली जात आहे, विधानसभा बोलाविण्याचा प्रयत्न होत आहे त्या प्रवृत्तीचा निषेध करावा, त्या शासनाचा निषेध करावा हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे सांगितले तशी परिस्थिती नाही. कारण त्या बैठकीला मी सुध्दा हजर होतो. तशी कोणतीही चर्चा या बैठकीत झालेली नाही. माननीय पंतप्रधानांना भेटण्यापूर्वी महाराष्ट्र सदन येथे माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात जी बैठक घेण्यात आली तेथे भारतीय जनता पक्ष तसेच शिवसेना पक्षाकडून अशा प्रकारे कोणत्याही स्वरुपाची चर्चा झालेली नाही. किंबहुना खालच्या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसे यांनी ही मागणी केली की, या भागात विधानसभेचे बांधकाम चालू आहे ते ताबडतोब थांबले पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय महत्वाचा आहे. तो म्हणजे सीमावासियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात सदनात मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. त्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हा सीमा प्रदेश केंद्रशासित झाला पाहिजे. या ठिकाणी मराठी भाषिकांवर होणारा अन्याय चुकीचा आहे, जी दडपशाही चाललेली आहे त्याच्या विरोधात आपण सर्वपक्षीय शिष्टमंडळ माननीय पंतप्रधानांना भेटायला जाऊ असेही त्यांनी सांगितले होते. पण दिल्लीला जेव्हा असा प्रश्न निर्माण झाला होता तेव्हा माननीय पंतप्रधानांकडे जाताना पहिल्यांदा आपल्यातच मतभेद नकोत म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना ती चर्चा थांबविण्याची विनंती केली होती. तेव्हा खरे तर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा मुख्य मुद्दा असा होता की, ज्यावेळी आपण माननीय पंतप्रधानांना भेटण्यासाठी जातो तेव्हा दोन्ही सभागृहांचे ठराव हे एकच असले पाहिजेत. आम्ही सुध्दा त्या मुद्याला पाठिंबा दिला. अर्थात हा भाग मागणी केल्याप्रमाणे ताबडतोब केंद्रशासित करता येतो की नाही हा प्रश्न वादातीत असू शकतो म्हणून त्याविषयी मी चर्चा करीत नाही. परंतु ही मागणी का केली तर त्या भागात सध्या मराठी बांधवांच्या बाबतीत जो अन्याय सुरु आहे ते वातावरण थांबले पाहिजे आणि तेथील मराठी बांधवांना ताबडतोब संरक्षण मिळाले पाहिजे. थोडक्यात म्हणजे सन्माननीय सदस्यांनी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून मांडलेला आणि मला समजलेला मुद्दा म्हणजे खालच्या सभागृहाचा ठराव आणि वरच्या सभागृहाचा ठराव हे वेगवेगळे असता कामा नयेत हाच मुख्य आक्षेप आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, सुरुवातीला या विषयावर सभागृहात जेव्हा चर्चा सुरु झाली त्यावेळेस मी सभागृहात नव्हतो. परंतु चर्चेला उत्तर देतांना या सभागृहात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले त्यामध्ये आणि विधानसभेच्या ठरावात तफावत आहे. ही जी तफावत आहे ती चुकीची आहे. अशा प्रकारची तफावत राहता कामा नये, असा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा हरकतीचा मुद्दा आहे असे मला वाटते व त्यामुळेच मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना पाठिबा देतो आहे. विधानसभा आणि विधान परिषदेचा ठराव एक असला पाहिजे. म्हणून ठरावात दुरुस्ती करुन, नव्याने या विषयावर चर्चा करुन नवीन ठराव पुन्हा केंद्र सरकारकडे पाठवावा अशी मागणी या निमित्ताने मी करतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या हरकतीच्या मुद्याला पाठिंबा देऊन मी माझे विचार येथेच थांबवतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वेगळया विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीच्या मुद्या या ठिकाणी मांडला आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागाच्या संदर्भात विधानसभा आणि विधान परिषदेमधील चर्चेच्या अनुषंगाने ठराव करण्यात आला. ठराव करीत असतांना असा प्रधात आहे की, मग तो ठराव अभिनंदनाचा असो किंवा अन्य कोणताही ठराव असो, हा ठराव करीत असतांना दोन्ही बाजूच्या गट नेत्यांना माननीय सभापतीच्या दालनात बोलावून चर्चा होऊन नंतर ठरावाचा मजकूर तयार केला जातो व एकमताने तो ठराव सभागृहात मांडला जातो. एकदा ठराव सभागृहात मांडल्यानंतर त्यावर अनुमोदन सुध्दा होत नाही. सभागृहाच्या नेत्यांनी ठराव मांडल्याबरोबर माननीय सभापती महोदय, ठराव वाचून दाखवतात व मग तो सभागृहाचा ठराव म्हणून पारित केला जातो. बेळगाव, कारवार आणि निपाणीचा सीमा प्रश्न या राज्याला गेल्या 50 वर्षापासून भेडसावतो आहे. इतका महत्वाचा प्रश्न असतांना परवा सभागृहात वेगळी चर्चा सुरु असतांना घाईगर्दीने सीमा प्रश्नाचा ठराव मांडला गेला होता ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी हरकत घेतली ती बरोबर आहे. खरा वाद कुठे सुरु झाला तर, सीमावादाच्या प्रश्नासंदर्भात जी चर्चा या सभागृहात झाली त्या चर्चेला उत्तर देत असतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात असे वक्तव्य केलेले आहे की, " बेळगाव, कारवार, निपाणी हा केंद्रशासित प्रदेश करावा अशा प्रकारची मागणी आम्ही माननीय





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

पंतप्रधांनाना करणार आहोत". यानंतर या विषयावर विधानसभेत चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेत "केंद्रशासित प्रदेश " करण्याचे जे वक्तव्य केले होते ते वक्तव्य विधानसभेत केले नाही. विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना मुख्यमंत्री ज्यावेळेस स्टेटमेंट करतात त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्याचे स्टेटमेंट दोन्ही सभागृहात सारखे असले पाहिजे. हा वाद काही शिवसेनेने निर्माण केलेला नाही तर हा वाद माननीय मुख्यमंत्र्यांनी सुरु केलेला आहे. एका ठिकाणी एक स्टेटमेंट करावयाचे, दुस-या ठिकाणी दुसरे स्टेटमेंट करावयाचे आणि दिल्लीत गेल्यानंतर मात्र सर्वांना सांगावयाचे की, आपल्या सर्वांचे या विषयावर एक मत असले पाहिजे. केंद्रशासित प्रदेश करावा की, न करावा हा वादातीत मुद्दा आहे. या मुद्यावर मी आता काही बोलणार नाही. दिल्ली येथील माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या दालनात ज्यावेळी बैठक झाली त्या बैठकीत असे ठरले होते की, माननीय पंतप्रधानांसमोर गेल्यानंतर पहिली चर्चा माननीय मुख्यमंत्र्यांनी सुरु करावी नंतर विधानसभेच्या विरोधी पक्षाने भूमिका मांडावी, तिस-या वेळेस राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी मत मांडावे, चौथ्यांदा विधानसभेचे शिवसेनेचे गट नेते सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी मत मांडावे व माननीय श्री. एन.डी.पाटील यांनी या चर्चेचा समारोप करावा, अशा प्रकारे त्या बैठकीत पाचच नेत्यांनी बोलावे असे ठरले. त्या चर्चेमध्ये विधानसभेचे विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव खडसे यांनी मराठी माणसावर त्या ठिकाणी होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भात व लाठी हल्ला झाला, त्या संदर्भात त्या घटनेची त्वरीत चौकशी मानवाधिकार आयोगाकडून करावी अशी मागणी केली तसेच याठिकाणच्या परिस्थिती संदर्भात माननीय पंतप्रधांनांनी हस्तक्षेप करावा अशीही मागणी केली होती. वर्तमानपत्रात काय छापून आलेले आहे यावर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ देसाई यांनी आपले विचार मांडू नये.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, अशा पद्धतीने वक्तव्य केले गेले. या सर्व वादाला जबाबदार कोण असेल तर ते या राज्याचे माननीय मुख्यमंत्री आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी एका सभागृहामध्ये एक निवेदन केले आहे, तर दुसऱ्या सभागृहामध्ये वेगळे निवेदन केले आहे. अशाप्रकारे महाराष्ट्रातील जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे योग्य नाही. एका जबाबदार व्यक्तीने असे वक्तव्य करता कामा नये होते. ते चुकीने झाले आहे. दिल्लीला माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात बैठक झाली. श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही श्री.रावते साहेबांना समजावले की, सर्व पक्षीय बैठकीमध्ये मत ठरले. विधान सभेचा आणि विधान परिषदेचा ठराव एकच आहे. वाक्य रचना वेगळी नाही. पण सर्वांना विश्वासात घेऊन जर तो ठराव केला असता तर अधिक बरे झाले असते. पण तसे घडले नाही. माझी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आणि काँग्रेस पक्षाला नम्र विनंती आहे की, आपण एकदा कर्नाटक राज्य काँग्रेसचा ठराव करा. मग भाजपच्या मुख्यमंत्र्यांना काय सांगायचे ते सांगू. तिथली काँग्रेस कमिटी काय करते ? तिथली काँग्रेस कमिटी मराठी माणसाच्या पाठीमागे राहण्याचा ठराव करते काय ? हे आम्हाला सांगावे. मग भाजपचे मत आपण मागावे. एवढेच मी सांगतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल एवढया चांगल्या पद्धतीने सर्व पक्षीय शिष्टमंडळ दिल्लीला माननीय पंतप्रधानांना अतिशय गांभीर्याने भेटले. खरे तर या उलटसुलट चर्चा सदनामध्ये झाल्या नसत्या तर ते राज्याच्या दृष्टीने अधिक चांगले झाले असते. या प्रकरणाची सुरूवात कुठून झाली यासंबंधी देखील मी थोडासा प्रकाश टाकतो. मागच्या अधिवेशनाच्या वेळी बेळगाव मधील सर्व नगरसेवकांचे एक शिष्टमंडळ आझाद मैदानामध्ये आले. जवळ जवळ 500 जणांचे शिष्टमंडळ होते. त्यावेळी महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी भरलेले अर्ज अतिशय जुजबी कारणे देत त्यांना काढून टाकले होते आणि अल्पसंख्यांक समाजाचा महापौर बेळगावमध्ये घोषित केला होता. लोकशाहीचा खून झाला म्हणून महाराष्ट्राने मध्यस्थी करावी, आम्हाला न्याय मिळवून द्यावा, आमची बाजू घ्यावी, दिल्ली दरबारी आमची गाऱ्हाणी घालावीत म्हणून नगरसेवकांचे एक शिष्टमंडळ मुंबईत आले होते. त्या शिष्टमंडळाला विरोधी पक्षासह माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि मी भेट दिली होती. त्यावेळी जी बैठक घेण्यात आली होती त्याला मी देखील उपस्थित होतो. त्यावेळी त्या नगरसेवकांनी भावना व्यक्त केल्या होत्या की, हा प्रश्न आता सुप्रीम कोर्टात आहे. लवकर निकाल लागत नाही. अशाच पद्धतीचा अन्याय सहन करत करत आमची एक पिढी संपली आणि आता आमची पिढीही संपत आली. आम्हाला लवकर न्याय मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. कोर्टामध्ये विलंब लागणार असेल तर तो पर्यंत बेळगाव हा भाग केंद्रशासित करावा. ही मागणी त्यांच्यातील नगरसवेकांनी केली होती. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्या आधी मी भाषण केले. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई यांनी देखील भाषण केले होते. त्या नगरसेवकांची मागणी गृहीत धरून तशीच मागणी मी पण केली. त्यानंतर तशाच स्वरूपाची सगळ्यांची भाषणे झाली. पण बेळगावच्या वर्तमानपत्रात मी अशा स्वरूपाची मागणी केली अशी बातमी आल्यानंतर तिथल्या अनेकांनी मला फोन करून विचारले की, पिढ्यानपिढ्या आम्ही भांडत आहोत, झगडत आहोत ते महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी. आम्ही येण्याने महाराष्ट्राला बोजा होईल काय ? आमची इच्छा वेगळे राज्य व्हावे, आणखी दुसरकीकडे असावे अशी नाही. आमची मूळ इच्छा जेथे आमचे नातेसंबंध आहेत, आमच्या रक्तामासाची, आमच्या संस्कृतीची, आमच्या भाषेची माणसे आहेत तेथे आम्ही येऊ इच्छितो. त्या

श्री.आर.आर.पाटील

प्रांतामध्ये येऊ इच्छितो. आम्हाला वेगळे ठेवून आणखी एक नवा मुद्दा काढू नका. अशी सातत्याने लढा देणाऱ्या माणसांनी त्यानंतर आपली भावना व्यक्त केली होती. एक तत्कालीन कारण घडले होते. आम्हाला लवकर न्याय मिळणार नसेल तर मग बेळगाव केंद्र शासित करावे अशी त्यांची मागणी होती. बेळगावमधील जनतेची इच्छा आहे की, महाराष्ट्रामध्ये आले पाहिजे आणि महाराष्ट्राचीही पहिल्या पासून धारणा आहे की, सीमावासीय बांधवांचा भाग महाराष्ट्राला जोडला गेला पाहिजे. आपल्याकडे येऊ न देता वेगळे राज्य करावे ही त्यांचीही भावना नाही. तशी महाराष्ट्राचीही नाही. पण आता निर्णय होई पर्यंत ज्या अडचणी निर्माण होत आहेत, त्या अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून केंद्र सरकारने आपले नियंत्रण ठेवावे, कर्नाटक राज्याच्या पोलिसांच्या जाचातून आम्हाला सोडवावे म्हणून त्यांनी अशा स्वरूपाची मागणी केली होती.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

बेळगाव जनतेची मूळ मागणी बेळगाव भाग महाराष्ट्राला जोडावा अशीच आहे आणि महाराष्ट्राची सुध्दा तीच इच्छा आहे. त्यांना आपल्यापेक्षा कुठेतरी बाजूला ठेवून वेगळे राज्य करावे अशी महाराष्ट्राची इच्छा नाही. हा भाग महाराष्ट्र राज्याला जोडला पाहिजे अशी महाराष्ट्रातील जनतेची सुध्दा भावना आहे. माझ्या मते या विषयावर अधिक वाद न करता काल दिल्लीत माननीय पंतप्रधानांसमोर आपण अतिशय प्रभावीपणे बाजू मांडलेली आहे. आज तेथील भागातील लोकांवर अन्याय होत आहे. मोर्चा काढला म्हणून त्यांच्यावर कलम 302 लावले जात आहे. त्यांचे मानवी हक्क सुध्दा नाकारले जात आहेत. राज्याचे शिष्टमंडळ माननीय पंतप्रधानांना काल भेटले आहे. या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयात आपणास न्याय मिळेल. कारण तो भाग आपल्या राज्याला जोडण्यासाठी राज्य पुनर्रचना आयोगाने जे निकष लावले होते त्यामध्ये भाषा, सास्कृतिक साधर्म्य, भौगोलिक सलगता या सर्व अटी बेळगाव पूर्ण करीत असल्यामुळे तो भाग नक्कीच महाराष्ट्र राज्याला जोडला जाईल. परंतु तोपर्यंत त्या भागातील नागरिकांवर अन्याय होऊ नये म्हणून तत्कालीन परिस्थितीत व्यक्त केलेले ते मत होते. बेळगाव भाग केंद्रशासित करावा की अन्य काही करावे की केंद्र सरकारने वेगळ्या पध्दतीने नियंत्रण आणावे, यापेक्षा आपले कालचे शिष्टमंडळ माननीय पंतप्रधानांना भेटले होते बेळगावच्या जनतेच्या इच्छेप्रमाणे बेळगाव भाग महाराष्ट्राला जोडावा ही त्यांची मागणी आणि तीच मागणी आपली कायम आहे. या विषयावर दुमत असता उपयोगाचे नाही. कर्नाटक राज्यात भारतीय जनता पक्षाचे राज्य आहे म्हणून येथील भारतीय पक्षाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना कोणी खिजविण्याची आवश्यकता नाही. दिल्लीमध्ये काँग्रेस आणि आघाडी पक्षाचे सरकार आहे म्हणून कोणीही त्यांच्यावर दोषारोप करण्याची आवश्यकता नाही. दिल्लीमध्ये कोणत्याही पक्षाचे सरकार असू द्या किंवा कर्नाटक राज्यात कोणत्याही पक्षाचे सरकार असू द्या बेळगाव महाराष्ट्राला देण्याच्या बाबतीत सगळ्यांच्या भूमिका या स्थानिक परिस्थितीनुसार घेतल्या गेल्या आहेत. यापूर्वी तेथे काँग्रेस पक्षाचे सरकार असताना त्यांनी बेळगाव आदि भाग महाराष्ट्राला जोडण्याची भूमिका घेतली नव्हती आणि आताही त्याठिकाणी भारतीय जनता पक्षाचे राज्य असताना ते देखील बेळगाव आदि भाग महाराष्ट्राला जोडण्याची भूमिका घेऊ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

श्कत नाही. आपल्या महाराष्ट्र राज्यात सुध्दा काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षाची विचारधारा वेगळी असताना या प्रश्नावर सर्वच पक्षांचे एकमत यापूर्वी देखील होते, आताही आहे आणि भविष्यातही राहिले पाहिजे. या विषयावर राजकारण आणून हा प्रश्न कोणी दुबळा करु नये, तसेच यास वेगळे वळण देऊ नये. सीमा भागातील लोकांवरील अन्याय थांबविण्याच्या दृष्टीने केंद्राने पावले उचलली पाहिजेत. बेळगाव महाराष्ट्रात आला पाहिजे अशी सर्वांची भूमिका आहे आणि यावर सर्वांचेच एकमत आहे. तेव्हा वादासाठी वाद वाढवू नये असे मी आवाहन करतो. महाराष्ट्रातील 10 कोटी जनता सीमावासीयांच्या पाठीमागे ठामपणे उभी आहे आणि भविष्यात उभी राहिली पाहिजे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "मुंबई शहरातील ताडदेव विभागात सि.स.नं,241,242,243, 22/26 बी, शुक्लाजी स्ट्रीट, 263/273, 275,279, बेलासिस रोड, उमरजमाल कंपाऊंड, मुंबई सेंट्रल बी.ई.एस.टी.डेपो, मुंबई- 400 008 या भूखंडावर बांधण्यात आलेल्या अनेक बहुमजली टॉवर पैकी एका भूखंडाला धर्मादाय आयुक्तांनी बेकायदेशीररित्या तसेच वक्फ बोर्डाचे कार्यकारी अधिकारी यांनी मंजुरी दिल्याचे तसेच वरील भूखंडावर 20 हजार चौ.मी.पेक्षा अधिक बांधकाम करण्यास पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेतले असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मुस्लिम बांधवांनी अल्लाच्या नावे दान केलेली जागा जवळपास 80 हजार चौ.मी. इतकी आहे. ही जागा वक्फ बोर्डाची आहे. परंतु 80 हजारापैकी 20हजार चौ.मी.जागेवर अनधिकृतपणे इमारती होत आहेत. ही ताडदेवमधील जागा आहे. माझ्याकडे शासनाचे 1957 चे राजपत्र आहे. त्यामध्ये ही जागा वक्फ बोर्डाची असल्याचे नमूद केलेले आहे. तेव्हा आपण या प्रश्नासंबंधी शासनाने निवेदन करावे अशाप्रकारचे निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "कुर्ला येथून बेपत्ता झालेल्या नऊ वर्षीय मुलीवर अत्याचार करुन खून केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, आतापर्यंत गेल्या वर्षभरात 535 मुले-मुली कुर्ला-मानखुर्द परिसरातून बेपत्ता झाल्याने जनतेच्या मनात तीव्र चिंता असल्याबाबत" य विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उप सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, परशुराम उपरकर, किरण पावसकर, वि.प.स. यांनी "अकोला महानगरपालिकेने मालमत्ता कराचे पुनर्मूल्यांकन करण्याकरिता स्थानिक कंपनीला डावलून अमरावती येथील स्थापत्य कंपनीला घर, दुकान, अपार्टमेंटचे मोजमाज करुन मालमत्ता कराचे पुनर्मूल्यांकन करण्याचे कंत्राट दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ प्रथम श्री.अजित शिगम 13.40

उपसभापती ...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी " अकोला शहरातील मध्यवर्ती जागेवर असलेल्या स्थानिक रेणुका माता मंदिर संस्थानाचे पूर्वेच्या बाजूस असलेले व्दार पोलीस विभागाने बंद केल्याने या परिसरातील रहदारीचा मोठया प्रमाणात प्रश्न निर्माण झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी यांनी "एस.टी.महामंडळ हा राज्य शासनाचा उपक्रम असून देखील महामंडळाने इतर राज्यापेक्षा 17.5 टक्के इतका जादा प्रवासी कर आकारल्याने प्रवासी संघाने दिनांक 13 जुलै 2010 पासून आझाद मैदानात केलेले धरणे आंदोलन " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री .किशनचंद तनवाणी,परशुराम उपरकर यांनी " कोकणातील मच्छिमारांना गेल्या तीन महिन्यांपासून डिझेलचा परतावा न मिळाल्याने तसेच केन्द्राकडून डिझेलची सबसिडी बंद झाल्याने जिल्हयातील मच्छिमारांवर उपासमारीची पाळी येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवानराव साळुंखे, विनोद तावडे . यांनी " व्यवसाय शिक्षण संचालक हे गेल्या 4 - 5 वर्षापासून रिक्त असलेले पद न भरल्याबाबत तसेच पूर्णवेळ निदेशकांना पूर्णवेळ शिक्षकांच्या समकक्ष वेतनश्रेणी मंजूर न केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते. यांनी " शासनाने दापचारी व परिसरातील 10 गावांची 40 वर्षापूर्वी 6800 एकर जमीन दुग्ध प्रकल्पासाठी संपादित करुन त्याठिकाणी दुग्ध विकास प्रकल्प सुरु केला असला तरी संपादित केलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ..

जमिनीपैकी काही जमीन अन्य उद्योगासाठी विकून शासनाने कायद्याचा भंग केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे.. यांनी " कोल्हापूर शहर स्वस्त धान्य परवाना धारकांनी केशरी कार्डधारकांसाठी राज्य सरकारकडून येणार गहू व तांदूळ उचलण्यास टाळाटाळ केल्याने सुमारे 50 हून अधिक स्वस्त धान्य परवाना धारक दुकानांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत दिलेल्या नोटीसांना उत्तर न दिल्याने संबंधित दुकानदारांचे परवाने अद्याप रद्द न केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी " भंडारा जिल्हयातील खैरलांजी गावच्या भोतमांगे कुटुंबातील चार जणांची हत्या केल्याच्या आरोपाखाली सत्र न्यायालयाने सहा आरोपींना सुनावलेली फाशीची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने 14 जुले 2010 रोजी जन्मपेठेत परावर्तीत करण्याबाबत दिलेल्या निर्णयामुळे राज्यात अनेक ठिकाणी नागरिकांमध्ये संताप व्यक्त झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री .चंद्रकांत पाटील,विनोद तावडे, भगवानराव साळुंखे. यांनी " कोल्हापूर जिल्हयातील भूदरगड तालुक्याचे तहसीलदार यांच्या निवास स्थानासमोर असलेल्या ब्रिटीशकालीन सागवान झाडांची अवैध तोड झाल्याने हया प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याबाबत सर्वसामान्य जनतेने केलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील,कपिल पाटील. यांनी " आदिवासी व नक्षलग्रस्त गडचिरोली, गोदिंया, अमरावती, यवतमाळ व इतर जिल्हयातील

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ..

टप्याटप्याने अनुदानावर आलेल्या माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळा तुकडयातील शिक्षक कर्मचा-यांना मे 2010 तर काही जिल्हयातील शिक्षकांना सप्टेंबर ,ऑक्टोबर 2009 पासूनचे वेतन अद्याप न मिळण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री .विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर,चंद्रकांत पाटील, गुरुमुख जगवानी. यांनी " ठाणे, बेलापूर औद्योगिक पट्टयातील सुमारे 3 हजार 500 हून अधिक मोठया कारखान्यातून ठाणे खाडीमध्ये प्रदूषित व घातक रसायनांनी मिश्रीत सांडपाण्यामुळे या परिसरातील पर्यावरण संतुलन बिघडले असून जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक ठरल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, जयंत प्र.पाटील. यांनी " मुंबई विभागात कार्यरत असलेल्या शेकडो खाजगी मराठी शाळांना गेल्या अनेक वर्षापासून मान्यता नसल्यामुळे मुंबई महापालिका आणि राज्य शासनाने त्या अनधिकृत ठरविल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री .गोपीकिसन बाजोरिया यांनी " राज्यातील शासकीय रुग्णालयातील 400 वैद्यकीय अधिका-यांच्या बदल्यांच्या जुलै 2010 च्या पहिल्या आठवडयात निर्गमित केलेल्या आदेशावर 31 मे 2010 ही तारीख टाकल्याने काही वैद्यकीय अधिका-यांनी न्यायालय अथवा मॅटमध्ये तक्रारी केल्यानंतर जवळपास 100 जणांना स्थगिती आदेश मिळण्या बाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर नियम 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

--------

## नियम 93 अन्वयेच्या निवेदनांबाबत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर त्यावर शासनाला निवेदन करण्यासंबंधी आपणाकडून निदेश दिले जातात परंतु अधिवेशन सुरु होऊन तीन चार दिवस होऊन गेलेले आहेत पंरतु अजून शासनाकडून एकही नियम 93 अन्वये निवेदन करण्यात आलेले नाही. त्यामुळे शेवटच्या दिवसात ही सगळी निवेदने केली जातील हे बरोबर नाही.

**उपसभापती** : आपल्याकडून संबंधित विभागाला निवेदन करण्यासंबंधी त्याच दिवशी सूचना देण्यात येतात.

------

## सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणे

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नवीन निवडून आलेले सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा आज वाढदिवस असल्यामुळे आपण त्यांना शुभेच्छा देऊ या.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना वाढदिवसानिमित्त आपणा सर्वातर्फे मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :कुर्ला येथील कुरेशी नगरमध्ये भिंत कोसळून तीन भावडांचा झालेला मृत्यू

मु.शी. : कुर्ला येथील कुरेशी नगरमध्ये भित कोसळून तीन भावडांचा झालेल्या मृत्यूबाबत श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई श्री.राजन तेली,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.:-

"मुंबईतील कुर्ला येथील कुरेशी नगरमध्ये दिनांक 24 जून 2010 रोजी वा त्या दरम्यान भिंत कोसळून तीन चिमुकल्या भावंडाचा झालेला मृत्यू, पावसाळयात विविध ठिकाणी मोडकळीस आलेल्या इमारती कोसळण्याच्या घटना दिवसेंदिवस मोठया प्रमाणात घडत असूनही या इमारतीच्या दुरुस्तीकडे पालिकेचे होत असलेले दुर्लक्ष, इमारती कोसळण्याच्या घटना होऊन मोठया प्रमाणात जीवित व वित्तीय हानी होणे, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण होत असलेले चिंतेचे व भीतीचे वातावरण, सबब मुंबई व उपनगरात मोडकळीस आलेल्या इमारती तातडीने दुरुस्त करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

श्री.रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, शासनाने निवेदनामध्ये प्रत्येकी रु.50,000/- याप्रमाणे एकूण दीड लाख रुपयांची मुदत दिली असे छापले आहे. हे दिसायला बरोबर वाटत नसल्यामुळे अशाप्रकारचे छापण्याची गरज नाही असे मला सुचवावेसे वाटते. माझा प्रश्न असा आहे की, मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्रचनेकरिता अफझलपूरकर समिती स्थापन करण्यात आली होती. ही समिती केव्हा स्थापन करण्यात आली? त्या समितीने अहवाल शासनाला सादर केला आहे काय? असल्यास, शासन तो अहवाल केव्हा प्रकाशित करणार आहे?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सुरुवातीला सुचविल्याप्रमाणे त्याबाबत जरुर नोंद घेण्यात येईल. त्यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, या सर्व गोष्टींबाबत सखोलरितीने सर्व्हे झाला पाहिजे याची शासनाने दखल घेतली. व त्याप्रमाणे स्लम बोर्डाचे सी.ई.ओ., जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी यांनी नुकतीच पहाणी केली. त्या पहाणीमध्ये 327 ठिकाणी भविष्यात धोकादायक परिस्थिती निर्माण होऊ शकते असे आढळून आले. एवढेच नव्हेतर त्यामध्ये 19837 झोपडया बाधित होत आहेत. त्यादृष्टीने नेमके काय करावयास पाहिजे याबाबत पहाणी अहवाल शासनाला सादर केला आहे. त्यानुसार 10181 ठिकाणी संरक्षित भिंत बांधून त्या लोकांना संरक्षण देण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. त्याचप्रमाणे 9,000 लोकांना त्याठिकाणाहून स्थलांतरित करावे लागेल. याबाबत शासन स्तरावर विचारविनिमय सुरु आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा झालेला आहे. त्याचप्रमाणे या शहरामध्ये अनेक ठिकाणी डोंगराच्या पायथ्याशी व आजूबाजूला झोपडयांमध्ये लोक रहात आहेत. त्यांच्या झोपडयांवर पावसामुळे दरडी कोसळत आहेत. त्यामध्ये जीवितहानी होत आहे. तेव्हा डोंगरांच्या पायथ्याशी अशाप्रकारच्या झोपडया बांधल्या जाऊ नयेत यासाठी आपण कोणती उपाय योजना करणार आहात?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले आहे. त्यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, शासन त्याबाबत वेळोवेळी कारवाई करीत असते. त्या भागामध्ये अनधिकृत झोपडया बांधल्या जातात त्यांच्या बाबतीत राज्य शासन व महानगरपालिकेकडून वेळोवेळी कारवाई करण्यात येत असते. अशाप्रकारे शासनाकडून जबाबदारी पार पाडण्याचे काम केले जाते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाचे व्यापक स्वरुप लक्षात घेता यावर सभागृहामध्ये दीड तास चर्चा होऊ शकते. गृहनिर्माण कायद्यातील कलम 103 बी प्रमाणे 100 महिन्यांचे भाडे भरल्यानंतर ती घरे त्या व्यक्तीच्या नावावर केली जातात, ती घरे मॉर्गेज करता येत नाहीत. अशाप्रकारे गिरण्यांच्या जुन्या चाळीतील घरे विकसित करावयाची झाली तर त्यासाठी कोणत्याही कायद्यामध्ये तरतूद नाही. त्याकरिता आपण कायद्यामध्ये दुरुस्ती करणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा प्रश्न लक्षवेधी सूचनेपेक्षा वेगळा आहे. या प्रश्नावर चर्चा करण्याकरिता जर सभागृहाने परवानगी दिली तर निश्चितपणे चर्चा घेता येईल. किंवा त्याबाबत त्यांनी जर वैयक्तिक निवेदन दिले तरी त्यावर चर्चा करता येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने शहरे व उपनगरातील जुन्या चाळींचा महत्वाचा मुद्दा समोर आलेला आहे. शहरातील जुन्या इमारतींना आपण वाऱ्यावर सोडून दिल्यानंतर उपनगराकडे कोण पहाणार हा प्रश्न आहे? झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाकरिता एस.आर.ए. योजना राबवून त्याठिकाणी 2.8 चटईक्षेत्र देऊन 225 चौ.फूटाच्या घर बांधणीस परवानगी दिली.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/ प्रथम श्री. सरफरे.... 13:50

श्री. दिवाकर रावते ....

नंतर शासनाने त्यांना 269 चौ.फु.जागा देण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी त्यांचा एफएसआय 2.5 केला. ते चांगले केले. त्यांना जास्त जागा द्यावी लागली त्यावेळेला अधिक चटई क्षेत्र दिले पाहिजे म्हणून हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मोडकळीस आलेल्या इमारतींच्या बाबतीत या सदनामध्ये तीन वेळा चर्चा झाली. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख येथे होते त्यावेळेलाही चर्चा झाली. पूर्वी 225 चौ.फुटाची घरे देण्यात येत होती. आता 300 चौ.फुट चटई क्षेत्र देण्याचे ठरविले हा चांगला निर्णय आहे. त्याच वेळेला मी या सदनात मुद्दा उपस्थित केला होता की, जे निकष झोपडपट्टयांसाठी लावण्यात आले होते तेच निकष 16000 पेक्षा जास्त असलेल्या जुन्या इमारतींसाठी लावण्यात आले तर त्यांचा विकास होईल. हा बिल्डरचा विषय नाही. या इमारतींमध्ये रहाणाऱ्या रहिवाशांचा पुनर्विकास व्हावयाचा असेल तर यासंबंधीचा निर्णय घेतला पाहिजे. त्यानंतर एक एकराचे क्लस्टर डेव्हलपमेंट काढले आणि त्यांना चार एफ.एस.आय. दिला. आता क्लस्टर कोणाचे होईल? कसे होईल? हे होतच नाही. कोणा तरी एक-दोघांचे होत असेल तर त्याबद्दल मला तक्रार करायची नाही. इमारतींचे पुनर्वसन होत असेल तर मला त्याबद्दल आनंदच आहे. तो तक्रारीचा विषय नाही. परंतु तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी असे सांगितले की, श्री. रावतेजी,.. ते रेकॉर्डवर आलेले आहे. मी तुमच्या मुद्याची तातडीने नोंद घेतो. झोपडपट्टयांसाठी जे निकष लावलले आहेत त्याच पध्दतीने यांचाही एफएसआय वाढवून देण्यात येईल. त्यानंतर मी सचिवांकडे गेलो. सचिवांबरोबर बैठक घेतली. त्यांनी प्रत्येक प्रकरणांवर उलटसुलट चर्चा केली. त्यानंतर आर्किटेक्टच्या लक्षात आले की, त्या प्रपोर्शनेटमध्ये चटई क्षेत्र वाढवावयाचे असेल तर ते 3.33 इतके होते. मी म्हटले फार वाढवून देऊ नका. त्याचा परत या मुंबईवर भार पडेल. त्यानंतर मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना असे सांगितले की, या पडणाऱ्या इमारती आहेत. या इमारतींना दर पावसाळयामध्ये धोका निर्माण होतो. म्हणून त्यांचे लवकरात लवकर पुनर्वसन करावयाचे असेल तर आम्ही त्यांचे चटई क्षेत्र तातडीने वाढवून देऊ. गेल्या दोन वर्षापासून हे सगळे चालू आहे. गेल्या अधिवेशनात सांगितले परंतु ते अजून होत नाही. मी काही दिवसांपूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांना याची आठवण करुन दिली. तेव्हा त्यांनी असे म्हटले की,ती फाईल कुठे आहे ते मला बघावे लागेल. तेव्हा मी म्हटले आपल्याच कार्यालयात ती फाईल आहे.

...2..

श्री. दिवाकर रावते....

आपण त्याकडे तातडीने लक्ष देऊन मोडकळीस आलेल्या इमारतींच्या भाडेकरुवरील टांगती तलवार लवकरात लवकर बाजूला केली तर विकासक पुढे येतील आणि येथील विकास होईल. मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, आपण निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"त्याच धर्तीवर मुंबई शहर जिल्हयातील बिगर उपकरप्राप्त जुन्या भाडे तत्वावरील इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र देण्याबाबत शासन स्तरावर विचार करण्यात येईल." येथे बिगर उपकरप्राप्त इमारतींबद्दल सांगितले आहे. मी याठिकाणी उपकरप्राप्त इमारतींच्या बाबतीत सांगत आहे. ज्यांना दिले आहे ते वाढविण्याच्या संदर्भात मागील दोन्ही माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केलेले आहे तो निर्णय येत्या पंधरा दिवसात घेण्यात येईल काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, हे अधिवेशन संपल्यानंतर एका महिन्याच्या आत हा निर्णय घेण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी म्हटल्याप्रमाणे यातील एक मुद्दा हा बिगर उपकरप्राप्त इमारतींच्या बाबतीत आहे. उपकरप्राप्त जुन्या इमारतींना अधिकचा एफएसआय देऊन त्या डेव्हलप करण्यासाठी प्रोत्साहित करीत आहोत. याबाबतीत चालू अधिवशेन संपल्यानंतर एका महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येणार आहे त्याबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. परंतु दरड कोसळणे किंवा अशा प्रकारच्या ज्या घटना घडत आहेत आणि त्यामध्ये छोटी बालके मृत्युमुखी पडत आहेत. यासंदर्भात शासनाचा एक स्टॅन्डर्ड कायदा आहे. अशा प्रकारच्या दुर्घटनांमध्ये मृत्युमूखी पडलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना एक लाख रुपये मदत देण्यात येते. या ठिकाणी असे निदर्शनास येते की, 50 हजार रुपये मदत देण्यात आलेली आहे ती एक लाख रुपये देण्यात येईल काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकारी यांच्या माध्यमातून जी भरपाई देत असतो त्या हिशेबाने ती देण्याचे काम केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तसा तूर्त तरी विचार नाही. पण असा विचार करण्यास हरकत नाही. ते करता येण्यासारखे असेल तर बघू.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या ठिकाणी जुन्या इमारतींच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 300 इमारती आज अत्यंत जीर्ण स्वरुपाच्या आहेत आणि त्या कधीही पडू शकतात. अनेक वेळा या इमारतीमधील रहिवाशी ट्रान्झिट कॅम्पमध्ये जाण्यास तयार नसतात. जे ट्रान्झिट कॅम्प बांधले जातात त्याबाबत सांगू इच्छितो की, दक्षिण मुंबईमधील ज्या इमारती आहेत त्या इमारतींमधील रहिवाशांचा कामधंदा किंवा शाळा तसेच इतर गोष्टी या भागातच असल्यामुळे त्यांना गोरेगाव किंवा इतर ठिकाणी ट्रान्झिट कॅम्प देणार असाल तर त्या ठिकाणी ते जाण्यास तयार होत नाही. अशा वेळी अशा लोकांसाठी आपण या ठिकाणी शहरामध्ये बाजूबाजूला ट्रान्झिट कॅम्प बांधणार काय ? दुसरा प्रश्न असा की, पूर्वी आपण 180 चौरस फूट जागा देत होतो. त्यानंतर आपण 225 चौरस फूट मर्यादा केली आणि आता 300 चौरस फुटाची मर्यादा केली. एवढी जागा देण्यासाठी आपण एफ.एस.आय. वाढविला. परंतु गिरगाव, काळबादेवी या भागात ज्या इमारती आहेत त्या इमारतींच्या भूखंडाचे क्षेत्रफळ इतके छोटे आहे की, त्या भूखंडावर तेवढा एफएसआय मुळातच कंझ्युम होत नाही. त्यामुळे एफएसआय वाढविला तरी अनेक योजना होत नाहीत. त्यामुळे ब्लॉक डेव्हलपमेंटच्या बाबतीत योजना घेणे आवश्यक आहे. यासाठी सरकारी पातळीवर, गृहनिर्माण विभागाच्या पातळीवर, हाऊसिंग बोर्डाच्या माध्यमातून शासन काय करणार आहे ? एफएसआयच्या बाबतीत मी आणखी एक उदाहरण देऊ इच्छितो. स्वदेशी मिलची जागा म्हाडाकडे आल्यानंतर 4 एफएसआर दिला तरी हाईटच्या रिस्ट्रीक्शनमुळे एफएसआय कंझ्यूम होत नाही. त्यामुळे कोठे किती एफएसआय द्यावयाचा याचा अभ्यास शासन करणार आहे की नाही ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला जो प्रश्न विचारला त्याप्रमाणे शहरामध्ये ट्रान्झिट कॅम्प व्हावेत यादृष्टीकोनातून मिलच्या जागेवर आपण जी बांधकामे घेतलेली आहेत त्यामध्ये येत्या दिवाळीत किमान 4 हजार ट्रान्झिट कॅम्प मुंबई शहरातील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

लोकांसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय घेतलेला आहे. येत्या दिवाळीमध्ये त्याचा शुभारंभ करण्यास हरकत नाही. ते करण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांचा दुसरा जो प्रश्न होता त्याबाबत ही गोष्ट खरी आहे की, सीआरझेडमुळे गिरगावसारख्या परिसरामध्ये मोडकळीस आलेल्या इमारतींना न्याय मिळत नाही. कारण आधीच त्यांचा 4 पेक्षा जास्त एफएसआय कंझ्युम झालेला असतो. त्यामुळे भविष्य काळात काही करता येत नाही. अशी अडचण असल्यामुळे त्यासाठीच माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पर्यावरण मंत्र्यांची भेट घेऊन भविष्यात म्हाडा बरोबर जॉइन्ट व्हेंचर करुन क्लस्टर डेव्हलपमेंट करुन सीआरझेड बाधित लोकांना न्याय देण्याच्या अनुषंगाने एक शिष्टमंडळ घेऊन जाण्याचे काम केले. तूर्त त्यांनी तत्वत: प्रतिसाद दिलेला आहे. एकदा ते नोटिफिकेशन झाले तर न्याय देता येईल. स्वदेशी मिलचा वेगळा विषय असला तरी त्याबाबतीत राज्य शासनाकडून कार्यवाही चालू आहे आणि त्याबाबतीत योग्य न्याय दिला जाईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई आणि उपनगरातील इमारतींच्या संदर्भातील विषय वारंवार या सभागृहामध्ये आलेला आहे. शोकांतिका अशी आहे की, पावसाळा आल्यानंतर मोडकळीस आलेल्या इमारतींचे सर्वेक्षण करतो. मागच्या वेळी माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेली इमारतींची संख्या तसेच त्यावेळी त्यांनी जे सांगितले ती सर्व माहिती आता माझ्याकडे आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, खरोखरच या म्हाडाच्या संदर्भात मोडकळीस आलेल्या इमारती तसेच दुरुस्तीला आलेल्या इमारती यांच्यासाठी असलेल्या ज्या समित्या आहेत त्यामध्ये बांधकाम व्यावसायिक आणि रहिवाशी अडकलेले आहेत. या समित्या खरी भ्रष्टाचाराची कुरणे झालेली आहेत. या ज्या समित्या आहेत त्यामध्ये हेरिटेज क्लिअरंस समिती आहे. क्लस्टर डेव्हलपमेंट समिती आहे. आर्क्यालॉजिकल समिती आहे. नेव्ही समिती आहे. ट्री ॲथॉरिटी समिती आहे. जुन्या चाळींच्या संदर्भात हाय पॉवर समिती आहे. म्हाडा समिती आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

घरदुरुस्ती मंडळाची समिती, एसआरए समिती, महानगरपालिकेची सुधार समिती, अशी मोठी यादी या समित्यांची आहे. या बांधकाम व्यावसायिकांकडून पैसे मिळाले तर क्लीअरंस मिळतो, पैसे दिले नाही तर फाईल दाबून ठेवल्या जातात. स्ट्रक्चरल इंजिनिअर व उंच इमारतीच्या संदर्भातील समितीचे सरकारमान्य सदस्य श्री.शैलेश माहिमतुरा यांना 15 लाख रुपयांची लाच घेताना पकडले आहे. शासनाने त्यांच्यावर काय कारवाई केली आहे ? या हाय राईज कमिटीवर मागील 10 वर्षांपासून काम करीत असलेले समिती प्रमुख यांनी अनेक उंच इमारतींना परवानगी दिलेली आहे. वरळी नाक्यावर 375 मीटरची इमारत आहे. पवई येथे 295 मीटरची इमारत आहे. गोरेगांव येथे 300 मीटरच्या इमारतीला परवानगी दिलेली आहे. म्हणजे ज्या उंच इमारती दिसत आहेत त्यामुळे मुंबई शहराचे वैभव वाढणार आहे असे सांगितले जाते. परंतु त्या इमारतींचा पाया किती भुसभुशीत आहे ते सांगत आहे. 15 वर्षांची लाच घेताना पकडल्यानंतर त्याच समितीवर गेली 10 वर्षे या समितीत स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणून काम करणा-या व्यक्तीची ही परिस्थिती आहे. अशा किती तरी उत्त्युंग इमारतींना परवानगी देण्यात आलेली आहे. सध्याच्या 70 मीटरच्या निकषा ऐवजी 125 मीटर उंचीपर्यंत इमारती बांधण्याला परवानगी दिली आहे त्याची चौकशी केली जाईल का ? एवढा मोठा भ्रष्टाचार झाल्यानंतर त्यांच्यावर काय कारवाई केली आहे, त्यांच्याशी संबंधित असलेल्या अधिका-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे, त्यांनी चुकीच्या इमारतींना परवानगी दिली असेल तर त्यासंबंधीही शासन चौकशी करणार का ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये व उपनगरातील जुन्या इमारतींचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने एक जी.आर.काढला. त्या जी.आर.मध्ये 1.33 एफएसआय दिला आहे. परंतु टीडीआर माफिया लोकांनी कोर्टात जाऊन त्याला स्टे घेतला. नंतर हे प्रकरण सुप्रीम कोर्टातून पुन्हा हायकोर्टात आले होते. त्यामुळे शासनाने जी.आर.काढला, पण कायद्यात दुरुस्ती केली नाही. म्हणून उपनगर व शहरामध्ये 1.33 इतका एफएसआय सारखा असावयास पाहिजे. मंत्री महोदय, मुंबई उपनगरामध्ये 1.33 एफएसआय देण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करणार आहेत

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ SBT/ KTG/

श्री.विजय सावंत.....

काय ? तशी कायद्यात दुरुस्ती न केल्यामुळे लोकांचे नुकसान होत आहे. म्हणून जुन्या चाळींचे पुनर्वसन होणे जरुरीचे आहे. परंतु त्यासाठी टीडीआरचा फायदा घेता येत नाही. या टीडीआरचा भाव 1200 ते 1500 रुपये पाहिजे तो 3000 ते 3500 भाव होत आहे. म्हणून 1.33 चा जी.आर.काढला आहे त्याऐवजी कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. हा कायदा किती दिवसामध्ये केला जाणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, एमआरटीपीमध्ये दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, शासनाकडून लवकरात लवकर याबाबतची कार्यवाही केली जाणार आहे. विशेष करुन उपनगरामध्ये टीडीआरमुळे अनेक भाडेकरुंचे हाल होत आहेत. हा विषय नगरविकास विभागाशी संबंधित आहे. नगरविकास विभागाशी संबंधित असलेल्या एमआरटीपीमध्ये दुरुस्ती करण्याची बाब विचाराधीन आहे असे मी म्हटले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जुन्या इमारतींचा हा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी लवकरात लवकर म्हटले आहे त्याला अर्थ नाही. यासाठी कायद्यातील दुरुस्ती पुढील आठवडयामध्ये करणार की अधिवेशन संपल्यानंतर अध्यादेश काढणार ? हा विषय महत्वाचा आहे. सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. जुन्या चाळींचा विकास थांबलेला आहे. यासंबंधी अध्यादेश काढला नाही तर विकास होणार नाही. शासन कायद्यात दुरुस्ती करीत नसल्यामुळे प्रत्येक विषयात कोर्टात शासनाची पिछेहाट होत आहे. शिक्षणाच्या बाबतीत तेच झाले, जेम्स लेन प्रकरणात तेच झाले. न्यायालयाचे म्हणणे आहे की, शासनाने कायदा करावा. जुन्या चाळींमध्ये एक स्टेअर केसचा प्रश्न निर्माण झाल्यावर दोन मजले कमी होतात. सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, या सदनाच्या माध्यमातून जुन्या चाळींसंबंधी शासन कायद्यात बदल करणार का ? हा बदल 15 दिवसात, महिन्यात करणार का ते सांगितले पाहिजे, ते आपल्याकडून अपेक्षित आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

श्री. भास्कर जाधव : ही गोष्ट खरी आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सातत्याने ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे. या विषयी चर्चा झालेली आहे. बैठका झालेल्या आहेत. परंतु अंतिम निर्णय अजून झालेला नाही. हा निर्णय शासनाकडून लवकर होणे अपेक्षित आहे.

श्री. रामदास कदम : मोडकळीस आलेल्या 16 हजार इमारतींच्या दुरुस्तीसाठी राज्य शासनाने केन्द्र शासनाकडे 3 हजार कोटीची मागणी केलेली आहेत. त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. सचिन अहिर : वर्षाला 100 कोटी किंवा पीएमजीपी प्रमाणे नीधी मिळेल का अशी मागणी केलेली होती. या संदर्भात राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. 1200 चे लिमिट 2000 पर्यन्त केल्यानंतर रिपेअर बोर्डाला जो निधी द्यायला पाहिजे तो दिला जात नव्हता. आता राज्य शासनाने रिपेअर बोर्डाची 100 कोटीची जी मागणी आहे त्याबाबत निर्णय घेतलेला आहे. ती मागणी मान्य होऊन जुन्या इमारती रिपेअर करण्यासाठी निधीची अडचण निर्माण होणार नाही याची काळजी राज्य शासनाने घेतलेली आहे.

श्री. रामदास कदम : माझी अधिकृत माहिती आहे की, राज्य शासनाने 3 हजार कोटीची मागणी केन्द्राकडे केलेली आहे. पावसाळयामध्ये ठिकठिकाणी जुन्या इमारती कोसळून जीवित आणि वित्त हानी होते. राज्याकडून 90 हजार कोटीचा महसूल केन्द्राला जात असताना केन्द्राकडे 3 हजार कोटीची मागणी करण्यास काय हरकत आहे ? तेव्हा अशा प्रकारची मागणी राज्य शासन केन्द्र शासनाकडे करणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : अशा प्रकारची मागणी करता येईल का हे तपासून तशा प्रकारची मागणी केली जाईल. राज्य शासनाने 3 हजार कोटीची मागणी केन्द्राकडे केलेली आहे किंवा कसे याबाबतची माहिती माझ्याकडे नाही. दरवेळी पावसाळा आला की जुन्या इमारतींची दुरुस्ती करावी लागते. 2008 साली मोडकळीस आलेल्या इमारतीच्या अपघातांची संख्या 79 होती, 2009मध्ये ती 35वर आली आणि 2010मध्ये ती 24वर आलेली आहे. हे प्रमाण कमी कमी करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अमळनेर, जि.जळगाव येथील दादावाडीमधील जैन मंदिरात दरोडा टाकून मूर्तीची केलेली चोरी व पहारेक-याचा केलेला खून

**मु.शी.** : अमळनेर, जि.जळगाव येथील दादावाडीमधील जैन मंदिरात दरोडा टाकून मूर्तीची केलेली चोरी व पहारेक-याचा केलेला खून यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, रामनाथ मोते व संजय केळकर, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमळनेर, जि.जळगाव येथील दादावाडीमध्ये असलेल्या जैन मंदिरात दिनांक २५ जून, २०१० रोजी दरोडेखोरांनी दरोडा टाकून पचंधातुच्या ९ मुर्तीसह दीड ते दोन लाख रुपयांचा ऐवज लुटणे, सदर दरोडेखोरांनी पहारेकऱ्याचा खून करुन घातलेल्या दरोडयामुळे या भागातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, तसेच असुरक्षिततेची भावना, संपूर्ण जळगाव जिल्हयामध्ये गेल्या ६ महिन्यात विविध मंदिरे, वाडया, वस्त्या व सराफांच्या दुकानांवर पडलेले दरोडे, या दरोडयांमध्ये दरोडेखोरांनी केलेल्या मारहाणीत निरपराध नागरिकांचे झालेले मृत्यू, याप्रकरणी शासनाच्या झालेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे दरोडयात होत असलेली वाढ, परिणामी नागरिकांमध्ये पोलिसांबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.) ..3..



MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : आरोपी दोन अज्ञात दरोडखोर आहेत. त्यांनी पहारेक-याचा खून केलेला आहे. अशा प्रकारच्या घटना जळगाव आणि खानदेशमध्ये घडलेल्या आहेत. म्हणजे भुरट्या चोरांनी सोनसाखळी चोरली याप्रमाणे उत्तर दिलेले आहे. अशा प्रकारे कोकणामध्येही धूतपापेश्वर आणि अन्य मंदिरातील मूर्ती चोरीला गेलेल्या आहेत. दरोडेखोरांनी टाकलेल्या दरोड्यामध्ये माणसे मारली गेली आहेत. अजून त्या घटनांचा तपास लागलेला नाही. तपास यंत्रणा तपास करण्यास कमी पडत आहे. माणसांना मारले जात आहे. माणसे सुरक्षित नाहीत आणि देव सुध्दा सुरक्षित नाहीत. अशा घटना घडू नयेत म्हणून ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन शासनाने दिलेले होते. त्याप्रमाणे शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ? आंतरराष्ट्रीय टोळयांचा हात असल्यामुळे अशा प्रकारचे दरोडे, खून, मंदिरातील मूर्तींच्या चो-या वारंवार होत आहेत. तेव्हा यादृष्टीने पोलीस यंत्रणेने तपास केलेला आहे काय ?

श्री. रमेश बागवे : ही गोष्ट खरी आहे की, शेजारच्या गुजराथ आणि मध्यप्रदेश राज्यातील सराईत दरोडेखोर आपल्या राज्यात येऊन मोठे दरोडे घालून आणि चो-या करुन जातात. त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक निर्माण केलेले आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2......... श्री.रमेश बागवे.......

अशा पथकांमध्ये वाढ करुन परराज्यात जाऊन गुन्हेगारांना पकडण्याचा प्रयत्न केलेला आहे. गुन्हा घडल्याबरोबर संपूर्ण जिल्हयामध्ये नाकाबंदी करुन, घटनास्थळी श्वानपथक, फिंगर प्रिंट पथक बोलावून त्यांची मदत घेऊन गुन्ह्यामध्ये वापरलेली हत्यारे, रुमाल यांची तपासणी केली आहे. जो सशयित गुन्हेगार पकडण्यात आला त्याचा रिमांड घेऊन तपासणी केली आहे. तपासामध्ये काही निष्पन्न न झाल्याने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिरामध्ये अशा प्रकारच्या चोऱ्या होतात, या चोऱ्यांबाबत गुन्हेगार सापडत नाहीत. म्हणून हा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, संशयित गुन्हेगारांच्या शोधात पोलीस पथके केव्हा पाठविली?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, दिनांक 25.6.2010 रोजी गुन्हा घडला. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी पथके पाठवून संबंधित गुन्हेगारांच्या तपासासाठी जोरदार मोहीम सुरु केली.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, निवेदनातील शेवटच्या दोन ओळीत म्हटले आहे की, मंदिरे, वाड्या, वस्त्या, सराफांच्या दुकानांवर दरोडा पडलेला नाही. ही लक्षवेधी सूचना मंदिरातील दरोड्याच्या संदर्भात विचारण्यात आलेली आहे. 13 जुलै, 2010 रोजी पारोळा येथे बालाजी मंदिरात दरोड्याची घटना घडली. 27 एप्रिल, 2010 रोजी जळगाव जिल्हयात राजेंद्र ज्वेलर्स या दुकानावर दरोडा पडला. या घटनेबाबतचा तारांकित प्रश्न क्रमांक 7264 आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये अंतर्भूत आहे. जळगाव जिल्हयामध्ये पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत. सन्माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मी शासनाला विनंती करु इच्छितो की, जळगाव जिल्हयातील रिक्त पदे त्वरेने भरण्याच्या संदर्भात शासन कार्यवाही करणार आहे का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, चुकीचे उत्तर का आले याबाबत संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. मलाही ही बाब पटते. ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्राच्या सीमेवर जे जिल्हे आहेत या जिल्हयांमध्ये अलिकडच्या काळात दरोड्यांचे प्रमाण वाढत असल्याचे आढळून येत आहे. याची प्रमुख कारणे म्हणजे राज्याच्या आणि सीमेवरील राज्यांच्या जिल्हयातील पोलिसांमध्ये चांगल्या पध्दतीचा समन्वय नसतो. त्या राज्यातील गुन्हेगारांची माहिती आपल्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील पोलिसांकडे उपलब्ध नसते. पलिकडच्या राज्यातून यायचे, गुन्हा करायचा आणि आपल्या राज्यात निघून जायचे असे प्रकार घडतात. त्यामुळे गुन्हेगारांचा पकडण्याचा प्रयत्न करुनही गुन्हयाचा तपास लागत नाही. सीमेवरील जिल्हयाच्या पोलिसांनी जाणीवपूर्वक शेजारच्या राज्यातील गुन्हेगारांची माहिती घेणे, त्याची नोंद ठेवणे, त्यांचे फोटो असतील तर ते प्राप्त करुन सर्व पोलीस ठाण्यांना देणे, गुन्हेगारांची माहिती होण्याच्या दृष्टीने माहितीची देवाणघेवाण करणे या गोष्टींना प्राधान्य दिले असून तशा सूचना दिल्या आहेत. जळगाव जिल्हयामध्ये गुन्हयांचे आणि दरोड्याचे वाढलेले प्रमाण आणि त्या गुन्हयांमध्ये आतापर्यंत जे आरोपी सापडले ते मध्यप्रदेशमधील आढळून आलेले आहेत. त्या राज्याकडून चांगल्या प्रकारचे सहकार्य आपल्या राज्यातील पोलिसांना मिळत आहे. त्या ठिकाणी असलेल्या पोलिसांची संख्या लोकसंख्येच्या मानाने निश्चितच कमी आहे. अधिकाऱ्यांची पदे सुध्दा मोठया प्रमाणात रिक्त आहे. जवळजवळ 2500 पीएसआयची पदे या राज्यात रिक्त आहेत. मध्यंतरी चार वर्षे एमपीएससीचे कामकाज ठप्प झाले होते आणि अधिकारी मोठया प्रमाणात सेवानिवृत्त झाले. नवीन पदे भरली गेली नाहीत. आता एमपीएससीने गती घेतली आहे. आपल्याकडे ट्रेनिंग कॅपॅसिटी नसल्यामुळे सर्व रिक्त पदे एकाच वेळी भरु शकत नाही. 600 उमेदवारांची यादी एमपीएससीने शासनाकडे सादर केली आहे. परंतु ही बाब न्यायालयीन प्रक्रियेमध्ये अडकलेली आहे. शासनाचा प्रयत्न आहे की, महाराष्ट्रामध्ये पोलीस शिपायांसाठी जी प्रशिक्षण केंद्रे आहेत, त्यातील एक प्रशिक्षण केंद्र पीएसआय पदाच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये कन्व्हर्ट करण्यात यावे. 2500 पदांचा बॅकलॉग शिल्लक आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.........

येत्या तीन वर्षात ही प्रक्रिया पूर्ण करुन तातडीने ही पदे भरण्यात येतील. तसेच कोर्ट प्रक्रिया पूर्ण करुन जी यादी एमपीएससी कडून आलेली आहे त्या लोकांना नेमणुका दिल्या जातील. तसेच जळगांव जिल्हयासाठी लोकसंख्येच्या तुलनेत पुढील वर्षाच्या भरतीत निश्चितपणे प्राधान्य देण्यात येईल. पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून राज्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही केली जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, चिरवणी, देहू रोड (जि. पुणे) येथील दुर्गा माता मंदिरातील देवीची मूर्ती व श्रीकृष्णाची चांदीची मूर्ती मार्च, 2010 मध्ये चोरीला गेली अद्यापही आरोपी सापडले नाहीत. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील चिंपखरी येथील दत्त मंदिरातील दानपेटीतील रोख रक्कम दानपेटीसह चोरट्यांनी पळविली. पुणे जिल्ह्यातील निमगांव (ता. खेड) येथे खंडोबाचा मुखवटा चोरीला गेला त्याचाही अद्याप तपास पूर्ण झालेला नाही. पोलादपूर-पाचाड (जि. रायगड) येथील जिजामाता माँ साहेबांचा पंचधातू पुतळा चोरीला गेला. रामेश्वराची 25 किलो चांदीची मूर्ती देवगड-विजयदुर्ग येथून चोरीला गेली, अद्यापही आरोपी सापडले नाहीत. त्यानंतर 5 सप्टेबर, 2009 रोजी दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धूतपापेश्वर मंदिरातील पुरातन मूर्तीची चोरी झाली, त्याचाही तपास पूर्ण झालेला नाही. राजापूर (जि. रत्नागिरी) येथील दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरातन मूर्तीची चोरी 12 फेब्रुवारी, 2009 ला झाली आहे. अशा प्रकारे अनेक ठिकाणी चोऱ्या झालेल्या आहेत. प्रत्येक मंदिरातील चोरीबाबत लक्षवेधी सूचना आपण देत नाही. कारण सभागृहाच्या वेळेची मर्यादा आम्ही सर्व जाणून आहोत. ज्याप्रमाणे राज्यस्तरावर विविध गुन्ह्यांमध्ये उपमहानिरीक्षकाची जबाबदारी असते त्याच धर्तीवर उपमहानिरीक्षकांच्या माध्यमातून मंदिरातील चोऱ्यांच्या तपासाच्या संदर्भात आढावा घेऊन लवकरात लवकर चोर सापडावेत यादृष्टीने शासन प्रयत्न करणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, मध्यंतरी मंदिरातील मूर्तींच्या चोऱ्या अनेक ठिकाणी झाल्या. रत्नागिरी येथील चोरीप्रकरणी तेथील पोलिसांनी आरोपी पकडले आहेत. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, मंदिरातील मूर्ती मौल्यवान असतात व त्या विकून मोठ्या प्रमाणात पैसे मिळतात. मंदिरात ज्या पध्दतीने दक्षता घ्यायला पाहिजे ती घेतली जात नाही. म्हणून शासनाने असे ठरविले आहे की, ज्या ठिकाणी चोऱ्या होण्याची शक्यता आहे त्या सर्व ठिकाणांचे सर्व्हेक्षण करुन किती



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

ठिकाणी सुरक्षा आवश्यक आहे, किती ठिकाणी मॅक्सिमम प्रिकॉशन घेतली पाहिजे याचा विचार करावा लागेल. काही ठिकाणी मंदिराचे नुसते दार ओढले तरी ते उघडते अशा प्रत्येक ठिकाणी पोलीस प्रोटेक्शन शासन देऊ शकत नाही. परंतु मंदिर समितीने सुध्दा याबाबत दक्षता घेणे अभिप्रेत असते. या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या माध्यमातून अशा मंदिर समित्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात येतील. शेवटी मूर्तीची किंमत आपण पैशात मोजत नाही तर लोकांच्या भावनेचा तो प्रश्न असतो. कारण तेवढ्याच रकमेची संपत्ती चोरीला गेली तरी लोक रस्त्यावर येत नाहीत परंतु मंदिरातील मूर्तीची किंमत पैशात करता येत नाही हे ध्यानात घेऊन सर्व पोलीस अधीक्षकांना याबाबतीत प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री. रामनाथ मोते : महोदय, जैन मंदिरात जी चोरी झाली त्याला दरोडा म्हणण्याऐवजी उत्तरात रात्रीची घरफोडी असे म्हटले आहे. उत्तरात शासनाने मान्य केले आहे की चोरट्यांनी पहारेकऱ्याचे हातपाय बांधले आणि मंदिरात प्रवेश केला. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, या मंदिरातील वॉचमेनने आपल्याला मृत्युपूर्व जबानीमध्ये दरोडेखोरांबाबत पोलिसांना काही माहिती दिली आहे काय ? तसेच उत्तरात चोरांची संख्या 2 होती आणि तोंडाला फडके लावलेले होते आणि त्यांनी विशिष्ट हत्याराने मंदिराचे कुलूप तोडले, हे सांगितलेले आहे. ही सर्व माहिती शासनाला कोणत्या माध्यमातून मिळाली आहे ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, अशा प्रकारचा माहितीचा सोर्स उघड करणे योग्य होणार नाही पण या मंदिरातील वॉचमेन श्री. अण्णा त्र्यंबक कुलकर्णी हे असून ते वयोवृध्द आहेत, त्यामुळे चोरांना पकडणे वगैरे त्याला शक्य नव्हते. म्हणून पोलीस अधीक्षकांकडून मंदिर समित्यांना जे मार्गदर्शन करण्यात येईल त्यात मंदिरातील वॉचमेन हा प्रतिकार करण्याइतपत तरी असावा अशाही सूचना दिल्या जातील.

-------

**<u>लक्षवेधी सूचना क्र. 3 बाबत</u>**

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. 3 पुढे ढकलण्यात येत आहे.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :कळवणी, तालुका खेड, जि.रत्नागिरी येथील हॉस्पिटलच्या स्टाफसाठी व डॉक्टरांसाठी क्वाटर्सची सोय नसणे

**मु. शी.** :कळवणी, तालुका खेड, जि.रत्नागिरी येथील हॉस्पिटलच्या स्टाफसाठी व डॉक्टरांसाठी क्वाटर्सची सोय नसणे यासंबंधी सर्वश्री रामदास कदम,किरण पावसकर, परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" "कळवणी, तालुका-खेड, जिल्हा- रत्नागिरी येथे १०० खाटांचे हॉस्पिटल उद्घाटन होऊन देखील डॉक्टरांसाठी लागणाऱ्या आवश्यक असणाऱ्या स्टाफ क्वाटर्सची सोय नसणे, स्टाफ क्वाटर्स बांधण्यासाठी असलेल्या आराखड्याला प्रशासकीय मंजुरी देऊन निविदा मागवणे, तथापि सदर बांधकामासाठी लागणाऱ्या ३०५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होत नसणे, सदर निधी उपलब्धतेसाठी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

प्रा.फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय,खेड तालुक्यातील रुग्णालयाचे उद्घाटन विधानसभेचे माजी अध्यक्ष माननीय बाबासाहेब कुपेकर यांच्या हस्ते झाले होते. या हॉस्पिटलसाठी शासनाने 63 पदे मंजूर केलेली होती. एक वर्ष उलटून गेल्यानंतर सुध्दा या ठिकाणची 63 मंजूर पदे भरली गेली नाहीत. या ठिकाणी स्टाफ क्वार्टरची आवश्यकता असतांना सुध्दा या ठिकाणी स्टाफ क्वार्टर बांधण्यात आलेली नाहीत. जोपर्यंत स्टाफ क्वाटर्स बांधली जात नाही तोपर्यंत त्या ठिकाणी डॉक्टर्स येणार नाहीत. या ठिकाणच्या इमारतीसाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे तसेच स्टाफ क्वाटर्सना मंजुरी मिळालेली आहे. या ठिकाणच्या हॉस्पिटलच्या इमारतीसाठी फंड उपलब्ध झ ालेला आहे काय ? तसेच या ठिकाणी जी 63 पदे मंजूर झालेली आहेत ती पदे आपण केव्हापर्यंत भरणार आहात ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, कळवणी, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी येथील हॉस्पिटलसाठी 88 पदे सँक्शन असून 20 पदे कार्यरत आहेत. सदर हॉस्पिटल गावापासून थोडे लांब अंतरावर आहे. सदर हॉस्पिटल हे 100 खाटाचे आहे. सदर हॉस्पिटल गावापासून लांब अंतरावर आहे, गावातील लोकांसाठी गैरसोयीचे आहे. या ठिकाणी रोजची ओपीडी 50-60 असून नॉर्म्स प्रमाणे प्रत्येक डॉक्टरने 50-60 ओपीडी काढली पाहिजे. या ठिकाणी एकूण 3 मेडिकल डॉक्टर आहेत. या डॉक्टरांसाठी जो पुरेसा फ्लो पाहिजे तो या ठिकाणी नाही ही वस्तुस्थिती आहे. या हॉस्पिटलसाठी ज्या पोस्ट सँक्शन आहेत त्या पोस्ट भरण्यात आलेल्या नाहीत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांना अधिका-यांनी चुकीची माहिती दिलेली आहे. हे हॉस्पिटल हायवेला लागून आहे. सदर हॉस्पिटल कशेळी घाटाला लागून आहे. या घाटामध्ये मोठया प्रमाणात अपघात होत असतात त्यामुळे मुद्दाम हे हॉस्पिटल आपण मंजूर करुन घेतलेले आहे. या हॉस्पिटलमधील रुग्णवाहिका बंद पडलेली असून या रुग्णवाहिकेसाठी चालक सुध्दा नाही. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, या हॉस्पिटलसाठी 3 वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे परंतु या ठिकाणी एकही डॉक्टर राहत नाही. हे डॉक्टर्स खेडमध्ये असतात. या हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स नसतांना या ठिकाणची ओपीडी 50-60 कशी काय असू शकते ? या ठिकाणी डॉक्टरांना राहण्यासाठी निवास स्थानाची सोय नसल्यामुळे या ठिकाणी डॉक्टर राहत नाही. जोपर्यंत डॉक्टर्स या ठिकाणी राहणार नाही तोपर्यंत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

या ठिकाणच्या ओपीडीमध्ये वाढ होणार नाही. या ठिक्‌ाणच्या हॉस्पिटलच्या इमारतीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे निधी उपलब्ध झाला पाहिजे त्यामुळे या इमारतीसाठी निधी उपलब्ध झालेला आहे की, नाही ?. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. या ठिकाणचा एखादा माणूस सिरीयस झाला तर त्याला मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये आणावे लागते. रत्नागिरीशिवाय त्या ठिकाणी दुसरे कोणतेही रुग्णालय नाही. सदर हॉस्पिटल योग्य पध्दतीने सुरु झाले तर त्या हॉस्पीलटलचा फायदा मंडणगड, खेड, दापोली,पोलादपूर, चिपळूण, गुहागर या सहा तालुक्यांना होणार आहे. या लक्षवेधीच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना ज्या अधिका-याने चुकीची माहिती दिलेली त्या अधिका-यावर काय कारवाई केली जाणार आहे ?या ठिकाणी 63 पदांना 5 ऑगस्ट, 2009 रोजी मान्यता मिळालेली असतांना सुध्दा या ठिकाणची पदे भरण्यात आलेली नाहीत. स्टॉफ क्वाटर्ससाठी प्रशासकीय मान्यता देखील मिळालेली आहे. या स्टॉफ क्वाटर्ससाठी 3.50 कोटी रुपयांची आवश्यकता आहे त्याला आपण तातडीने मंजुरी देणार आहात काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, स्टाफच्या संदर्भातील व या ठिकाणी किती ओपीडी आहे याची माहिती मी सभागृहासमोर ठेवलेली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मुंबई-गोवा महामार्गावर हे रूग्णालय आहे. ज्या अधिकाऱ्याने आपल्याला चुकीची माहिती दिलेली आहे, त्यांच्यावर आपण कारवाई करावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती आता दिली आहे त्याबद्दल दुमत नाही. तरी पण मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, जर अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर जरूर कारवाई करण्यात येईल. वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंडळ कार्यालयामार्फत भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. वैद्यकीय अधीक्षकांची पदे MPSC मार्फत भरण्याची तसेच पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. पदे भरण्याची आमची कार्यवाही सुरूच आहे. आम्ही भरतीची प्रक्रिया थांबवली आहे असे नाही. ती प्रोसेसमध्ये आहे. येथे निधीबद्दल देखील विचारणा करण्यात आली. निधीला तत्त्वत: मान्यता DPDC ने दिली आहे. पण निधी उपलब्ध केला नव्हता. आता स्टेट फंडकडून आता निधी मंजूर झालेला आहे. जसजसे आपले काम होईल तसतसा निधी उपलब्ध करून दिला जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शासनाने 5 ऑगस्ट 2009 मध्ये निर्णय घेतला आहे. असे असताना एक वर्षामध्ये आपण जर पदे भरणार नसाल तर या शासन निर्णयाला काय आग लावायची काय ? मग हे शासन निर्णय कशाला काढता. मला येथे उत्तर मिळणार नसेल तर मग मी काय करावे ? माननीय मंत्रिमहोदयांनी प्रोसेस सुरू आहे असे सांगितले. म्हणजे नमके काय? शासन निर्णय निर्गमित होऊन एक वर्ष झाले. तरी देखील वर्ष भरात पदे भरली जात नाहीत. तेव्हा सदर पदे आपण किती दिवसात भरणार आहात ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, वेगवेगळी पदे आहेत आणि त्यांची वेगवेगळ्या स्तरावर भरती होते. MPSC मार्फत पदे भरण्यासंबंधीचे रिक्वीझिशन झालेले असून काही पदांबाबत जाहिरात देखील दिलेली आहे. काही पदांबाबत स्टे होता. काही पदे ही पदोन्नती भरावयाची आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शासन निर्णय निर्गमित होऊन 1 वर्ष झालेले आहे. निधी देखील मंजूर झालेला आहे. मग एक वर्षापासून शासनाला कोणती अडचण आहे ? कोकणाकडे लक्ष द्यायचे नाही असे शासनाने ठरविले आहे काय ? कोकणातील जनतेने काय पाप केले आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सभागृहात शांतता राखावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील डॉक्टरांसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. ही परिस्थिती कोकणापुरती मर्यादित नाही. संपूर्ण राज्यामध्ये ही परिस्थिती आहे. मुंबईतील सर्व आमदार निवासांमध्ये गेले महिनाभर डॉक्टरच नाही. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना तिथल्या डॉक्टरांची बदली करण्यात आली आहे. तेथे दुसऱ्या डॉक्टरांची नियुक्ती केली नाही. राज्यामध्ये आता 400 डॉक्टरांच्या बदल्या झाल्या आहेत. आमच्या अकोल्याच्या हॉस्पिटलमधील सर्व डॉक्टरांच्या बदल्या झाल्या. त्यांच्या जागेवर मेडिकल कॉलेजमधील प्रोफेसर देण्यात आले. ते रोज नागपूरहून UP-DOWN करतात. आज दवाखाने ओस पडत चालले आहेत. आज आरोग्य खात्याचे काय धोरण आहे ? ह्या 400 बदल्या अन्यायकारक आहेत म्हणून कर्मचारी मॅटमध्ये गेले. त्यापैकी 150 बदल्यांना स्टे मिळाला आहे. ह्या बदल्या करण्यामागे कोण आहे ? मंत्री कधी पाहतात की नाही ? संपूर्ण राज्यात आरोग्याचा गोंधळ सुरू आहे. पदे रिक्त आहेत. ती भरली जात नाही. मनोरा आमदार निवासातील डॉक्टरांची बदली होते. तेथे दुसरा डॉक्टर दिला जात नाही. जिल्हा रूग्णालयातील सर्व डॉक्टरांच्या बदल्या करण्यात आल्या. तेथे मेडिकल कॉलेजेसमधील प्रोफेसर अपॉईंट केले. पण ते डॉक्टर दवाखान्यात येत नाही. 8-8 दिवस रूग्णांना आरोग्य सेवा मिळत नाही, ही स्थिती आहे. 400 डॉक्टरांची बदली केली आहे त्यांना आता कायम ठेवावे. त्यांच्या अंतर्गत बदल्या करा. नागपूरचा प्राफेसर येथे, येथील डॉक्टर तेथे असे करू नये. ज्या दवाखान्यात डॉक्टर पाहिजेत तेथे डॉक्टर नाहीत. कोकणातील दवाखाने ओस पडत चालले आहेत. तिच परिस्थिती आज विदर्भामध्ये आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माझी माननीय राज्यमंत्री महोदयांना सूचना आहे की, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. हा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सुटेल असे वाटत नाही. तेव्हा पुढील दोन दिवसांत या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांबरोबर आपल्या दालनात एक बैठक लावावी...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयावर सभागृहात एक तासाची वेगळी चर्चा घडवून आणावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सभागृहात या विषयावर एक तासाची चर्चा घडवून आणली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या चर्चेच्यावेळी सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांना देखील उपस्थित राहण्यास सांगावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी..

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या संदर्भात आपण सभागृहात एक तासाची चर्चा घेत आहोत, तेव्हा लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचा प्रश्न येत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही चर्चा फक्त कोकणापुरती झाली तर महाराष्ट्रावर अन्याय होईल.

**उप सभापती** : आपण चर्चेच्या अनुषंगाने इतर विषय देखील मांडतो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** :मौजे हर्दखळे, व रिंगणे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या गावामध्ये केंद्र पुरस्कृत एकात्मिक पडीक जमीन विकास योजना राबविताना कृषी अधिका-यांनी केलेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : मौजे हर्दखळे, व रिंगणे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या गावामध्ये केंद्र पुरस्कृत एकात्मिक पडीक जमीन विकास योजना राबविताना कृषी अधिका-यांनी केलेला भ्रष्टाचार याबाबत श्री.संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मौजे हर्दखळे व रिंगणे, ता. लांजा, जि.रत्नागिरी, या गावामध्ये केंद्र पुरस्कृत एकात्मिक पडीक जमीन विकास राबविताना जिल्ह्याच्या कृषी विभागाने त्यामध्ये दोन कोटी रकमेपेक्षा जास्त रकमेचा भ्रष्टाचार केलेला असल्याचे व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, दिनांक 2.5.2009 पत्रान्वये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी यांचेकडून व्यवहारातील त्रुटींबाबत खुलासाही मागविलेला आहे. परंतु या विभागात गैरव्यवहाराची पाळेमुळे इतकी खोल रुजली आहेत की, भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना प्रकल्प संचालकांच्या पत्रास उत्तर देणे योग्य वाटले नाही. याबाबत मी स्वत: माननीय कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनाही लेखी निवेदन देऊन व कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत कारवाईची मागणी केलेली आहे.

सदर विषय अतिमहत्वाचा असल्याने सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील गिरण्यांना लावण्यात येत असलेल्या आगी

**मु. शी.** : मुंबईतील गिरण्यांना लावण्यात येत असलेल्या आगी याबाबत श्री. रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.रामदास कदम यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

मुंबई शहर हे फार पूर्वी गिरण्यांचे शहर म्हणून ओळखले जात होते. देशाची आर्थिक राजधानी मुंबई झाल्यानंतर मुंबई श्हरातील जमिनीला सोन्याचा भाव आल्याने गिरणी संपाचे निमित्त करुन या गिरण्या बंद पडल्या. गिरणी मालकानी या जमिनीचा विकास करण्याच्या नावाखाली संबंधित खात्यात अर्थपूर्ण व्यवहार करुन या जमिनी विकण्याचा घातलेला घाट, ज्यावेळी गिरणी कामगाराच्या लक्षात आल्यावर त्यावर तोडगा म्हणून या गिरणी मालकांनी गिरण्यांना आग लावण्याच्या घटना घडवायला सुरुवात केली. दिनांक 31 मार्च, 2004 रोजी स्वदेशी मिल, चुनाभट्टी, दिनांक 2 जून 2005 सिताराम मिल, लोअर परळ, दिनांक 2 मे, 2006 रोजी बॉम्बे डाईंग मिल, दिनांक 25 जानेवारी, 2008 रोजी कमला मिल, लोअर परळ, दिनांक 2 जून 2008 रोजी कमानी आईल मिल, लालबाग, दिनांक 24 नोव्हेंबर, 2009 रोजी न्यू ग्रेट ईस्टर्न मिल भायखळा, दिनांक 20 जानेवारी, 2010 रोजी गोल्ड मोहर मिल, दादर, अशा सात मिलला लागलेल्या आगी, या सातही आगीबाबतचा अहवाल आतापर्यंत प्राप्त झालेला नसणे, दिनांक 23 मार्च, 2010 रोजी विधानपरिषदेत उपस्थित केलेल्या प्रश्नावर माननीय गृहमंत्री यांनी या प्रकरणी एका आय.जी.मार्फत चौकशी करण्यात येईल अशी घोषणा करुनही आजतागायत याही चौकशीचा अहवाल शासनाला सादर न होणे, परिणामी या गिरणी मालकांना शासनाकडून सहकार्य मिळत असल्यांची भावना गिरणी कामगारांमध्ये व जनतेत निर्माण होणे, या सात मिलला लागलेल्या आगीचा अहवाल मिळण्यास विलंब होण्यास जबाबदार असणाऱ्यांवर व संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..



AJIT/ MMP/ KGS/ 14:30

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, मी याठिकाणी अतिशय गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधीत आहे. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर गिरणी होत्या आणि त्यामध्ये काम करणारे गिरणी कामगार होते. आपणा सर्वांना माहितच आहे की, आज या गिरणी कामगारांची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. गिरणी कामगार देशोधडीला लागला आहे. आज गिरण्यांना आगी लावण्याचे काम सुरु आहे. गिरण्यांना आगी लावण्यात येतात म्हणून त्या संदर्भातील प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विचारला होता. त्यावेळी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील व राज्यमंत्री श्री.रमेश बागवे यांनी उत्तर देताना सांगितले होते की,या प्रश्नाची दखल घेऊन वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांमार्फत याची चौकशी करण्यात येईल. आगी लावण्यास कारणीभूत असलेल्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येईल. परंतु माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिल्यानंतर त्यावर अजूनपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. फक्त काही जुजबी लोकांना पकडण्यात आले परंतु खऱ्या आगलाव्यांना पकडण्यात आले नाही. सन 2004पासून कोणकोणत्या गिरण्यांना आगी लावण्यात आल्या याची यादी माझ्याकडे आहे. तेव्हा शासनाने याची तातडीने दखल घेण्याची आवश्यकता आहे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

------

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. लोकप्रतिनिधींनी शासकीय अधिका-यांना दूरध्वनी वा भ्रमणध्वनी केल्यानंतर त्यांना त्वरित प्रतिसाद देण्याबाबत

मु.शी.: लोकप्रतिनिधींनी शासकीय अधिका-यांना दूरध्वनी वा भ्रमणध्वनी केल्यानंतर त्यांना त्वरित प्रतिसाद देण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण ,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

" सभ्यता ,शिष्टाचार ,प्रथा ,आदर, सौजन्य आणि कार्यप्रणाली याचा विचार करता मान्यवर लोकप्रतिनिधींनी ( विधानमंडळ/संसद सदस्य ) सार्वजनिक कामासाठी कोणत्याही शासकीय अधिका-यांना दूरध्वनी वा भ्रमणध्वनी केला असेल तर सबंधित अधिका-यांनी त्यांना त्वरित प्रतिसाद दिला पाहिजे. मान्यवर लोकप्रतिनिधींचा दूरध्वनी वा भ्रमणध्वनी आला असता मंत्रालयातील आय.ए.एस. अधिकारी महत्वाच्या बैठकीत कार्यमग्न असतील तर त्यांनी आपले काम संपल्यानंतर त्वरित मान्यवर लोकप्रतिनिधींना परत कॉल करुन कामाविषयी बोलणे गरजेचे आहे. राजपत्रित अधिकारी बाहेरगावी असतील तर त्यांनी भ्रमणध्वनीव्दारे संबंधित माननीय लोकप्रतिनिधींना एस.एम.एस. करावा त्यामुळे लोकप्रतिनिधींचा सन्मान रहातो. त्यामुळे मान्यवर लोकप्रतिनिधींची आपल्या कार्याची गती वाढविण्यास मदत होते. गरीब जनतेच्या कामाची सोडवणूक होते एवढेच नव्हे तर लोकप्रतिनिधींचा पक्ष कार्यकर्त्यासमोर सन्मानही होतो. राज्य सरकारने या संबंधात शासकीय आदेश क्रमांक विमस-1007/प्र.क्र 36/07/18 (र.व का.) दिनांक 5 एप्रिल 2010 अन्वये कार्यवाही करावी असे परिपत्रक काढले असले तरी त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही या सार्वजनिक दृष्टया महत्वाच्या बाबीकडे मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो."

-----

**पृ.शी.** केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यातील आठ औद्योगिक क्षेत्राना अतिप्रदूषणकारी असल्याचे घोषित करणे

**मु.शी.** : केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यातील आठ औद्योगिक क्षेत्रांना अतिप्रदूषणकारी असल्याचे घोषित करणे याबाबत श्री विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** :माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विनोद तावडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

" केन्द्रीय पर्यावरण आणि वन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत केन्द्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशातील 20 राज्यातील 88 औद्योगिक क्षेत्राचा विशेष अभ्यास करुन प्रसिध्द केलेल्या कॉप्रव्हेन्सीस एनव्हायरमेन्टल असेसमेन्ट ऑफ इंडस्ट्रिअल कस्टर अहवालात देशातील 43 औद्योगिक क्षेत्रे अतिप्रदूषणकारी व मानवी जीवनास चिंताजनक असल्याचे निष्पन्न झाला आहे. असे म्हटलेले आहे.त्या अभ्यासामध्ये महाराष्ट्रातील औरंगाबाद, चंद्रपूर, चेंबूर (मुंबई), डोंबिवली (ठाणे), नाशिक, नवी मुंबई, पिंपरी चिंचवड (पुणे) आणि तारापूर या आठ औद्योगिक क्षेत्रांचा समावेश होता. त्यातील चंद्रपूर,डोंबिवली, औरंगाबाद,नवी मुंबई आणि तारापूर ही पाच औद्योगिक क्षेत्रे अतिप्रदूषणकारी व मानवी जीवनास चिंताजनक असल्याचे निष्पन्न झालेले आहे.या औद्योगिकरणामुळे निर्माण झालेल्या बेसुमार प्रदूषणामुळे मानवी जीवनावर व पर्यावरणावर किती गंभीर परिणाम होत आहेत हे अधोरेखित झालेले आहे. तेव्हा अति घातक ओद्योगिक क्षेत्राच्या बाबतीत आपल्या पर्यावरण विभागामार्फत काय उपाययोजना केलेली आहे आणि मानवी जीवनास ही क्षेत्रे चिंताजनक असल्याचे सिध्द होत आहे या बाबतीत राज्यातील प्रदूषण नियंत्रण विभाग काय पावले टाकत आहेत याची माहिती विशेष उल्लेखाव्दारे मिळावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 14.35

पृ.शी.: एकात्मिक अपंग शिक्षण योजनेसाठी राज्य शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करुन देणे

मु.शी. :एकात्मिक अपंग शिक्षण योजनेसाठी राज्य शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत श्री.भगवानराव साळुंखे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. भगवानराव साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो :-

"केन्द्र शासन निधीतून राज्यामध्ये अपंगासाठी एकात्मिक अपंग शिक्षण योजना राबविली जात असून एप्रिल 2009 पासून या योजनेअंतर्गत प्राथमिक शाळातून सेवारत असलेले सुमारे 700 शिक्षक वेतनापासून वंचित आहेत. वास्तविक पाहता केन्द्र शासनाने एप्रिल 2009 पासून सदरची योजना राज्य शासनाने स्वनिधीतून चालवावी हे कित्येक वर्ष अगाऊ केन्द्र शासनाने स्पष्ट केले असतांनाही राज्य शासनाने आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन दिलेला नाही त्यामुळे हे 700 शिक्षक उपाशीपोटी ही योजना राबवत आहेत. सध्या हे शिक्षक आझाद मैदानावर आमरण उपोषण करीत आहे मी या निमित्ताने शासनाला अशी विनंती करतो की, शासनाने तातडीने त्यांच्याशी चर्चा करावी व त्यांना उपोषण सोडण्याची विनंती करावी तसेच त्यांचा 16-17 महिन्याचा थकित पगार ताबडतोब अदा करावा."

----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये गस्ती नौकांवर प्रशिक्षित सागरी रक्षक नेमण्याची आवश्यकता

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये गस्ती नौकांवर प्रशिक्षित सागरी रक्षक नेमण्याची आवश्यकता याबाबत श्री.परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोकण किनारपट्टीवर सिंधुदुर्ग जिल्हयात मच्छिमारांच्या संरक्षणाकरिता चार गस्ती नौका मंजूर झाल्या असून त्या गस्ती नौकेकरिता 70 प्रशिक्षित सागरी रक्षक कर्मचाऱ्यांची आवश्यकता असतांनाही सदर कर्मचारी वर्ग न भरणे, त्यामुळे ही पदे रिक्त असणे, याकरिता किनारपट्टीवरील खोल समुद्राच्या पाण्याची माहिती असणारे मच्छिमार युवक, त्याचबरोबर किनारपट्टीवर सागरी रक्षक म्हणून काम करणारे मच्छिमार यांच्यापैकी योग्यता असलेल्यांची निवड करुन मच्छिमारांच्या दुष्काळामुळे होत असलेल्या बेकारीवर उपाय योजना करुन मच्छिमारांना दिलासा देऊन सक्षमतेने गस्त घालून किनारपट्टीचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न होण्यास मदत होण्याकरिता किनारपट्टीवरील सागरी रक्षक सेवेत घेण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे".

सभापती महोदय. मुंबईवरील 26/11 च्या अतिरेकी हल्ल्यानंतर संपूर्ण कोकणामध्ये गस्ती नौका देण्यात आल्या .त्यापैकी चार गस्ती नौका सिंधुदुर्ग जिल्हयाला मिळाल्या. या गस्ती नौकांवर प्रशिक्षित कर्मचारी नेमण्यात आलेले नाहीत. मागील अधिवेशनामध्ये विचारण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेला उत्तर देतांना 70 जागा रिक्त असल्याचे माननीय गृहमंत्र्यांनी कळविले आहे. हे 70 प्रशिक्षित सागरी रक्षक नेमतांना सिंधुदुर्ग जिल्हयाच्या किनारपट्टीवरील तरुणांना अग्रक्रमाने सेवेत घेण्याची गरज आहे. खोल समुद्रामध्ये जाऊन काम करण्याचा अनुभव सागरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. परशुराम उपरकर....

किनारपट्टीवरील मच्छिमारांना आहे. त्याकरिता त्या भागातील तरुण युवकांना सागरी रक्षक म्हणून प्राधान्याने नेमण्यात यावे अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ज्येष्ठ कलावंतांना शासनातर्फे मानधन न मिळणे

**मु. शी.** : ज्येष्ठ कलावंतांना शासनातर्फे मानधन न मिळणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडते.

"राज्य सरकारतर्फे ज्येष्ठ कलावंत प्रमोद दामले व आशू (ललिता देसाई) यांचेबरोबर 10 कलावंतांना पाच वर्षापूर्वी मंजूर झालेले मानधन त्यांना अद्यापपर्यंत न मिळणे, त्यांना माहे मार्च, 2006 मध्ये मंजुरी मिळाली त्यानंतर तब्बल 20 महिन्यांनी सांस्कृतिक विभागाने त्रुटी काढून अप्पर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे त्रुटी पूर्ण करण्याचे कळविण्यात येऊन या कार्यालयामार्फत अद्यापपर्यंत या त्रुटींची पूर्तता करण्यात न येणे, याचा फटका या ज्येष्ठ कलावंतांना बसणे, त्यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ, त्यामुळे त्यांच्या मनात शासनाच्या अनागोंदी कारभाराबाबत निर्माण झालेली चीड, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन या ज्येष्ठ कलावंताना मानधन मिळण्याबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी".

सभापती महोदय, काल या प्रश्नावर बरीच चर्चा झाली होती. माझ्याकडे दोन कलाकारांचे अर्ज आहेत. त्यामध्ये दादा कोंडके यांचे निर्मिती प्रमुख म्हणून काम केलेले प्रमोद दामले त्याचप्रमाणे "लग्नाची बेडी" या नाटकामध्ये काम केलेल्या व अनेक चित्रपटांमध्ये काम केलेल्या कलाकार ललिता देसाई उर्फ आशू या कलाकारांनी मानधनासाठी सन 2002-03 मध्ये अर्ज दाखल केले होते. पुणे जिल्हा परिषदेमध्ये या दोन कलाकारांबरोबर इतर 12 कलाकारांची मानधनासाठी निवड करण्यात आली. परंतु सन 2003 मध्ये दाखल केलेल्या अर्जांमध्ये तांत्रिक त्रुटी दाखवून गेल्या सात वर्षापासून त्यांना मानधन देण्यात आलेले नाही. या दोन कलाकारांची शिफारस मनिषा नृत्यालय ट्रस्टच्या प्रसिध्द नृत्यांगना मनिषा साठे यांनी केली होती. त्याबाबतचे शिफारस पत्र त्यांनी

DGS/ MMP/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे....

सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, 18 जानेवारी 2005 रोजी ज्या 12 कलाकारांची निवड कळविली होती त्यापैकी कुणालाही मानधन मिळाले नाही. यासंबंधी शासनाच्या असलेल्या जी.आर. मध्ये कलाकारांचे वार्षिक उत्पन्न 24 हजार असावे लागते व त्यासंबंधीचा उत्पन्नाचा दाखल त्यांनी सादर करावयाचा असतो. याचा अर्थ असा की, ज्या कलाकारांचे मासिक उत्पन्न रु.2000/- असेल त्या कलाकारांनाच मानधन मिळेल. तेव्हा या मासिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट वाढविण्यात आली पाहिजे. त्याचबरोबर प्रमोद दामले व आशू या कलावंताना प्रलंबित असलेल्या वर्षापासून मानधन देण्याचा निर्णय घेण्यात यावा अशी मी विशेष उल्लेखाव्दारे विनंती करते. धन्यवाद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

**पृ. शी.** : मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना वेळेवर अनुदान न मिळणे

**मु. शी.** : मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना वेळेवर अनुदान न मिळणे याबाबत श्री.दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र राज्यातील 10 हजारावर मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालय, ग्रंथालय कर्मचारी व त्यांच्या इतर समस्या या संदर्भात माननीय उच्च शिक्षण मंत्री यांच्यासोबत अनेक वेळा चर्चा झाली, बैठका झाल्या, वित्त विभागाकडून ताबडतोब ग्रंथालयांना दुप्पट अनुदान वेळेवर देण्याचे आश्वासन प्रत्येक वेळी देण्यात आले. तथापि या संदर्भात काहीही कार्यवाही झालेली नाही. मार्च, 2010 मध्ये झालेल्या माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणात सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात यथायोग्य वाढ करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. परंतु अनुदान वाढविण्याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. दिनांक 19 जुलै, 2010 रोजी माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्तमंत्री व माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या मुंबई येथील निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करण्याचा महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघातर्फे इशारा देण्यात आलेला आहे. तरी अनुदानात वाढ करावी व महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात "ग्रंथालय धोरण" जाहीर करावे, याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील 10 हजारावर मान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालय, ग्रंथालय कर्मचारी त्यांच्या इतर समस्या सातत्याने विविध आंदोलनांच्या माध्यमातून, निवेदनांच्या माध्यमातून शासनाकडे मांडीत असतात. माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांच्यासोबत संबंधित संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या अनेक वेळा बैठका झालेल्या आहेत. वित्त विभागाकडून ग्रंथालयांना दुप्पट अनुदान देण्याचे आश्वासन वेळोवेळी देण्यात आले. या सदनामध्ये या विषयावर उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेच्या वेळी या ग्रंथालयाच्या बाबतीत हे शासन अत्यंत गंभीर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

असल्याचे तत्कालीन संबंधित मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी सांगितले होते. या ग्रंथालयाच्या ऊर्जितावस्थेकरिता हे शासन सर्वतोपरी मदत करील असे त्यांनी सांगितले होते. त्याचबरोबर दुप्पट अनुदान वेळेवर देण्याचे आश्वासन त्यांना देण्यात आल्यानंतर त्याबाबत अजूनपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. मार्च 2010 मध्ये झालेल्या माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानामध्ये यथायोग्य वाढ करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे. परंतु अनुदान वाढविण्याबाबत आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही. त्यामुळे दिनांक 19 जुलै, 2010 मध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्तमंत्री व माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या मुंबई येथील निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करण्याचा महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघातर्फे इशारा देण्यात आला आहे. तरी अनुदानात वाढ करावी व महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात "ग्रंथालय धोरण" जाहीर करावे याबाबत मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सरकारला जाणीवपूर्वक आठवण करुन देत आहे. धन्यवाद.

----

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/ प्रथम श्री. सरफरे.... 14:45

**पृ.शी.**: राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील निदेशकांचे पगार गेल्या पाच महिन्यापासून न होणे

**मु.शी.**: राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण सस्थांमधील निदेशकांचे पगार गेल्या पाच महिन्यापासून न होणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** :माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात मोठया संख्येने शासनाच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविल्या जातात. ज्याला आपण आयटीआय म्हणतो व त्या उत्तमरितीने चालतात. त्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उत्कृष्टरित्या काम करणाऱ्या निदेशक कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नामुळे आज शासनाने काही आयटीआयमध्ये दोन तर काही ठिकाणी तीन पाळीमध्ये प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याचा निर्णय घेतलेला आहे. म्हणजेच मोठया प्रमाणात विद्यार्थी या संस्थेत प्रवेश घेतात. परंतु उत्कृष्टरित्या व मेहनतीने काम करणाऱ्या निदेशक कर्मचाऱ्यांना शासन वेळेवर वेतन देऊ शकत नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. आज राज्यातील साधारणपणे चाळीस शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशक कर्मचाऱ्यांचे पगार गेल्या पाच महिन्यापासून झालेले नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे. तेव्हा शासनाने या सर्व आयटीआय मधील निदेशक कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने मिळावे यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बीड येथील क्रीडा संकुलासाठी निधी उभारुन क्रीडा संकुल अद्यावत सुस्थित करण्याची आवश्यकता

**मु.शी.**: बीड येथील क्रीडा संकुलासाठी निधी उभारुन क्रीडा संकुल अद्यावत सुस्थित करण्याची आवश्यकता याबाबत ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** :माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" बीड येथील क्रीडा संकुलाचे नुतनीकरण करण्यसाठी एका वर्षापूर्वी जुने असलेले क्रीडा संकुल मोठया प्रमाणात उखडण्यात येणे, एका वर्षापासून सदर संकुलासाठी ना निधी, ना नियोजन केल्याने सदर संकुलाची संपूर्ण दुरवस्था होणे, सदर संकुलासाठी निधी उभारुन क्रीडा संकुल अद्ययावत सुस्थित करण्याची आवश्यकता असताना त्याच्याकडे कोणीही लक्ष पुरवित नसल्याने क्रीडा संकुलाचे काम न होणे, याबाबत सखोल चौकशी करुन निधी उभारुन तातडीने संकुलाचे काम करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयाचे रिक्त असलेले पोलीस अधिक्षकांचे पद तातडीने भरणे

मु.शी : सिंधुदुर्ग जिल्हयाचे रिक्त असलेले पोलीस अधिक्षकांचे पद तातडीने भरण्याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** :माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सिंधुदुर्ग जिल्हयाचे पोलीस अधीक्षक प्रतापसिंह पाटणकर यांची बदली होऊन एक महिना उलटला तरी ते पद रिक्त असणे, या जागी शरद शेलार यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांच्या सेवानिवृत्तीला एक वर्षाचा कार्यकाळ असल्याने सेवानिवृत्तीच्या शेवटच्या वर्षात त्यांच्या गावी बदली देण्यात येत असल्याने त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हयात रुजू होण्यास दिलेला नकार, आतापर्यंत या जिल्हयातील अनेक गुन्हयांचा तपास न लागणे. (उदा. रेड्डी दुहेरी खून प्रकरण, गुलाबी आयनोडकर प्रकरण) यामुळे या जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था ढासळणे, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी या जिल्हयाला पोलीस अधीक्षकांची आवश्यकता, याकरिता शासनाने तातडीने सिंधुदुर्ग जिल्हयाला पोलीस अधीक्षक देण्याबाबत निर्णय घेण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे.

----

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन: भरेल.

( 2.47 ते 4.00 मध्यंतर )

---

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.राम पंडागळे )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक सायंकाळी 4.30 पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक 4.01 ते 4.30 पर्यंत स्थगित झाली. )

----

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी उपसभापती)**

**पृ.शी.**: वाशिम, बुलढाणा, जळगाव आदी जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली जमीन व खतांच्या तुटवड्यामुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान

**मु.शी.**: वाशिम, बुलढाणा, जळगाव आदी जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली जमीन व खतांच्या तुटवड्यामुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री गोपीकिसन बाजोरीया, सय्यद पाशा पटेल, डॉ. नीलम गो-हे सर्वश्री धनंजय मुंडे व चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील वाशिम, बुलढाणा, जळगांव आदी जिल्ह्यात वादळी पाऊस व अतिवृष्टीमुळे जमीन खरडून जाणे, घरा-दारांचे नुकसान होणे, नैसर्गिक आपत्तीबरोबरच ऐन खरीप हंगामाच्या प्रारंभी सरकारनिर्मित खते-बियाण्यांची भीषण टंचाई निर्माण होणे, विक्रेत्यांना परवाने देण्यास विलंब केल्यामुळे खते विक्रीस न येणे, सन २०१० मधील खरीप हंगामासाठी राज्याने केंद्र शासनाकडे ४३.२५ मे. टन खताची मागणी केल्यानंतर त्यापैकी ८० टक्के खतपुरवठा जून, २०१० च्या अखेरीस झाल्याचे राज्य शासनातर्फे सांगण्यात येणे, तथापि खतासाठी शेतकऱ्यांनी रात्रभर रांगा लावूनही त्यांना खते न मिळणे, त्यामुळे सरकारने वितरीत केलेला खतांचा साठा नेमका कुठे जातो याचा तपास न होणे, खतासाठी पोषणमूलद्रव्यावर केंद्र शासनाकडून देण्यात येणारे अनुदान देण्यास केंद्र शासनाकडून विलंब झाल्यामुळे व पोषणमूलद्रव्यावरील अनुदान घटल्यामुळे खतांच्या किंमती बेसुमार वाढणे, खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने नेमलेल्या भरारी पथकांचे अस्तित्व अपवादाने आढळणे, परिणामी निकृष्ट व महागड्या खतामुळे शेतकऱ्यांचे होणारे प्रचंड आर्थिक नुकसान, खतांची टंचाई व निकृष्ट दर्जा याप्रमाणेच बोगस बियाणे व बियाण्यांचा

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....

काळाबाजार यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणे, दुबार पेरणीमुळे उत्पादन खर्चात वाढ होणे, परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणे व कर्ज घेण्याचे प्रमाण वाढणे, त्यामुळे याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये शेती आणि खतांच्या संदर्भातील ठराव या सभागृहामध्ये मांडला जातो. गेल्या चार-पाच वर्षात खतांची टंचाई झाली नाही असे एकही वर्ष गेले नाही. दरवर्षी आम्हाला यासंबंधीची चर्चा सभागृहामध्ये उपस्थित करावी लागते आणि तोपर्यन्त हे सरकार झोपलेले असते. सभागृहामध्ये चर्चा उपस्थित झाल्यानंतर थातूरमातूर उपाययोजना केल्या जातात आणि ओरड थांबविण्याचा प्रयत्न केला जातो. गेल्या पाच-सात वर्षात कधी नव्हे ते यावर्षी राज्यात मान्सूनचे वेळेवर आगमन झाले. राज्यात जून महिन्यामध्ये पाऊस पडला. राज्यातील अनेक तालुक्यामध्ये मृगाच्या पेरण्या झाल्या. विदर्भातील वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झाली. ३० जूनला मेहेकर, चिखली, बुलढाणा, खामगाव, लोणार या तालुक्यामध्ये झालेल्या जोरदार पावसामुळे जमिनीची धूप झाली. शेतीचे प्रचंड नुकसान झाले....

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. राम पंडागळे)**

....नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

1100 हेक्टर जमीन पावसामुळे खरडून गेली. शेतीमध्ये जे पेरले ते उद्ध्वस्त झाले. शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. वाशिम जिल्हयात एवढा पाऊस झाला की, त्या दिवशी अकोला जिल्हयाचे पालकमंत्री श्री.सुभाष झनक यांच्याशी मी दूरध्वनीवरुन बोललो असता, त्यांनी सांगितले की, आज सकाळपासून मी अतिवृष्टी भागाचाच दौरा करीत आहे. जनावरे पुरामध्ये वाहून गेली. सर्व नद्या दुथडी भरुन वाहू लागल्या. शेतजमीन खरडून गेली. काही ठिकाणी पुरामध्ये माणसे देखील वाहून गेली. एवढा प्रचंड पाऊस त्या भागामध्ये झाला. लोणार तालुक्यामध्ये 104 मि.मी., मेहेकर तालुक्यात 128 मि.मी. पाऊस 30 जून रोजी झाला. बुलढाणा जिल्हयात जवळपास 250 ते 300 हेक्टर जमीन खरडली गेली. चिखली, मेहेकर, लोणार तालुक्यातील शेतजमीन खरडून गेली. शेतीचे पंचनामे करण्यात आले. आज त्या शेतीची अवस्था अशी आहे की, ती शेती पेरण्यायोग्य राहिलेली नाही. शेत जमिनीतील खडक उघडे पडले आहेत. सर्व कसदार माती वाहून गेली. आज शेतकरी डोक्याला हात लावून बसला आहे. प्रचंड पावसामुळे परिणाम असा झाला की, शेतातील महागडे बियाणे वाहून गेले, पिके वाहून गेली. शेतकऱ्यांच्या शेकडो हेक्टर जमिनीचे नुकसान झाले. त्या त्या स्तरावरील लोकप्रतिनिधींनी आवाज उठविल्यामुळे पंचनामे करुन घेण्याचा प्रयत्न झाला. परंतु शासनाकडून अद्याप याची दखल घेतली गेली असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, अतिवृष्टी होत असताना काही भागात चक्रीवादळ झाले. मी ज्या भागात राहतो त्या खामगाव तालुक्यात मांडका नावाचे गाव आहे. त्या गावात झोपडपट्टी आहे. त्या झोपडपट्टीमध्ये गरीब माणसे राहतात. जवळपास 100 झोपड्यांवरील टिनपत्रे एका क्षणात 500 फूट ऊंचीवर उडाले. सायंकाळची वेळ होती. या चक्रीवादळामुळे त्या परिसरातील वीज पुरवठा खंडित झाला. प्रचंड प्रमाणात पाऊस पडत होता. घरावरील छप्पर उडून गेले. त्या झोपडपट्टीमध्ये राहणारी गरीब माणसे बेवारस झाली. त्यांना कोणताही आधार उरला नव्हता. त्यांच्या झोपड्याचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. दुसऱ्या दिवशी त्या भागाचे तहसीलदार पाहणी करण्यासाठी गेले. तहसीलदार यांनी पंचनामे केल्यानंतर काय सांगितले? चक्रीवादळ झाले असे त्यांनी म्हटले नाही. ते म्हणाले की, अतिवृष्टीचे जे निकष आहेत त्या निकषाप्रमाणे तुम्हाला कोणत्याही प्रकारची मदत दिली जाणार नाही. शालेय विद्यार्थ्यांची पुस्तके भिजली. घरातील धान्य भिजले. अंग झाकायला एकही कपडा शिल्लक राहिला नाही. अशा अवस्थेत त्या भागातील

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 16:35

श्री.पांडुरंग फुंडकर.....

झोपडपट्टीमध्ये राहणारी गरीब माणसे उघड्यावर आली. आजतागायत शासनाकडून त्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत दिली गेली नाही. गतिमान शासन आहे असे वारंवार म्हटले जाते. त्या गावाला अद्याप जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली नाही. उपविभागीय अधिकाऱ्यांनी भेट दिली नाही. तहसीलदार पाहणी करण्यासाठी गेले परंतु तेथील गावकऱ्यांना त्यांनी सांगितले की, तुम्हाला कोणत्याही प्रकारची मदत देता येणार नाही. किमान 15 दिवस पुरेल एवढे धान्य आणि रॉकेल तातडीने दिले गेले असते तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु तेवढे धान्य आणि रॉकेल देण्याचेही सौजन्य शासनाच्या वतीने दाखविण्यात आले नाही. आम आदमी हा या सरकारचा केंद्रबिंदू आहे. प्रचंड नैसर्गिक आपत्ती आली असताना या आपत्तीमध्ये सापडलेल्यांना मदतीचा हात देण्याऐवजी तेथील तहसीलदार सांगतात की, तुम्हाला एक नव्या पैशाचीही मदत देता येणार नाही.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

इतक्या उर्मटपणाने त्या गावातील लोकांना सांगण्यात आले. त्यात अर्धी वस्ती दलितांची आहे पण या लोकांना अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे उत्तर दिल्यामुळे ते भांबावून गेले. म्हणून माझी अशी मागणी आहे की, या संदर्भात पुनर्वसनाबाबतचे शासनाचे नियम कोणतेही असोत ज्याप्रमाणे फयान वादळ आले, लैला वादळ आले त्यावेळी शासनाने या वादळात सापडलेल्या लोकांसाठी निकषात बदल केले त्याच धर्तीवर खास बाब म्हणून मंत्री महोदयांनी निकष बदलवून या गावातील लोकांना मदत करावी. कारण वस्तुस्थिती अशी आहे की, या मांडका गावातल लोकांकडे आज कोणताही आधार नाही. ते शेतमजुरीवरच अवलंबून आहेत. त्यांची मुले कोणी दहावी, बारावी तर कोणी आठवी व नववीमध्ये शिकत आहेत. त्यांची सर्व वह्या व पुस्तके भिजून नष्ट झाली. अशा परिस्थितीत ती मुले कशी शिकणार ? पोट बांधून मजुरी करणारा माणूस आज त्याची खाण्याची काहीच व्यवस्था नाही आणि शासन मात्र या लोकांना मदत करण्याऐवजी नियमावर बोट ठेवते. या चर्चेच्या निमित्ताने मला असे म्हणावयाचे आहे की, शासन खास बाब म्हणून या लोकांना मदत करणार आहे की त्यांना वाऱ्यावर सोडणार आहे ? हे राज्य सर्वांसाठी आहे, फुले आंबेडकरांचे नाव आपण घेतो पण त्या गावात जाऊन काँग्रेसचे पुढारी म्हणतात की, "इस गांव मे हमको वोट नही मिले, छोड दो". हे शासनाला शोभादायक नाही. अशाच प्रकारे आपण लोकांना न्याय देणार आहात काय ? तुमचे राजकारण काहीही असू दे तसेच निकष कोणतेही असले तरी शासनाने या गावाला मदत करण्याच्या अनुषंगाने या गावाचा ताबडतोब सर्व्हे करुन घ्यावा व त्यात जी घरे उद्ध्वस्त झाली त्यांना मदत करावी. या गावात पक्की घरे तर नाहीच परंतु साधी मातीची सुध्दा घरे नाहीत. सर्व घरे कुडाचीच आहेत. अशा लोकांचे पुनर्वसन करीत असताना माझी मागणी आहे की, या आपत्तीत ज्यांची घरे वाहून गेली त्यांना घरकुले देण्यात यावीत, 15 दिवस धान्य पुरेल एवढी मदत त्यांना देण्यात यावी तसेच ज्या विद्यार्थ्यांची पुस्तके व वह्या याचे नुकसान झालेले आहे त्यांना ताबडतोब वह्या पुस्तके मिळाली पाहिजे. ही सर्व मदत शासन खास बाब म्हणून करणार काय याचा खुलासा उत्तराच्या भाषणातून करणे आवश्यक आहे. या गावातील जवळपास 110 हेक्टर जमीन खरडून गेली आहे. या जमिनीतील कसदार माती वाहून गेली व खालचा खडक उघडा पडलेला आहे आणि जमीन संपूर्णत: नष्ट झाली आहे. ही जमीन उपजाऊ, पिकाऊ

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

व्हावी असे वाटत असेल तर केवळ थातूरमातूर उपाय करुन चालणार नाही, थातूरमातूर मदत करुन चालणार नाही कारण या नुकसानीमुळे 10 वर्षे तरी या जमिनीत काहीच पिकणार नाही अशी स्थिती झालेली आहे, याबाबत शासन काय उपाय योजणार आहे याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. अन्यथा शेकडो शेतकरी रस्त्यावर येणार आहे म्हणून या चर्चेला सुरुवात करताना अतिवृष्टी आणि चक्रीवादळाची नोंद देखील शासनाने घेतली पाहिजे. म्हणूनच पुनर्वसन मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक असल्याचा आग्रह मी धरला होता. एकीकडे अशा प्रकारची नैसगिक आपत्ती येत असताना "येरे माझ्या मागल्या" या उक्तीप्रमाणे दरवर्षी खतासंबंधीची चर्चा उपस्थित करावी लागते. असे दरवर्षी का होते हेच मला समजत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले होते की,माननीय कृषी मंत्र्यांकडे दोन खात्यांचा कारभार आहे. त्यांच्याकडून तो सांभाळला जात नसेल तर एक खाते त्यांनी कमी करावे. त्यावेळेस माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले होते की, दोन्ही खाते सांभाळण्याची क्षमता माझ्यामध्ये आहे. पण ज्याप्रमाणे शिक्षण खात्याची वाट लागली त्याप्रमाणेच कृषी खात्याची देखील. अशा प्रकारे या दोन्ही खात्यांची वाट लागली आहे. त्याचबरोबर शेतकऱ्याची वाट लागण्याचीही वेळ आता आली आहे. शेतकरी खत फुकटात मागत नाहीत, तो पैसे देण्यास तयार आहे. वास्तविक खते व बी-बियाणे पुरविण्याची जबाबदारी शासनाचीच आहे. पण तरी देखील दरवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांवर ही वेळ येते. अगोदरच कर्जाने बेजार झालेला शेतकरी आत्महत्त्येच्या तोंडावर येऊन ठेपला आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश किंवा कोकणातील कोरडवाहू शेतकरी शेतीसाठी निसर्गाकडे डोळे लावून बसतो. ज्यावेळेस निसर्ग देईल तेव्हाच पाऊस पडेल आणि तेव्हाच पेरण्या होतील व त्यानंतर हातात काय येईल ते येईल त्यावर वर्ष काढण्याचा तो प्रयत्न करीत असतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

शासन सांगते की, शेतक-यांनी अधिक अन्नधान्य पिकवले पाहिजे परंतु अधिक उत्पादनासाठी लागणारे साधने शासन शेतक-यांना उपलब्ध करुन देते का ? मागील वर्षी खतासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्राकडे मागणी उशिरा केली होती. आपल्या राज्यात प्रत्येक हंगामासाठी किती खते लागणार आहेत, बियाणे किती लागणार आहे यासाठी बैठक आयोजित करुन आढावा घेतला जात असतो. परंतु अशा प्रकारचा आढावा घेतल्यानंतर पुढे काय होते ते समजत नाही. राज्यातील 33 जिल्हयातील खरी, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी रासायनिक खतांच्या मागणीत दर वर्षाने 25 टक्याने वाढ होत असते. सन 2008-2009 नव्हे 25.66 लक्ष मेट्रीक टन खत वापरले गेले, सन 2009-10 मध्ये 33.92 लक्ष मेट्रीक टन खत वापरले गेले व त्यामुळे गत वर्षीच्या तुलनेत खरीप हंगामासाठी 43.25 लक्ष मेट्रीक टन खताची मागणी करण्यात आली. सन 2010 च्या खरीप हंगामासाठी बियाण्यांचे नियोजन केले गेले असे सांगण्यात आले. सन 2010 मध्ये केंद्राकडे युरीयाची मागणी 16 लक्ष मेट्रीक टनाची करण्यात आली परंतु केंद्रशासनाने प्रत्यक्षात 14.25 लक्ष मेट्रीक टन खताचे नियोजन केले. डीएपी, एमएपी या खताची 11 लक्ष मेट्रीक टनाची मागणी केंद्राकडे करण्यात आली परंतु केंद्रशासनाने 10 लक्ष मेट्रीक टनाचे नियोजन केले. एमयुपी या खताची 3.50 लक्ष मेट्रीक टनाची केंद्राकडे मागणी केली होती परंतु केंद्राने 3.25 लक्ष मेट्रीक टनाचे नियोजन केले. एसएसपी खतासाठी 3.25 लक्ष मेट्रीक टनाची मागणी केली होती व केंद्राने 3.25 लक्ष मेट्रीक टनाचे नियोजन केले होते. मिश्र खताची केंद्राकडे 9 लक्ष मेट्रीक टनाची मागणी करण्यात आली होती परंतु केंद्रशासनाने 8 लक्ष मेट्रीक टनाचे नियोजन केले. इतर खताच्या बाबतीत सुध्दा .50 लक्ष मेट्रीक टनाची मागणी केली होती व केंद्रसरकारने .50 लक्ष मेट्रीक टनाचे नियोजन केले होते. एकूण 43.25 लक्ष टन खताची मागणी केंद्रशासनाकडे करण्यात आली होती व त्यापैकी केंद्रसरकारने 39.25 लक्ष मेट्रीक टन खत उपलब्ध करुन दिले होते असे शासन सांगते. खरीप हंगामात म्हणजे सन 2010 मध्ये जून अखेरीस 80 टक्के खताचा पुरवठा करण्यात आलेला आहे असे कृषी विभाग आणि कृषी मंत्री सांगतात. जर खतांचा एवढा पुरवठा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

आपल्याला झाला तर आपल्याकडे खतासाठी शेतक-यांना पोलिसांच्या लाठया का खाव्या लागतात, खतासाठी रांगा का लावाव्या लागतात ? आपल्याकडे खतांची कमतरता नाही, 80 टक्के खत महाराष्ट्राला मिळालेले आहे तर हे मिळालेले खत गेले तरी कोठे ? कृषी विभागाने व कृषी मंत्र्यांनी दावा केला आहे की, खतांचा कोणी काळा बाजार केला तर त्याच्याविरुध्द कठोर कारवाई केली जाईल. त्यामुळे शासनाने आतापर्यंत खतांचा काळाबाजार करणा-या किती लोकांना पकडले आहे? शेतक-यांना खतांसाठी लाठया खाव्या लागत आहेत, अधिक पैसे देऊन खते घ्यावी लागत आहेत, तर मग शासनाने केलेला दावा गेला कोठे ? शासन सांगते की, महाराष्ट्राच्या वाटयाला 80 टक्के खत आलेले आहे तर हे खत कोठे गेले ? खतांचा तुटवडा आहे अशा बातम्या रोज वर्तमानपत्रात आपल्याला वाचावयास मिळतात त्या खोटया आहेत काय ? खतांच्या तुटवडयाच्या बातम्यांचे गठ्ठेच्या गठ्ठे माझ्याकडे आहे. खतांच्या बाबतीत कोठे कोठे, काय काय झाले आहे याची सर्व माहिती माझ याकडे आहे.

21 जून 2010 रोजी देऊळगाव राजा येथे 400 ते 500 शेतक-याच्या जमावाने खतांच्या गोदामाचे शटर व कुलूप तोडून खताचा साठा कृषी अधिकारी श्री. ऊगले यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर कृषी अधिका-यांनी बेकायदा साठा असलेली 18 गोडावून सील केली. मग तुमची भरारी पथके नेमके करतात तरी काय ? कोठे आहे शासनाचा खतावरील कंट्रोल ? एका बाजूला शेतकरी खतासाठी मरमर रात्ररात्रभर रांगा लावतात....

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्याच वेळी आपले खत हे व्यापाऱ्यांच्या गोडाऊनमध्ये पडलेले होते, पण व्यापारी खत देत नव्हता. दिनांक 22 जून रोजीची बातमी सांगतो. आमच्या जिल्ह्यात नांदूरा येथे प्रतीक ॲग्रो सेंटर आहे. तेथे DAP 102626 खत येणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी पहाटेपासून रांगा लावल्या. दुपारी 3.00 पर्यंत खताचे वाटपच झालेच नाही. शेतकरी उपाशी-तापाशी खतासाठी उभे होते. खत मिळाले नाही तर माऊलीची पेरणी होणार नाही. सकाळी उठल्या बरोबर शेतकऱ्याने काय केले असेल तर त्या दुकानासमोर रांग लावली. पण दुपारी 3.00 वाजेपर्यंत त्याला खताचे पोते देखील मिळाले नाही. मग कृषि अधिकारी आले. मग त्यांच्याच गाडीला घेराव घालण्यात आले. 1 जुलै रोजी बीड जिल्ह्यात खतासाठी शेतकऱ्यांची झुंबड उडाली. त्यामुळे पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीहल्ला केला. पर्यायाने दुकानदाराने दुकान बंद केले. कोणाचे राज्य चालले आहे ? राज्य कोण करते आहे ? व्यापारी त्यांच्या मनाप्रमाणे दुकाने बंद करीत आहेत. शेतकऱ्यांची झुंबड उडाली म्हणून व्यापारी दुकाने बंद करीत आहेत. शेतकऱ्यांनी लाईन लावली म्हणून व्यापारी दुकान बंद करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्याला खत मिळत नाही. 6 जून रोजी जळगाव जिल्ह्यातील शेतकरी खत केंद्र बंद पडल्यामुळे चिंतेत होता. रासायनिक खताच्या टंचाईचा फायदा घेऊन खत कंपन्यांनी मिश्र खता बरोबर सेंद्रीय व द्रवरूप खताशी लिंकिंग करून नवीन खताचे उत्पादन खपविण्याचा गोरख धंदा केला. हे ही धंदे आता सुरू आहेत. दुकानदार सांगतो मी खत देतो पण त्या बरोबर अमुक एक बियाणे घेतले पाहिजे. निकृष्ट दर्जाचे खत घ्यावे लागेल. हे जर घेणार नसाल तर आपल्याला खताची एकही थैली देणार नाही. हे ही धंदे आता सुरू झाले आहेत. एका बाजूला खत कंपन्या आणि विक्रेते संगनमत करून राज्यातील शेतकऱ्यांची लूट करीत आहेत. असे असताना कृषि खाते मात्र झोपलेले आहे.

भरारी पथके निर्माण केली. या पथकाने किती ठिकाणी धाडी टाकल्या? शेतकऱ्यांनी फोन केले, ओरड केली, घेराव घातला म्हणून तिथल्या कृषि अधिकाऱ्याला जाग आली आणि मग त्याने धाडी टाकण्याचे काम केले आहे. 16 जून 2010 रोजी जाफ्राबाद जिल्हा जालना येथे पोलीस बंदोबस्तात खताचे वाटप करण्यात आले. असे कधी या राज्यात घडले आहे काय ? आता पोलीस बंदोबस्तात खत वाटप करावे लागत आहे. का ? आपण

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

80 टक्के साठा महाराष्ट्रात पाठविला आहे ना ? नियोजन केल्याप्रमाणे 80 टक्के खत राज्यात पोहोचले आहे ना ? असे जर असेल तर पोलिसांनी रांगा लावून खत वाटण्याचे कारण काय आहे ? याचेही उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे. गतवर्षीच्या तुलनेत पूर्णा खरेदी-विक्री संघाला 30 टक्के पुरवठा झाल्यामुळे खताची विक्री 100 ते 150 रूपये जादा घेऊन करण्यात आली. हे माझ ो म्हणणे नाही. मुख्यमंत्र्यांच्या नांदेड जिल्ह्यात खतावरून दगडफेक झाली. नवामुंडा, नांदेड, बसमत, हिंगोली येथे लाठीमार करावा लागला. मग त्यावेळी पोलीस बंदोबस्तात रांगा लावून खतांचे वाटप मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात झाले. अजूनही माझ्याकडे 10 पुरावे आहेत. मी आपला जास्त वेळ घेणार नाही. राज्यभर खताची तीव्र टंचाई आहे. शासन त्याचे कारण आम्हाला देते की, आम्हाला रॅक मिळाला नाही. मागच्या वर्षी वेगळे कारण आणि या वर्षी वेगळे कारण. मागच्या वर्षी सांगितले की, गुजरात, राजस्थानमध्ये आंदोलन चालू आहे. त्यामुळे आमचे खताचे रॅक अडकले. ह्याही वर्षी सांगितले की, रॅक उशिरा पोचत आहेत. हमालांचा संप आहे. रेल्वे बोगी मिळत नाही. अशा प्रकारची कारणे सांगून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. एका बाजूला ही कारणे सांगितली जातात आणि दुसऱ्या बाजूला गोदामे खताने भरलेली असतानासुद्धा त्याला कुलूपे लावून ठेवलेली आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आणि हे सर्व शेतकऱ्यांना माहीत आहे. काल मला बुलढाणा जिल्ह्यातील भाल येथून एका शेतकऱ्याचा फोन आला, त्याने सांगितले की, दुकानदार खताच्या एका पिशवीची किंमत 300 रुपयांऐवजी 600 रुपये सांगत आहे. आम्ही त्यांच्याकडे बिल मागितले तर 300 रुपयांचे बिल मिळेल, परंतु आपणास 600 रुपये द्यावे लागतील असे सांगतो.

राज्यात निर्माण झालेल्या खताच्या टंचाईची आपण कारणे शोधली पाहिजेत. खतासाठी पोषण मूलद्रव्यावरील अनुदान निश्चिती होण्यास लागलेला विलंब हे एक त्यापैकी कारण आहे. केंद्र सरकारकडून खत कंपन्यांना पोषण मूलद्रव्यावर अनुदान देण्यात येते. यावर्षी या संदर्भातील धोरण जाहीर करण्यास उशीर झाला. खत कंपन्या अनुदान किती जाहीर होते याची वाट पाहत होत्या. केंद्राकडून धोरण जाहीर होण्यास उशीर झाला म्हणून कंपन्यांनी बाजारात खते पाठविली नाहीत. त्यामुळे बाजारात खत उपलब्ध झाले नाही. पोषण मूलद्रव्यावरील अनुदान घटल्यामुळे खतांच्या किंमती वाढल्या. केंद्र सरकारकडून अनुदान मिळत होते तोपर्यंत खतांच्या किंमती कमी होत्या.

सभापती महोदय, खत टंचाईचे आणखी एक कारण म्हणजे रेल्वेने खत कंपन्याकडून मालगाडीतून खत उतरविण्याचा कालावधी कमी केला. फक्त नऊ तासात एक मालडबा रिकामा करावा लागतो. हा वेळ अत्यंत अत्यल्प असल्यामुळे तेवढ्या वेळात मालडबा रिकामा करता येत नाही. यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी आपला अन्नदाता आहे. आपण शेतकऱ्यांना उत्पादनावर आधारित भाव देत नाही. त्याची आपल्याकडून जास्त काही अपेक्षा नसते. त्यांना फक्त वेळेवर बी-बियाणे,खते, वीज आणि पाणी मिळाले पाहिजे एवढीच त्याची रास्त अपेक्षा असते. आपणास शेतकऱ्यांच्या या चार माफक अपेक्षा पूर्ण करता येत नसतील आपणास त्यांचे कैवारी म्हणवून घेण्याचा अधिकार नाही. या सर्व गोष्टी देत नसाल तर शेतकऱ्यांच्या नावाने येथे कुंकू लावून बसण्याचा आपणास अधिकार नाही.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदय, आणखी एक बाब अशी की, खतावरील नफ्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे दुकानदार शेतकऱ्यांना खतांबरोबर बि-बियाणे घेण्याचा आग्रह करीत आहेत. राज्यात बियाण्यांच्या शेकडो कंपन्या तयार झालेल्या आहेत. आता कोणत्याही कंपन्यांच्या बियांण्याची गॅरेंटी नसते. हे अधिवेशन संपल्यानंतर नागपूर अधिवेशनात बोगस बियाण्यांसंदर्भात प्रश्न उपस्थित होणार आहेत, अमुक एका कंपनीचे बियाणे उगवले नाही म्हणून शेतकऱ्यांचे इतके इतके नुकसान झाले. आपण बियाणे तयार करणाऱ्या शेकडो कंपन्यांना परवानगी दिली, परंतु त्या कंपनीत तयार होणाऱ्या बियाण्यांच्या नमुन्यांची तपासणी करणार आहात की नाही ? आपणास मिश्रखतांचे कारखाने बंद करावे लागले. खतांमध्ये होत असलेल्या भेसळीमुळे शेतकरी उद्‌ध्वस्त झालेला आहे हे सरकारच्या निदर्शनास आणल्यामुळे राज्यातील मिश्रखतांचे कारखाने बंद करावे लागले. अमुक एका कपंनीचे बियाणे घेतल्याशिवाय आपणास खत मिळणार नाही असा आपण लिखित नियम केला आहे काय ? अशाप्रकारावर सरकारचा अंकुश नाही म्हणून खत विक्रेते सुसाट वाऱ्याच्या वेगाने शेतकऱ्यांना उद्‌ध्वस्त करायला निघाले आहेत, शेतकऱ्यांची लूट करायला निघाले आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, या सर्व कारणांमुळे राज्यामध्ये मोठया प्रमाणावर खतांचा काळाबाजार सुरु झालेला आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये दोन हजार मे.टनापेक्षा जास्त खतांचा काळाबाजार झालेला आहे. कृषी विकास अधिकारी आणि महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळ या दोघांचेही संगनमत आहे. त्यांची मर्जी ज्याच्यावर आहे त्यालाच खत देण्यात येते. हा व्यवहार करीत असतांना पडद्याच्या मागे काय चालते हे कोणालाही माहीत नाही. एखादा खत व्यापारी या कृषी विकास अधिका-यावर व कृषी औद्योगिक विकास महामंडळावर जर मेहरबान झाला तर त्याला खत दिले जाते आणि जर मेहरबान झाला नाही तर त्याला खत दिले जात नाही. जर एखाद्या व्यापा-याने काळा बाजार केल्याचे उधडकीस आले तर कृषी विकास अधिकारी, मोहीम अधिकारी,गुण नियंत्रण अधिकारी, तालुका निरीक्षक बोगस कागदपत्रे तयार करुन प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात .खत आणि बियाणे व्यापा-यांकडून लाखो रुपयांचा हप्ता वूसल करुन खताचा आणि बियाण्यांचा काळाबाजार करण्याची मुभा त्यांना देण्यात येते .त्यामुळे खताचा आणि बियाण्यांचा काळाबाजार सगळीकडे सुरु असल्याचे दृश्य दिसून येत आहे. कृषी विकास अधिकारी आणि महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळाच्या आतबट्टयाच्या माध्यमातून व्यापा-यांचा हा काळाबाजार सुरु आहे अन्यथा या व्यापा-यांची काळाबाजार करण्याची हिंमतच झाली नसती. कृषी अधिकाऱ्याकडून या काळात एका एका दुकानासाठी दोन ते तीन हजार रुपये वसूल केले जातात त्यामुळे या हंगामामध्ये या अधिका-यांची चलती होते आणि शेतक-यांची मात्र दैना होते.

सभापती महोदय, खताप्रमाणेच ज्या व्यापा-यांकडून शेतकरी बियाणे घेतात त्यामध्ये देखील शेतक-यांची फसवणूक केली जाते अशा प्रकारे बियाण्यांपासून ते शेती मालाची विक्री करीपर्यत प्रत्येक स्तरावर या शेतक-यांची लूट होत असते.

सभापती महोदय, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान गेल्या चार वर्षापासून राज्यात राबविण्यात येते त्या अंतर्गत राज्यात अनुदानित वाण पुरविण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून महाबीजची निवड केली आहे. धुळे, नाशिक,अहमदनगर,पुणें, सोलापूर,औरंगाबाद परभणी व नागपूर या जिल्हयात अनुदानित वाण पुरविल्याचे महाबीजकडून सांगण्यात आले होते परंतु धुळे जिल्हयात "लोकवन" या अनुदानित वाणाची शेतक-यांना बाजारभावाने विक्री करुन अनुदानाचे पैसे वितरकांनी आपल्याच

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

खिशात घातले होते. लोकवन या सर्वाधिक प्रचलित वाणाचा त्यांना प्राप्त झालेल्या शासन निर्णयामध्ये समावेश नसल्याचे धुळे जिल्हयातील कृषी विकास अधिका-यांनी सांगितले होते.ऐन हंगामामध्ये लागवड अर्ध्यावर आलेली असतांना अचानक नवीन आदेश आला व त्यामध्ये लोकवन या वाणाचा समावेश करण्यात आला होता. . असा गोंधळ घालण्यामागे वितरकांचे खिसे भरण्या व्यतिरिक्त इतर कोणतेही कारण असू शकत नाही. बियाण्यांच्या वाढीव भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी विभागाने दक्षता पथकाची निर्मिती केली आहे अशा प्रकारचे दक्षता पथक प्रत्येक खात्यामध्ये निर्माण करण्यात आलेले आहे..बियाण्यांच्या संदर्भात एक दक्षता पथक निर्माण करण्यात आलेले आहे. हे दक्षता पथक काय काम करते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे पथक काय काम करते, कृषी विभागाचे पथक काय काम करते ?, याचा दरवर्षीचा अहवाल मागविण्यात आला पाहिजे या दक्षता पथकाने किती ठिकाणी धाडी टाकल्या आहेत किती लोकांविरुध्द कारवाई केली, किती लोकांविरुध्द गुन्हे दाखल केले ? यासबंधीची माहिती मागवली तर हे दक्षता पथक किती सक्षमपणे राज्यात काम करीत आहे हे आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, खत आणि बियाण्यांचा मोठया प्रमाणावर काळाबाजार केला जातो आणि बियाण्यांच्या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे.या राज्यात जे बियाणे महामंडळ स्थापन करण्यात आले आहे त्या महामंडळामध्ये 51 टक्के शेअर्स राज्य सरकारचे आहेत आणि 49 टक्के शेअर्स शेतक-यांचे आहेत. त्यामुळे या महामंडळावर राज्य सरकारचे पूर्ण् नियंत्रण आहे.मी मागच्या वेळी या सभागृहामध्ये सागितले होते की, बियाण् महामंडळ बियाण्यांचे टेंडर काढत असते. राज्यातील बियाणे उत्पादन करणा-याकडून तर हे बियाणे महामंडळ बियाणे विकत घेत असतेच परंतु टेंडर काढून सुध्दा बियाणे विकत घेत असते. त्यामुळे मागच्या वर्षी या बियाणे महामंडळाने एक टेंडर काढले होते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

कागदावर रजिस्टर झालेल्या बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपनीच्या नावाने मध्य प्रदेशामधील एका व्यापाऱ्याने टेंडर भरले. त्याचे टेंडर मंजूर झाल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जाऊन त्या व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचा माल खरेदी केला. ते धान्य बियाणे महामंडळाच्या नावाच्या पिशव्यांमध्ये भरुन शेतकऱ्यांना पुरवठा केला. माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांना मी सांगू इच्छितो की, मी शेजारच्या बुऱ्हाणपूर मार्केटमध्ये गेलो, खंडव्याला गेलो तेथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अध्यक्षांना भेटलो. त्यांनी सांगितले की, आमच्याकडे एकही कंपनी बियाणे निर्माण करीत नाही, फक्त कागदोपत्री बियाणे निर्माण केल्याचे दाखविले जाते. हे व्यापारी आमच्या मार्केटमधून धान्य खरेदी करतात आणि महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या थैल्यांमध्ये भरुन पुन्हा शेतकऱ्यांनाच त्या थैल्या पुरविल्या जातात. अशाप्रकारच्या बियाण्यांमध्ये उगवण शक्ती नसते. या राज्यातील शेतकऱ्यांना अशाप्रकारे उद्ध्वस्त करण्याचे काम राज्य बियाणे महामंडळाकडून केले जात आहे. ज्याला आपण सर्टिफाईड बियाणे म्हणता ते बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारले जाते.

सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री याठिकाणी कितीही सांगत असले तरी या राज्यामध्ये खताचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. या राज्यातील शेतकऱ्यांना खताचा पुरवठा करण्यामध्ये हे शासन अपयशी ठरले आहे. त्याचप्रमाणे खताचा काळाबाजार रोखण्यामध्ये देखील हे शासन अपयशी ठरले आहे. व्यापारी अणि खत कंपन्यांकडून शेतकऱ्यांची लयलूट सुरु आहे. ती थांबविण्यामध्ये हे शासन अपयशी ठरले आहे. हे सरकार कितीही गप्पा मारीत असले, घोषणा करीत असले तरी सत्य परिस्थिती अशी आहे की, या राज्यामध्ये आजपर्यंत 50 ते 60 टक्के पेरण्या होऊन गेल्या असतांना आज सुध्दा शेतकऱ्यांना खत मिळत नाही. सभापती महोदय, या विषयावर दरवर्षी या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करण्याची वेळ आमच्यावर येते. हे महाराष्ट्र सरकार कधी तरी खत आणि बियाण्यांच्या बाबतीत समर्थ आणि सक्षम होणार आहे की नाही हा खरा प्रश्न आहे? या सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर वर्षानुवर्षे चर्चा केली जाते. शेतकऱ्यांना वेळच्या वेळी खत आणि बियाणे मिळाले पाहिजे एवढीच त्यांची माफक अपेक्षा असते. ती अपेक्षा पूर्ण करण्याच्या बाबतीत हे सरकार असमर्थ ठरत असेल तर शेतकऱ्यांचे नाव घेण्याचा या सरकारला अधिकार नाही. राज्य सरकारने या बाबतीत आपले अपयश कबूल केले पाहिजे. सभापती महोदय, मंत्रिमहोदयांकडे आलेली माहिती याठिकाणी वाचून दाखविली जाईल हे मला माहीत आहे. त्यामध्ये

DGS/ MMP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर...

राज्यामध्ये इतक्या खताची मागणी केली होती त्यापैकी इतका पुरवठा झाला, इतके खत केंद्र सरकारकडून आले त्यापैकी 90 टक्के खत जिल्हया-जिल्हयामध्ये पोहोचले आहे. अशाप्रकारची माहिती वाचून दाखविली जाईल. ती माहिती याठिकाणी वाचून दाखविण्याऐवजी प्रॅक्टिकली ते खत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले की नाही हे आपण पहाणार आहात की नाही? म्हणून माझी अशी मागणी आहे की, खताचा काळाबाजार करणाऱ्यांविरुध्द एक सक्षम आणि कडक कायदा राज्यामध्ये करण्यात आला पाहिजे. एखाद्या विशिष्ट खत कंपनीवर अवलंबून न रहाता, एखाद्या विशिष्ट कृषी केंद्रावर अवलंबून न रहाता त्याचे परवाने गावा-गावामध्ये पोहोचवून गावातील शेतकऱ्यांना खत व बियाणे उपलब्ध करुन दिले पाहिजेत. त्याचबरोबर खत आणि बियाण्यांचा काळाबाजार करणाऱ्या कंपन्या व व्यापाऱ्यांना जेलची हवा दाखविण्याची हिंमत हे शासन करणार आहे की नाही हा सवाल शासनाला विचारुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, "नेमेचि येतो मग पावसाळा" या वाक्प्रचाराप्रमाणे दरवर्षी प्रत्येक अधिवेशनामध्ये आम्ही शेतकऱ्यांचे रडगाणे या सभागृहामध्ये मांडीत असतो. आणि त्यानंतर माननीय कृषीमंत्री आम्हाला जे सांगत असतात ते आम्ही ऐकत असतो. यामधून शेतकऱ्याला दिलासा मिळण्याऐवजी तो आहे त्या हलाखीच्या परिस्थितीमध्ये जगत असतो. त्यामधून त्याच्यासाठी याठिकाणी चार शब्द मांडल्याचे समाधान आम्हाला मिळत असते. आम्ही मांडलेल्या भूमिकेचा राज्य सरकारला उपयोग होतो की नाही, हा खरा प्रश्न आहे. खरे म्हणजे आजच्या या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे झाले तर राज्यामध्ये पाऊस पाणी चांगले झाले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने चांगली परिस्थिती आहे. मागील चार वर्षापासून या राज्यातील शेतकऱ्यांसाठी आपणा सर्वांनाच आक्रंदन करावे लागत होते.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, शेतकऱ्याच्या विषयाच्या बाबतीत ग्रामीण भागातील सर्वच सन्माननीय आमदार मग ते कोणत्याही पक्षाचे असोत ग्रामीण भागातील सत्य परिस्थिती आणि शेतकऱ्यांची हालाखीची परिस्थिती या सदनामध्ये प्रामाणिकपणे मांडतात आणि आमची नाळ तेथे जोडलेली आहे हे सांगतात याचा मला नेहमी आनंद होतो. शेतकऱ्यांच्या बाबतीत तरी या सदनात राजकारण निर्माण होत नाही याचा मला नेहमी आनंद होत आलेला आहे. म्हणून मी येथे कधीही सरकारचे वस्त्रहरण करण्याच्या भावनेतून बोलत नाही. थोडया वेळापूर्वी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय मंत्रिमहोदय त्यांच्या उत्तराच्या भाषणात कशी आकडेवारी देतील हे सागितले. अधिकृत माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण कसे असणार आहे हे मी या ठिकाणी सांगणार आहे.

माननीय मंत्रिमहोदय आपल्या भाषणात असे म्हणतील. माननीय सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकली परंतु सत्य परिस्थिती तशी नाही. महाराष्ट्रामध्ये सर्व शेतकऱ्यांना पुरेल इतक्या 42.67 लक्ष मे.टना खताची केंद्र सरकारकडे मागणी केली होती.एप्रिल-मे पर्यंत आम्हाला 32.67 लाख मे.टन खताचा पुरवठा झाला माननीय मंत्रिमहोदयांची आकडेवारी बरोबर अशीच असणार आहे. कारण हे आकडे शासनाच्याच अधिकाऱ्यांकडून आम्हाला मिळालेले आहेत. खत येईपर्यंत मध्येच लैला वादळ आले. त्या लैला वादळामुळे आमची येणारी गलबते पाच दिवस उशिरा आली. मुंबई बंदरामध्ये खताची गलबते लागण्याची कुठेही व्यवस्था नसल्यामुळे ती सर्व गलबते कांडला बंदरात उतरण्यात आली. कांडला बंदरातून मुंबईत रॅकने खत आणावयाचे असल्यामुळे त्या रॅक उपलब्ध करुन घेण्याकरिता रेल्वे खात्याकडे मनधरणी करावी लागते. रेल्वेखाते ज्यावेळी रॅक उपलब्ध करुन देते त्याच वेळेला खत पुरवठा येथे होतो. त्यातही पावसाची परिस्थिती लक्षत घेऊन बंद रॅक उपलब्ध व्हाव्यात म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी खास आपल्या कार्यालयामार्फत केंद्र सरकारला विनंती केलेली आहे की, पावसाळा लक्षात घेऊन आम्हाला बंद रॅक द्याव्यात. त्यामुळे आमच्याकडे खत येण्याकरिता लैला वादळामुळे चार दिवस उशीर झाल्यामुळे आम्हाला जून अखेर पर्यंत खत मिळणार आहे. आमची मागणी 43 लाख मे.टन खताची असली तरी केंद्र सरकारने आम्हाला फक्त 38 लाख मे.टन खत उपलब्ध करुन दिले आहे. खताचा काळा बाजार होऊ नये म्हणून शासन जागृत आहे. शेतकऱ्यांना माझी विनंती आहे की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

खताचा पूर्ण पुरवठा होत असल्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नये. कारण शेतकऱ्यांमध्ये अफवा पसरल्यामुळे साठा करण्याची प्रवृत्ती निर्माण झाल्यामुळे खताचा पुरवठा अपुरा झालेला आहे. म्हणून शेतकऱ्यांनी घाबरण्याचे कारण नाही. खताचा पूर्ण पुरवठा आलेला आहे. विरोधी पक्षांनी कितीही बाऊ करुन सांगितले तरी परिस्थिती तशी नाही." असे माननीय मंत्रिमहोदयांचे शंभर टक्के उत्तर असणार आहे.

सभापती महोदय, मुळात खताचा तुटवडा आहे की नाही याबाबत मी मागच्या वेळी खूप चांगली चर्चा केली होती. अगदी दिल्लीपर्यंत जाऊन अभ्यास करुन त्यावर चर्चा केली होती. तो गमतीचा विषय नव्हता. पण माननीय मंत्रिमहोदय किती सक्षम आहेत हे सांगण्याकरिता ते स्वत:च उभे राहिले. आता हा नवीन पायंडा या सभागृहात पडला आहे.शिक्षण खात्यासाठी पूर्णवेळ मंत्री असावा अशी दोन्ही बाजूच्या आमदारांची मागणी होती. शेती खात्याबद्दल कोणीही काहीही बोलले नव्हते. पण माननीय मंत्रिमहोदय स्वत: उभे राहिले आणि असे म्हणाले की, मी दोन्ही खाते सांभाळण्यासाठी सक्षम आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि काँग्रेसचे भांडण जगजाहीर आहे. श्री. पिचड साहेबांनी सर्टिफिकेट देऊन टाकले की, ही दोन्ही खाती माननीय मंत्रिमहोदय सांभाळू शकतात. त्यातील मेख त्यांच्या लक्षातच आली नाही. त्यामुळे ते सर्टिफिकेट घेऊन माननीय मंत्रिमहोदय सगळीकडे सांगत आहेत. बघा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षांनी मी सक्षम आहे असा मला दाखला दिलेला आहे. सभापती महोदय, मुळामध्ये खते कमी आहेत काय?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

खते आपल्या देशामध्ये निर्माण होत नाहीत. परदेशातून आयात करावी लागतात. खतांच्या बाबतीत आपला देश स्वावलंबी नाही. काही ठराविक खते सोडली तर आपण परावलंबी आहोत. राग कोणावर धरावयाचा, कशावर धरावा व कशासाठी धरावयाचा ? मी रागीट माणूस आहे. राग कशासाठी धरावा याला फार महत्व आहे. मग तो कोणावर धरावा हे ठरविता येते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रातील खत कारखानदारांचा शासनाकडून गळा घोटण्याचे काम करण्यात आले. शासनाने खत निर्मितीवर प्रचंड बंधने आणली आहेत. देशामध्ये महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, जेथे मिश्र खतांचा वापर केला जातो. बाकीच्या प्रांतामध्ये मिश्र खतांचा वापर केला जात नाही. मिश्र खत उत्पादकांना शासनाकडून युरिया दिला जात नाही. सरकारी कारखाना त्यामध्ये काय चालते ते मी पुन्हा गिरवत बसत नाही. मी यासंदर्भात मागील वेळी बोललो होतो. पुन्हा एकदा अधिकृतपणे बोलत आहे. मागील वेळी बी-बियाणे विक्रीसाठी दुकानामध्ये उपलब्ध होते. केवळ शासनाची परवानगी नसल्यामुळे बी-बियाणे विक्रेत्यांना विकता येत नव्हते. गेल्या वर्षी कृषी आयुक्त कार्यालयाकडे 5 कोटी रुपयांची मागणी सर्व कारखादारांकडून करण्यात आली होती. पैसे दिले तर आम्ही आमची ऑर्डर रिलीज करु असे त्यांनी सांगितले होते. जमिनी खालील पाण्याचा अंदाज घेता येत नाही तसे शेती खात्यातील भ्रष्टाचाराचा अंदाज कोणाच्या लक्षात येत नाही. मुळात केंद्र सरकारमुळे घोळ निर्माण झाला, त्यानंतर तो राज्यात निर्माण झाला आहे. म्हणून मी मघाशी बोललो की कोणामुळे राग येतो ते सांगावे लागते.

आदरणीय श्री.शरद पवार हे केंद्रीय कृषी मंत्री आहेत. त्या कृषी खात्यामुळे परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यावर बोलल्यानंतर कोणालाही व्यक्तिगत घेण्याचे कारण नाही. जे आहे ते स्वीकारावे लागते. केंद्रीय कृषी खात्याच्या आयात निर्यात धोरणामुळे ही भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. केंद्र सरकारशी हा विषय संबंधित असल्यामुळे येथे चर्चा करुन उपयोग नाही. केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या आयात निर्यातीचा फटका देशातील इतर राज्यांबरोबर महाराष्ट्र राज्यालाही बसला आहे. मग कापसाची आयात निर्यात असो की साखरेची आयात निर्यात असो. कापूस व साखरेचे सर्वात जास्त उत्पादन करणारा आपला महाराष्ट्र आहे. खतांच्या टंचाईच्या बाबतीत

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.दिवाकर रावते....

बोलत असताना मी हे देखील सांगेन की, खत उत्पादन करणा-या कंपन्यांना मोठया प्रमाणात अनुदान देणारा आपला देश आहे. मागील वेळी 1 लाख 10 हजार कोटी रुपयांचे अनुदान या खत उत्पादकांना देण्यात आले होते. आता आणखी 20-25 हजार कोटींची वाढ अनुदानामध्ये झ ाली आहे. यावर्षी अनुदान देण्याच्या बाबतीत केंद्रीय कृषी मंत्रालयाने विलंब केल्यामुळे जून महिन्यात खताचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. सरकार अनुदान देण्याचे जोपर्यंत जाहीर करीत नाही तोपर्यंत खत बाजारात येत नाही, निर्यातदार बाहेर आणत नाहीत. हा सर्व खोळंबा त्यामुळे निर्माण झाला आहे, लैला या वादळामुळे झालेला नाही. केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या धोरणाचा फटका इतर राज्यांप्रमाणे राज्यालाही बसला आहे. खत कंपन्यांकडे करार झाला नाही. आयात निर्यातीचा करार न झाल्यामुळे देशात वेळेवर खत आले नाही. परदेशातून देशात येणा-या खतामध्ये राज्याचीही मागणी असते. राज्याला 38.68 मे.टन इतके खत मंजूर झाले आहे, राज्याची संपूर्ण मागणी मंजूर झाली नाही. हे सर्व घडत असतानाही सगळीकडे आनंदी आनंद असतो. माथाडी कामगारांनी अहमदनगरमध्ये, नांदेड, लातूर, जालना, बीड, औरंगाबाद आंदोलन केले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

श्री.दिवाकर रावते....

खत कंपन्यांच्या वितरकांना जागेवर खताची वाहतूक करण्याचे बंधन आहे. पट्रोल, डिझेलचे दर वाढल्यामुळे वाहतुकीचेही दर वाढलेले आहेत. या अनुषंगाने तातडीने निर्णय घ्यायला पाहिजे.डिझेल, पेट्रोलचे दर वाढले की रिक्षा आणि टॅक्सी ताबडतोब बंद केल्या जातात. लोकांच्या नाड्या आवळल्या जातात. मग त्याबाबतीत लगेच बैठक घेतली जाते आणि संबंधित खात्याकडून रुपया दीड रुपया दरवाढ केली जाते. खते हा शेतक-यांच्या जीवनमरणाचा विषय आहे. म्हणून वाहतुकीचे दर वाढल्यानंतर वाहतुकीच्या अनुदानामध्ये योग्य वेळेला निर्णय घ्यावयास पाहिजे. आता खत पडलेले आहे. पण त्याची वाहतूक होत नाही. वाहतूक अनुदानाच्या बाबतीत निर्णय घेतला नाही. म्हणून वितरकांनी वाहतूक परवडत नसल्यामुळे वाहतुकीची जबाबदारी नाकारली. हे खाते किती गांभीर्याने काम करत आहे हे मी येथे सांगत आहे. सभापती महोदय, कंपन्यांनी खताचा पुरवठा केला नाही. केन्द्राच्या ढिसाळ कारभारामुळे आणि महाराष्ट्राच्या वेळेवर निर्णय न घेण्याच्या जागरुकतेमुळे हे झालेले आहे. खते आहेत परंतु मिळत नाहीत अशा प्रकारची वेगळी परिस्थिती राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. आता पाऊस वेळेवर पडलेला आहे. मी मराठवाडा, विदर्भ फिरलो. या भागात पेरण्या वेळेवर झाल्यामुळे मला आनंद झाला. मागील वर्षी 20 जुलै नंतर पेरण्या झाल्या होत्या. मला दुबार पेरणी झाल्याचे दु:ख नाही. वाशिममध्ये मी स्वत: गेलो होतो. तेथे प्रचंड पाऊस झाला. 14-15 माणसे पुरात वाहून गेली. माणसे मेल्याचा नाही पण पाणी आल्याचा आनंद मला झाला. पाण्यामुळे पेरलेले बी वाहून गेले असेल तर दुबार पेरणीसाठी नुकसान भरपाई देण्यास हरकत नाही. पण पाणी येणे हे महत्वाचे आहे. पाण्या अभावी पडणा-या दुष्काळा पेक्षा ओला दुष्काळ कधी कधी परवडतो. जोरदार पावसामुळे पेरलेले बी वाहून गेले, खते वाहून गेली, जमिनीची प्रचंड धूप झाली. ही धूप ज्याच्या शेतात जाऊन पडते तो पाच वर्षे सुखी होतो. सभापती महोदय, मी शितावरुन भाताची परीक्षा कशी करतात एवढेच सांगणार आहे.

मी काल विधानसभेमध्ये झालेल्या प्रश्नोत्तराची माहिती घेतली. सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती येथील खत विक्रेत्याच्या संदर्भात प्रश्न विचारलेला होता. त्या प्रश्नाला असे छापील उत्तर दिलेले आहे की, "खरीप 2008 - मंजूर नियोजन 85,200, केन्द्र शासनाने दिलेले आवंटन 73,250, प्रत्यक्ष पुरवठा 73,250 नियोजनाची टक्केवारी 100." हुशार आमदार

..2..

(श्री. दिवाकर रावते...

असेल तर तो माननीय मंत्री महोदयांवर हक्कभंगाचा प्रस्ताव आणू शकेल. माझ्याकडे परभणीच्या अधिका-यांची शासनाला दिलेल्या टिपणीची प्रत आहे. त्यामध्ये रासायनिक खत पुरवठ्यामध्ये येणा-या अडचणी नमूद केलेल्या आहेत. परभणी जिल्ह्यामध्ये फूलरॅक पॉईण्ट करणे आवश्यक आहे. खताची जम्बो रॅक उठविली पाहिजे, आवंटण वाढवले पाहिजे. खत पुरवठयाच्या संदर्भात ज्या काही अडचणी सांगितलेल्या आहेत त्या महत्वाच्या आहेत. कधी कधी शासन अधिकृतरित्या या विधिमंडळामध्ये ढोंगबाजी कशी करते, फसवाफसवी कशी करते ते मला येथे मुद्दाम सांगायचे आहे.

**तालिका सभापती** : संसदीय कार्य मंत्र्यांना कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करावयाचा आहे. त्यांनी तो सादर करावा.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे

श्री. हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार दिनांक 15 जुलै 2010 रोजी दुपारी 3.30 वाजता कक्ष क्रमांक 144, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन सोमवार, दिनांक 19 जुलै ते 27 जुलै, 2010 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढील प्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

**जुलै, 2010**

| | |
|---|---|
| सोमवार, दिनांक 19 | 1) सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस)<br>2) म.वि.प. नियम 97 अन्वये "मराठी भाषेच्या विकासासाठी व संवर्धनासाठी स्थापन करण्यात आलेला स्वतंत्र विभाग" या विषयावर चर्चा |

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील........

| | |
|---|---|
| मंगळवार, दिनांक 20 | : 1) सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) |
| | 2) सत्तारुढ पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा |
| बुधवार, दिनांक 21 | : बैठक होणार नाही. |
| गुरुवार, दिनांक 22 | : 1) पुरवणी विनियोजन विधेयक |
| | 2) शासकीय विधेयके |
| | 3) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा |
| शुक्रवार, दिनांक 23 | : शासकीय विधेयके |
| शनिवार, दिनांक 24 | : अशासकीय कामकाज (ठराव) |
| रविवार, दिनांक 25 | : सुट्टी |
| सोमवार, दिनांक 26 | : 1) अंतिम आठवडा प्रस्ताव |
| | 2) शासकीय विधेयके |
| मंगळवार, दिनांक 27 | : शासकीय विधेयके |

**तालिका सभापती** (श्री.राम पंडागळे) : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रस्ताव मान्य करण्यास आमची हरकत असू नये, कारण आम्ही देखील कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित असतो. मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये अधिवेशनाचा कालावधी एक दिवस वाढविण्यात यावा असा आम्ही आग्रह धरला होता, परंतु दुर्दैवाने आमची विनंती मान्य करण्यात आली नाही. मागणी करणाऱ्या सदस्यांची संख्या दोन होती आणि विरोधात बहुमत होते. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये आम्हाला ज्या पध्दतीने वागणूक दिली जाते ती आम्हाला पसंत नाही. तो विषय मी याठिकाणी मांडणार नाही. परंतु या बैठकीमध्ये काय घडले हे सभागृहाला कळले पाहिजे. या आठवड्यात सभागृहाचे कामकाजाचे दिवस पाच असले तरी काल आम्ही माननीय पंतप्रधानांच्या भेटीसाठी दिल्लीला गेलो होतो त्यामुळे सदनाचे कामकाज झालेले असले तरी या आठवड्यात आम्हाला फक्त चारच दिवस कामकाजात सहभागी होण्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

संधी मिळणार आहे. पुढील आठवड्यात बुधवार, दिनांक 21 जुलै, 2010 रोजी सभागृहाची बैठक होणार नाही. त्यामुळे शनिवार, दिनांक 24 जुलै, 2010 रोजी सुट्टीचा दिवस असला तरी सभागृहाची बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या अधिवेशनात एकूण 15 विधेयके सभागृहापुढे चर्चेला यावयाची आहेत. सात दिवसात 15 विधेयके मंजूर करावयाची झाली तर प्रत्येक दिवशी दोन विधेयके मंजूर व्हावी लागतील. म्हणजे आम्ही विधेयकावर चर्चा न करता मंजूर करावी अशी शासनाला अपेक्षा आहे. त्याशिवाय आठवड्यातील दोन दिवस सत्तारुढ आणि विरोधी पक्षाकडून सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा घेण्याचे ठरलेले आहे. असे असताना अधिवेशनाचा कालावधी का कमी केला जातो? सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी, त्यांच्या भावना मांडण्यासाठी हे सभागृह आहे. विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये जो निर्णय झाला त्या निर्णयाबद्दल विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये आम्ही फक्त मम म्हणायचे. विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक एक तासापेक्षा अधिक वेळ सुरु होती. त्याची कारणे काय हे आम्हाला माहित नाही. परंतु विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये आम्हाला चहापान देखील उरकू दिले नाही. चहा घेण्यापूर्वीच बैठकीचे सूप वाजले. चहा घ्या आणि निघा. आम्ही आग्रह धरला होता की, अधिवेशनाचा कालावधी एका दिवसाने वाढविण्यात यावा. विधेयके चर्चा होऊनच मंजूर व्हावीत अशी आमची विनंती आहे. मागील अधिवेशनात शासनाने मान्य केले होते की, सभागृहाची बैठक दुपारी 1.00 ते सायंकाळी 5.00 पर्यंत घेण्यात येईल. नियमाप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालले आहे. सभागृहाचे कामकाज अधिक वेळ चालते. आम्ही जरुर त्यासाठी सहकार्य करतो. परंतु विधेयके चर्चेविना मंजूर करुन घ्यायची, आग्रह करुन मंजूर करुन घ्यायची पध्दत योग्य नाही. अधिवेशनाचा कालावधी वाढविण्यात यावा. अधिवेशनाचा कालावधी कसा आकुंचन होत आहे हे लोकांना कळले पाहिजे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.: वाशिम, बुलढाणा, जळगाव आदी जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली जमीन व खतांच्या तुटवड्यामुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान

**मु.शी**.: वाशिम, बुलढाणा, जळगाव आदी जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली जमीन व खतांच्या तुटवड्यामुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री गोपीकिसन बाजोरीया, सय्यद पाशा पटेल, डॉ. नीलम गो-हे सर्वश्री धनंजय मुंडे व चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतकऱ्यांना खते द्या हीच आमची भूमिका आहे. मी फक्त शितावरुन भाताची परीक्षा करतो. परभणी जिल्हयाचे उदाहरण मी सांगू इच्छितो. त्यावरुन संपूर्ण महाराष्ट्राची परिस्थिती काय आहे हे लक्षात येईल. कृषि विभागाने एकूण 1,58,500 मे.टन डीएपी, युरिया, एमएपी, 10:26:26, 12:12:32, 19:15:15 मिश्र खताची मागणी केली होती. अपेक्षेपेक्षा खताचा 58 हजार मे.टन कमी पुरवठा झाला. 31 मार्च, 2010 अखेर फक्त 4 हजार मे.टन खत शिल्लक राहिले.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

खरीप पिकासाठी सन 2010-11 मध्ये 33820 मे.टन इतक्याच खताचा पुरवठा झाला. पण प्रत्यक्षात 38337 मे.टन खताची विक्री झाली आणि ही परिस्थिती फक्त परभणी जिल्ह्यातीलच आहे. तालुकावाईज विचार केला परभणी तालुक्यात 18.25 टक्के, जिंतूर मध्ये 16.23 टक्के, सेलू तालुक्यात 13.27 टक्के, पूर्णा तालुका 11.21 टक्के, पालम मध्ये 8.10 टक्के, मानवत मध्ये 7.88 टक्के, सोनपेठ व गंगाखेड या तालुक्यांमध्ये अनुक्रमे 7.89 टक्के आणि 7.49 टक्के एवढेच खत मिळाले. ही आकडेवारी 14 जून, 2010 रोजीची आहे. याचे परिणाम ठिकठिकाणी अत्यंत गंभीर झ ालेले आहेत. हिंगोली तालुक्यात तर परिस्थिती अगदी उलटच निर्माण झाली. खताचा पुरवठा कमी झाल्याने सव्वा महिन्यापूर्वी या भागातील शेतकरी संतापले आणि त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पाच पोलिसांना मारले. त्यावेळेस मी तेथे गेलो होतो. नांदेडमध्ये दगडफेक झाली. लातूर आणि संभाजीनगर जिल्ह्यातही अशीच परिस्थिती उद्भवली होती. धाराशीव मध्ये तर जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले तरीही उपाययोजना केली नसल्याने जिल्हा कृषी अधिकाऱ्याच्या पदावर प्रभारी कार्यभार पाहणाऱ्या अधिकाऱ्यावरच गुन्हा दाखल करण्यात आला तसेच या प्रकरणाची चौकशी करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांनी दिले, एवढी भयानक परिस्थिती ठिकठिकाणी निर्माण झाली होती. मराठवाड्यातील सातही जिल्ह्यांमध्ये हीच परिस्थिती आहे. तर विदर्भामध्ये रॅक नसल्यामुळे खताचा पुरवठाच झाला नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्याची खताची स्थिती देखील आकडेवारीसह माझ्याकडे आहे. रत्नागिरीमध्ये खताचा पुरवठा झाला नाही. अशा प्रकारे यातून कोकण प्रदेश सुध्दा सुटला नाही. रत्नागिरी जिल्ह्यासाठी 26000 मे.टन एवढ्या खताची गरज असताना केवळ 17339 मे.टन एवढ्याच खताचा म्हणजे 60 टक्के खत पुरवठा झाला. नंदुरबारमध्ये तीच परिस्थिती आहे. शेतकऱ्यांनी खतासाठी रांगेत उभे राहण्यासाठी दोन दोन दिवस 50-60 रुपये मजुरी देऊन माणसे लावली. खत असूनही ते शेतकऱ्यांना मिळत नाही अशी परिस्थिती राज्यात निर्माण झाली याची जबाबदारी कोणाची आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. राज्यात खत पुरवठा करीत असताना प्रत्येक गोणीमागे 100-150 रुपये व्यापाऱ्यांकडून जास्त घेतले जातात. त्यात असे सांगण्यात येते की, वरती अधिकाऱ्यांना द्यावे लागतात असे अधिकृतरित्या सांगण्यात येते. अशा प्रकारे शासनाकडे किती कोटी रुपये येतात त्याचा हिशेब

....2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

शासनानेच करावा, ते गणित आम्हाला करण्याची गरज नाही. कृषी अधिकारी प्रत्येक गोणीमागे 15 रुपये जमवितो आणि ते कोणाला पोहचवितो हे त्यांनाच माहीत आहे. अशा प्रकारे खताचा काळा बाजार यातून निर्माण झाला ही सत्य परिस्थिती आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे खतावरील निर्बंध उठवून खत उत्पादकांना अनिर्बंधता देण्याचे धोरण केंद्रात निर्माण झाले आणि त्यातून पुढील वर्षी खताच्या बाबतीत अजूनही वाईट परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. कारण यामुळे खूनापर्यंत परिस्थिती निर्माण होईल म्हणून खताच्या बाबतीत जनतेसमोर जे भाषण करुन दाखविले ते कृपया करु नये व ही परिस्थिती बदलण्यास सांगावे. तसेच खताच्या बाबतीत जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याची गांभीर्याने चौकशी करावी. काळ्या बाजाराच्या बाबतीत शासन काय उपाययोजना करणार आहे हे देखील उत्तरात सांगावे. भेसळयुक्त बियाणे अथवा भेसळयुक्त खते हा विषय शासनाचा आहे परंतु शेतकऱ्याची फसवणूक होणार नाही, ही जबाबदारी शासनाने पार पाडावी. एवढी नम्र विनंती करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----

यानंतर श्री. जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

शेतक-यांची खताच्या बाबतीत व बियाण्यांच्या बाबतीत फसवणूक होणार नाही ही जी शासनाची जबाबदारी आहे ती शासनाने पार पाडावी अशी नम्र विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र...

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एका चांगल्या चर्चेला या ठिकाणी सुरुवात झालेली आहे. गेल्या चार वर्षापासून या विषयावर सभागृहात चर्चा होते आहे. सन्माननीय सदस्य ज्या काही सूचना करतात त्या सूचनांचा विचार होत नाही असे यावरुन दिसून येते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सिंधुदुर्ग जिल्हयाच्या खताच्या संदर्भात उल्लेख केला आहे. परंतु मला असे सांगावयाचे आहे की, सिंधुदुर्गमध्ये जिल्हयामध्ये खतांचा एवढा मोठा प्रश्न निर्माण झालेला नाही. सन 2007-08 मध्ये ज्या शेतक-यांचे नुकसान झाले त्यांच्या नुकसानभरपाईसाठी केंद्रसरकारची योजना होती त्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयाच्या शेतक-यांसाठी 27 कोटी रुपये मिळाले. हे पैसे खताच्या रुपात न देता वस्तूच्या रुपात द्यावयास पाहिजे होते. सन 2007-08 मधील नुकसान भरपाई आतापर्यंत दिली गेली नाही. ही नुकसानभरपाई रोखीने द्यावी की, कशा प्रकारे द्यावी याबाबत वाद दोन वर्षापासून सुरु होता. हे पैसे खत कंपन्यांमध्ये भरले गेल्यानंतर 27 कोटी रुपयांचे खत सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये आले तर काय होईल ? सिंधुदुर्ग जिल्हयाची खताची मागणी सर्वसाधारणपणे 24 हजार मेट्रीक टनाची आहे. सिंधुदुर्ग मध्ये दर वर्षी 1700 टन खत लागत असते. यावर्षीचे आणि मागील वर्षीचे म्हणजे 2007-08 मधील खत एकाच वेळी आले तर हे खत शिल्लक राहील. म्हणून दोन वर्ष खताच्या स्वरुपात किंवा वस्तूच्या स्वरुपात नुकसान भरपाई देण्यासाठी ज्या अधिका-यांनी हलगर्जीपणा केला आहे त्या अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार हा माझा प्रश्न आहे. खरीप हंगामाचे रेग्युलर खत जवळपास 10 हजार टन आमच्याकडे आलेले आहे. त्यामुळे दोन्हींच्या संदर्भातील मागणी मार्च महिन्यापर्यंत का पूर्ण करण्यात आली नाही ? 27 कोटी रुपयांचे खत यापूर्वी का मिळाले नाही ? शेतकरी खतांसाठी खरेदी विक्री संघात जात होते परंतु खत न मिळाल्यामुळे परत येत होते. कृषी अधिक्षकांच्या चुकीमुळे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हा प्रश्न निर्माण झाला होता त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयाच्या कृषी अधीक्षकांवर कारवाई करावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, गेल्यावर्षी सिंधुदुर्ग जिल्हयात व कोकणात जी काही पर्जन्यवृष्टी झाली त्यामध्ये कुडाळ-सावंतवाडीच्या परिसरातील मोठया प्रमाणात घरांचे नुकसान झाले होते. सिध्दीविनायक ट्रस्टमधून आपल्याला पैसे उपलब्ध होतील, घरे बांधून मिळतील अशी माहिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

जिल्हाधिका-यांनी दिली होती. सदर प्रस्तावावर अजून पर्यंत काहीही कारवाई झालेली नाही त्यामुळे याबाबतही निश्चितपणे विचार व्हवा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मी खतांच्या आकडेवारीमध्ये जाणार नाही परंतु शासनाला एकच विनंती करणार आहे की, खतांच्या वाहतुकीचा प्रश्न दर वेळी निर्माण होत असतो. गोव्यावरुन सिंधुदुर्गमध्ये खत आणतांना रॅकच्या संदर्भात प्रश्न निर्माण होत असतो. मुंबईवरुन कोकणात खत जातांना ट्रान्सपोर्टची व्यवस्था बरोबर होत नाही त्यामुळे खते वेळेवर उपलब्ध होत नाही. त्यामुळे कृषी अधिका-यांनी रेल्वेच्या अधिका-यांशी चर्चा करुन हा प्रश्न सोडवला तर कोकणातील शेतक-यांना खतांची वाट पहावी लागणार नाही, त्रास होणार नाही व जी कृत्रिम टंचाई होते ती होणार नाही. खतांचा प्रश्न गेल्या चार साडेचार वर्षापासून आहे असे असतांना अधिकारी लक्ष घालीत नाही त्यामुळे ही परिस्थिती दरवर्षी अशीच सुरु राहते. भविष्यात असा प्रश्न निर्माण होणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी व पुढील वर्षी शेतक-यांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

सभापती महोदय, खतांच्या संदर्भात सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जो प्रश्न निर्माण झाला त्या बाबत संबंधित अधिका-यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जे वाढीव खत येणार आहे त्या खताचे आपण काय करणार आहात ? आतापर्यंत शेतक-यांना खत पुरवठा झाला नसेल आणि पुढील काळात खत लागणार नसेल तर रोख स्वरुपात किंवा वस्तूच्या स्वरुपात सिंधुदुर्ग मधील शेतक-यांना आपण देणार आहात काय ? या वर्षीचे 17 हजार टन आणि सन 2007-2008 मधील खत एकत्र आले तर 24 हजार टन खत शिल्लक राहणार आहे त्यामुळे यासंदर्भात शासन काय निर्णय घेणार आहे याचीही माहिती शासनाने द्यावी एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी म.वि.स.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे त्यावर माझे मत मांडण्यासाठी उभा आहे.

"नेमेचि येतो मग पावसाळा" असे जरी म्हणत असलो तरी "नाही कुणा येथे शेतकऱ्यांचा जिव्हाळा" दरवर्षी अवर्षण, अतिवृष्टी या संकंटांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. प्रत्येक वेळी शेतकऱ्यांना निरनिराळ्या संकंटांना तोंड द्यावे लागते. तरी मात्र आम्ही मोठ्या अभिमानाने सांगतो की, आमचा देश, आमचे राज्य कृषि प्रधान आहे. पण इथला शेतकरी मात्र कणा-कणाने, मना-मनाने मरतो आहे याकडे कुणाचेही लक्ष नाही.

आज आमच्या शेतकऱ्यांच्या नशिबी काय आले आहे ? आता आम्ही म्हटले की, अतिवृष्टीमुळे आमच्या जमिनी खरडून निघाल्या. घरदारे पडली. नुकसान झाले. मागच्या वर्षी आम्ही कोरड्या दुष्काळाने मेलो. यावेळी ओल्या दुष्काळाने मरत आहोत. परंतु, सरकारला मात्र याची जाग नाही. आमच्या राज्यातील शेतकऱ्यांच्या नशिबी काय आले ? आत्महत्या,कुपोषण,दु:ख आजारपण आणि अपमान. एवढ्या ओझ्याखाली शेतकरी रोजचे मरण मरत आहे. परंतु कुणालाही त्याच्याबद्दल आत्मियता वाटत नाही. जणू काही हे राज्य संवेदनशील नाही असे म्हणण्याची वेळ आली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर साहेब म्हणाले की, हे राज्य गतिमान आहे. मी तर म्हणेन की हे राज्य गतिहीन आहे. शेतकऱ्यांची गती रोखणारे राज्य आहे. शेतकऱ्यांना दिवसेंदिवस खड्डयात टाकणारे राज्य आहे, असे जर मी म्हटले तर वावगे होणार नाही. 12 हजार शेतकरी आत्महत्या करतात. त्यांच्या विधवा पैशासाठी रडतात. त्यांना आपण साधी मदत करू शकत नाही. हे महाराष्ट्र राज्याचे फार मोठे अपयश आहे असे मी म्हटले तर ते वावगे होणार नाही. लाखाचा पोशिंदा अन्नासाठी तरसतो आहे. कधी अवर्षण, कधी अतिवृष्टी या निसर्ग निर्मित संकटांना तोंड देत असताना मनुष्य निर्मित संकटांना देखील शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्याच्या पाठीशी कोण आहे ? मला शाहिराने म्हटलेला शेर आठवतो. त्यांनी म्हटले आहे की, एकीकडे शेतकरी मरतो आहे आणि दुसरीकडे मात्र आम्ही त्याच्या कौतुकाचे गोडवे गात आहोत. येथे आपण सर्रास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ........

खोटे बोलतो की, आम्ही खते पुरविली. शेतकऱ्याला आधार दिला. अवर्षण झाले तेव्हा आम्ही त्याला विमा दिला. शेतकऱ्यांना 25 हजार रूपया पर्यंतचे कर्ज बिनव्याजी दिले. आता 50 हजार रूपया पर्यंतचे कर्ज बिनव्याजी देणार आहोत. हे जे काही बोलता ते बँकेच्या कानावर सुद्धा जात नाही. जी.आर.सुद्धा निघत नाही. शेतकऱ्यांना न्याय सुद्धा मिळत नाही. केवळ विधान परिषदेच्या 4 भिंतीमध्ये आम्ही बोलतो. पेपरबाजी करतो. पेपरमध्ये देतो. इथला शेतकरी मात्र आसुसलेल्या नजरेने बँकांकडे बघतो, सरकारकडे बघतो. पण त्याला काहीही मिळत नाही. मी येथे आपल्याला एक शेर सांगते.

ये कातिल की फितरत तो देखो
ये क्या चाहते हैं,
मैयत में आए बुरखा पहनकर
जनाजे की उम्र भी दुआ मांगती है.

एकीकडे मरणाला सामोरे जाण्याची परिस्थिती निर्माण करायची आणि दुसरीकडे मात्र शेतकऱ्यांच्या कौतुकाचे गोडवे गायचे. असेच जर चालत असेल तर हा शेतकरी भविष्यात नाही तर आता पण आत्महत्या करील. खरे तर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या केल्या आहेत. अतिवृष्टीमुळे वाशिम, बुलढाणा, जळगाव जिल्ह्यातील जमिनी गेल्या 10 वर्षापासून मोठ्या प्रमाणावर खरडून निघाल्या आहेत. विदर्भातील जमिनी खरडून निघाल्या आहेत. परंतु या दहा वर्षामध्ये सभागृहामध्ये आम्ही फक्त आश्वासने ऐकली. त्या जमिनी उत्पादन करण्यासाठी पूर्ववत करून देणार असे आश्वासन देण्यात आले. पण दहा वर्षामध्ये एक एकर नव्हे तर 1 इंच जमिनीवर सरकारने माती टाकली नाही.

यानंतर श्री.अजित...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

शेतकरी ज्या जमिनीवर 9-10 क्विंटल पीक घेत होता त्या जमिनीवर आता त्याला 2 क्विंटल पिकावर समाधान मानावे लागत आहे... शेतकऱ्यांना प्रत्यक्षात न्याय मिळत नाही, निदान त्यांच्याकरिता करीत असलेल्या भाषणास तरी न्याय द्यावा. तो ही न्याय मिळत नसेल तर आम्ही काही बोलण्यात अर्थ नाही... शेतकऱ्यांच्या गेल्या 10 वर्षात खरडून गेलेल्या जमिनींवर माती टाकून त्या पुन्हा उत्पादनयुक्त केलेल्या नाहीत. शेतकऱ्यांना कोणत्याही बाबतीत न्याय न देण्याचे सरकारने ठरविलेले दिसते. खत कंपन्यांचे नुकसान झाले म्हणून त्यांना सव्वा कोटी लाख रुपयांचे अनुदान दिले. डिझेल आणि पेट्रोल कंपन्यांचे नुकसान झाले म्हणून त्यांना अनुदान देऊन डिझेल व पेट्रोलचे भाव वाढविण्याची परवानगी दिली आणि या दरवाढीचा फटका सर्वसामान्यांना, दलितांना आणि शेतक-यांना बसला आहे. या दरवाढीमुळे शेतकरी मरणाला टेकला आहे. सरकार अशा पध्दतीने राज्य चालवित असेल तर एक दिवस हा शेतकरी येथे राज्य करण्यास बसल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, बियाण्यांचा आणि खंताचा तुटवडा हा विषय दरवर्षी येथे चर्चेला येतो. या चर्चेला उत्तर देताना माननीय कृषी मंत्री सांगतात की, आम्ही राज्यात खतांचा तुटवडा पडू देणार नाही. बियाण्यांचा तुटवडा कमी पडू देणार नाही. परंतु शेतकऱ्यांना कधीही खत-बियाणे वेळेवर मिळत नाहीत. राज्यातील 50 टक्के शेतकऱ्यांना खत वेळेवर देता नाही हे या राज्याचे दुर्दैव आहे. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, शेतकऱ्यांना दुकानावर खत घेण्यासाठी पोलिसांचा लाठीमार सहन करावा लागत आहे, ही निश्चित दुर्दैवी बाब आहे. सरकार शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्यातील 70 टक्के जनता शेतकरी आहे. शेतकरी आपला दाता आहे. त्याने जर शेतात धान्य पिकविले नाही तर आपणास दोन वेळेचा घास मिळणार नाही. तो आपला पोशिंदा आहे. आपण् शेतकऱ्यांना बळीराजा म्हणतो, परंतु तो बळीराजा आज स्वत: बळी गेलेला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

सभापती महोदय, पूर्व विदर्भ आणि चंद्रपूर जिल्ह्यासाठी दोन लाख मेट्रीक खताची मागणी करण्यात आली, परंतु प्रत्यक्षात 1 लाख मेट्रीक खत देण्यात आले. मागणी पेक्षा कमी आलेल्या खतांचा पुरवठा कोणकोणत्या शेतकऱ्यांना करणार आहात ? शासनाने मागणी पेक्षा कमी पुरवठा केल्यानंतर तेथील कृषी अधिकाऱ्यांना सांगण्यात आले की, आपण खतांचा बफर स्टॉक करावा. नेहमी जास्त मालाचा बफर स्टॉक केला जातो. याठिकाणी कमी प्रमाणात खतांचा पुरवठा झ ाला असतानाही कोणत्या आधारावर बफर स्टॉक करण्यास सांगितले गेले हे आम्हाला समजत नाही.

सभापती महोदय, मागील वर्षी कोरडा दुष्काळ पडला म्हणून केंद्र आणि राज्य सरकारची समिती पाहणी करुन गेली. परंतु अद्यापपर्यंत त्या शेतकऱ्यांना एकही पैसा मिळालेला नाही. राज्य सरकारमार्फत सांगण्यात आले की, आम्ही शेतकऱ्यांचा विमा काढलेला आहे. परंतु शेतकऱ्यांना विम्याचे पैसे मिळाले नाहीत.

रिर्झव्ह बँकेने शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत काही गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या नावे एक वेगळे हेड करुन त्यामध्ये कर्जाची नोंद करुन त्यांना सहा टक्के दराने कर्ज द्यावे. परंतु शेतक-यांना प्रत्यक्षात सहा टक्के दराने कर्ज मिळण्याऐवजी बारा टक्के दराने कर्ज मिळते याची कधी माहिती घेणार आहात काय ?

शेतकऱ्यांना 25 हजार रुपये बिनव्याजी कर्ज देण्याची घोषणा सरकारने केली. प्रत्यक्षात हा लाभ किती शेतकऱ्यांनी घेतला वा त्यांना दिला याची कधी माहिती घेतली काय ? आता पुन्हा घोषणा करण्यात आली की, शेतकऱ्यांना 50 हजार रुपये बिनव्याजी कर्ज देणार. सरकार फक्त घोषणा करते, परंतु त्याची अंमलबजावणी करीत नाही. या घोषणेचा फायदा पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळत असेल, परंतु आमच्या विदर्भातील शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज नाही आणि सहा टक्के दराने कर्जही नाही. मागील वर्षी दुष्काळ पडल्यामुळे कर्जाचे हप्ते पाडून दिले. हे हप्ते फेडता आले नाही म्हणून यावर्षी बँकांनी शेतकऱ्यांना नव्याने कर्जे दिली नाहीत.

सभापती महोदय, गेल्या वर्षी राज्यात ज्या बियाण्यांवर बंदी घालण्यात आली होती ते बियाणे यावर्षी दुकानातून विकली जात आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 17.50

श्रीमती शोभा फडणवीस.... ..

त्यानंतर या दुकानांवर धाडी टाकून ते बियाणे सील करण्यात आले होते. ज्या खतांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आलेली आहे अशा प्रकारची खते मार्केटमधून शेतक-यांना देण्यात येतात.चांगले बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकरी दुकानासमोर रांगा लावतात परंतु त्या बियाण्यां ऐवजी खते घ्या किंवा खता ऐवजी बियाणे घ्या अशा प्रकारची सक्ती त्याच्यावर केली जाते अशा प्रकारे या शेतक-यांची लूटमार केली जात आहे. सभापती महोदय, राज्यातील शेतक-यांना पुरेसे कर्ज वेळेवर मिळत नाही. कर्ज देत असतांना त्यांना कोणत्याही प्रकारची सवलत दिली जात नाही. शेतक-यांच्या पिकाचे नुकसान झाल्यास पीक विमा योजना लागू करण्यात आली असून या विमा कंपन्याकडून नुकसान भरपाई दिली जाईल असे सांगण्यात आले आहे . हे पैसे नेमके कोठे गेले आहेत ?या शेतक-यांना कोणीही वाली राहिलेला नाही. ज्या शेतक-यांच्या पिकांचे नुकसान झालेले आहे अशा शेतक-यांची यादी प्रसिध्द होत असते परंतु प्रत्यक्षात त्यांना या विमा कंपन्याकडून नुकसान भरपाई मात्र दिली जात नाही. तेव्हा विमा कंपन्यांच्या भल्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे की शेतक-यांच्या भल्यासाठी सुरु करण्यात आली आहे ? हेच समजत नाही. विमा कंपन्यांकडून शेतक-यांना नुकसान भरपाईचे पैसे दिले जात नाहीत. अशा प्रकारे शेतकऱ्यांना मारण्याचे षडयंत्र या सरकारने सुरु केले आहे त्यात बदल केला पाहिजे. असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, वादळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे अनेक शेतक-यांच्या जमिनी खरडून गेल्या आहेत त्यांच्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचे पीक घेता येणार नाही. तेव्हा या जमिनीवर माती टाकून ही सर्व जमीन सुपीक करण्याचे काम शासनाने मंजूर करावे व त्यासाठी पुरेशा निधीची तरतूद करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. आज शेतक-यांसाठी अनेक योजना मंजूर केल्या जातात परंतु त्यासाठी पुरेसा निधी दिला जात नाही. नक्षलवाद्याकडून सामान्य माणसाची हत्या झ ाली असेल तरी त्याच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळत नाही. शेतकरी मरत असला तरी त्याच्या कुटुंबियापर्यंत मदत पोहोचत नाही. ज्या शेतक-यांनी कर्जबाजारीपणामुळे वा नापिकीमुळे आत्महत्या केल्या आहेत त्यांच्या विधवा पत्नीसाठी मदतीचा हात पुढे केला जात नाही ,त्यांना मदत दिली जात नाही तेव्हा या विधवा पत्नीना आर्थिक मदत देण्यात यावी. त्याचप्रमाणे शेतक-यांसाठी ज्या काही योजना शेतक-यांसाठी मंजूर करण्यात येतील त्या योजना पैशासह मंजूर करण्यात याव्यात त्याचबरोबर शेतक-यांना बियाणे आणि खते वेळेवर आणि योग्य प्रमाणात पुरविण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करते. 2..

श्रीमती शोभा फडणवीस..

सभापती महोदय, या शेतक-यांवर पोलिसांकडून लाठीमार करण्याचे पाप करण्यात येऊ नये अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला कळकळीची विनंती करते आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

------

यानंतर श्री.जैनुद्दिन जव्हेरी यांचे हिंदी भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापति महोदय, विरोधी पक्ष नेता सम्माननीय श्री फुंडकर जी ने नियम 260 के अन्तर्गत यहां पर प्रस्ताव रखा है, उस पर मैं अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं. मैं इतना ही कहना चाहूंगा कि महाराष्ट्र में काश्तकारों की हालत खराब है. महाराष्ट्र में अच्छी जमीन है, अच्छी फसल हो सकती है, किसान खूब मेहनत करते हैं लेकिन डुप्लीकेट खाद और बीज की वजह से किसान अच्छी फसल नहीं ले पाते हैं. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस की मिली-जुली सरकार है. मेरी समझ में यह बात नहीं आती कि ऐसा क्यों हो रहा है ? हर चीज़ डुप्लीकेट. शासन की मशीनरी है, अधिकारी है, कृषि अधिकारी है, फिर भी ये गलत चीजे हो रही है. सरकारी विभाग छापा डालकर डुप्लीकेट वस्तु बरामद कर सकती है. लेकिन ऐसा नहीं हो रहा है. जिससे गरीब काश्तकारों को बहुत तकलीफ हो रही है. खास तौर से विदर्भ के किसान परेशान है. पिछले 5-6 सालों से हम देख रहे हैं कि विदर्भ के किसान आत्महत्या कर रहे हैं. मेहनत करने के बाद भी किसानों को उनकी उपज से आय नहीं होगी तो वह आत्महत्या नहीं करेगा तो क्या करेगा ? विदर्भ में सिंचाई भूमि की कमी है. विदर्भ का किसान बरसात पर निर्भर है. उसे एक बोरा भी अनाज नहीं मिल पाता. सरकार की कई योजनाएं हैं. सरकार ने किसानों का कर्ज माफ किया है. ब्याज माफ किया है. किसानों को 4 प्रतिशत ब्याज पर कर्ज मुहैया किया जाता है लेकिन बैंक कर्ज देने में असमर्थ है. मुंबई से अकोला, चंद्रपुर, नागपुर में सहायता नहीं पहुंच रही है. आज ही अखबार में खबर छपी है कि काश्तकारों का पैसा बैंकों ने मार दिया. एक तरफ खाद की कमी है, बीज की कमी है, पानी की कमी है तो दूसरी तरफ बैंकों से कर्ज नहीं मिल रहा है. ऐसी स्थिति में किसान आत्महत्या नहीं करेगा तो क्या करेगा ? अगर कर्ज ले भी लिया तो वह लौटाएगा कैसे ? किसानों को कम ब्याज पर कर्ज नहीं मिल रहा है. किसानों के सामने गंभीर परिस्थिति पैदा हो गई है. इसलिए मेरी शासन से विनती है कि इस ओर गंभीरता से ध्यान दें. सरकारी योजनाओं का फायदा किसानों को मिल रहा है या नहीं है, इस ओर सरकार गंभीरता से देखें. दूसरी बात यह है कि इस परिस्थिति के लिए व्यापारियों और काश्तकारों को बदनाम किया जा रहा है. हकीकत यह है कि इस परिस्थिति के लिए उद्योगपति जिम्मेदार है. उद्योगपति कहते हैं कि हमें दो सौ-चार सौ रुपये में पुराता नहीं है. उद्योगपति ज्यादा पैसा लेते हैं और बदनाम छोटा व्यापारी होता है. छोटा व्यापारी मुश्किल से एक या दो ट्रक में भर कर माल लाता है. मैं यह जानना चाहता हूं,

...4



श्री जैनुद्दीन जव्हेरी....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सरकार बताए कि कितने उद्योगपतियों के खिलाफ कार्रवाई की गई है, कितने उद्योगपतियों के खिलाफ केस दर्ज किए गए हैं और कितने उद्योगपति जेल गए हैं ? फेक्टरीवाले माल दबा कर बैठ जाते हैं. खाद, सीमेंट का कालाबाजार हो रहा है. यह गोरखधंधा उद्योगपति कर रहे हैं. उद्योगपति ऐसा क्यों नहीं करेंगे ? उद्योगपति कहते है कि चुनाव के समय उद्योगपतियों द्वारा राजनीतिक पार्टियों को पैसा देना पड़ता है. यह उद्योगपतियों का डायलॉग है. मेरी सरकार से विनती है कि इस बात को गंभीरता से लें. दो-तीन उद्योगपतियों को जेल में बंद करें. डुप्लीकेट खाद, बीज का वितरण न हो सके इसलिए सरकार छापा डाले. अगर छापा नहीं डाला जाएगा तो किसानों की हालत खराब ही रहेगी. मेरी सरकार से अपेक्षा है कि छोटे-छोटे प्यादे मारने की बजाए बड़े-बड़े उद्योगपतियों को ढूंढ कर पकड़े. ऐसा गलत काम कौन कर रहा है, यह बात शासन को भी मालूम है, अधिकारियों को भी मालूम है. जब पेट्रोल-डीज़ल के दाम बढ़ते हैं तो अंबानी जैसे उद्योगपति अरबपति बन जाते हैं. इसलिए इस परिस्थिति में शासन को कठोर भूमिका लेनी पड़ेगी. किसान आत्महत्या के लिए मजबूर न हो. सरकार का डर जरुर रहना चाहिए. जैसे हम ईश्वर से डरते हैं उसी प्रकार से ये नंबर दो का काम करने वाले सरकार से डरे, यही हमारी अपेक्षा है. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

........

यानंतर श्री उपरकर का भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये शेतकऱ्यांच्या व खताच्या पुरवठयाच्या संदर्भात चर्चा उपस्थित केली आहे. त्यानिमित्ताने माझ्या सिंधुदुर्ग जिल्हयामधील उदाहरण मी आपणास सांगू इच्छितो. सन 2008 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे आंबा व काजू पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. एकूण 58,933 हेक्टर जमिनीवरील 1,21,490 शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी केंद्र सरकारने 27 कोटी रुपये मंजूर केले. परंतु कुणाकडून खत घ्यावे, कोणत्या प्रकारचे खत घ्यावे याकरिता कृषी विद्यापीठाकडून मान्यता मिळविण्यासाठी, शिफारस घेण्यासाठी दहा ते बारा महिने हा निधी पडून राहिला. शेवटी मार्च अखेरीस खत घेण्याबाबत कृषी विद्यापीठाने निर्णय दिल्यानंतर 32,736 मेट्रिक टन खत आणि 3,67,444 लिटर किटकनाशके घेण्याचे ठरविण्यात आले. अशाप्रकारे ठरविण्यात आल्यानंतरही खताचे व किटकनाशकांचे वाटप न झ ाल्यामुळे मागील अधिवेशनामध्ये दि. 12 एप्रिल रोजी पुन्हा या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केला.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ...

आणि तो प्रश्न चर्चेला आला. या प्रश्नाला सन 2008 सालामध्ये अवेळी पडलेल्या पावसामुळे झालेल्या नुकसान भरपाईसाठी मार्च 2009 मध्ये आलेल्या निधीचे अद्याप वितरण न झाल्या बाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, सदर खता बाबत एमएआयडीसीबरोबर मार्च अखेरपर्यंत खते वितरित करण्यासंबंधीचा करार केलेला असून दिनांक 15 मे, पर्यंत 100 टक्के खताचे वाटप करण्यात येईल. पण आजमिती पर्यंतची सिंधुदुर्ग जिल्हयाची परिस्थिती अशी आहे की, 32736 मे.टन खता ऐवजी फक्त 1619 मे.टन खताचे वाटप झालेले आहे. त्याचबरोबर 3,67,446 लिटर किटक नाशकापैकी 39990 लिटर किटकनाशकाचे वाटप करण्यात आलेले आहे. याचा अर्थ सुमारे दहा टक्के किटकनाशके आणि खते वाटप करण्याचे काम कृषि विभागाने केलेले आहे.खताच्या वितरणाची व्यवस्था करण्याकरिता एमएआयडीसी बरोबर करार केला एमएआयडीसी ही शासनाची अंगीकृत असलेली संस्था आहे. पण या संस्थेने वेळेवर खते न पुरविल्यामुळे आज शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाकडून आलेला निधी अखर्चित राहिला आहे. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी 100 टक्के खताचे वितरण करण्याचे दिलेले आश्वासन या शासनाने पाळलेले नाही. त्यामुळे आंबा बागायतदारांच्या आंब्यावर आता किटकनाशकांची फवारणी केली तर ती निघून जाईल्. शेतकऱ्यांच्या पिकांच्या लावणीचे काम संपत आलेले आहे. आंबा बागायतदारांना आता खते मिळाली तरी त्याचा उपयोग होणार नाही. सभापती महोदय, ज्या संस्थेने खतांच्या वितरणाचा कृषि विभागाबरोबर करार केला त्या संस्थेने वेळेवर खते न पुरविल्यामुळे त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे? आणि त्यांच्यावर कोणती रिकव्हरी लावण्यात येणार आहे? ही रिकव्हरी केल्यानंतर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय? शेतकऱ्यांच्या 2008 सालामध्ये झालेल्या नुकसान भरपाईची मदत 2010 सालापर्यंत वाटप होत नाही,ही या शासनाची शोकांतिका आहे. शासनाकडून कृषिच्या संदर्भात अनेक वेळा निवेदने केली जातात. खताच्या वितरणाच्या बाबतीत ट्रान्स्पोर्टचे कारण सांगून विलंब झालेला आहे असे सांगून शासनाने वेळ मारुन नेली होती आणि तातडीने खते देण्याचे निदेश देण्यात येतील असे सांगितले होते परंतु अद्याप शेतकऱ्यांना खते मिळालेली नाहीत. तेव्हा याबाबतीतील कार्यवाही करण्यात येणार असेल तरच माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

मंत्रिमहोदयांनी आश्वासन द्यावे. अन्यथा ही सर्व अश्वासने केवळ रेकॉर्डवर येतात. आणि आम्ही ती जमा करतो. ही आश्वासने केवळ प्रोसिडिंगवर येतात पण प्रत्यक्षात कृती होत नाही. केंद्र शासनाकडून सिंधुदुर्ग जिल्हयासाठी आलेला 27 कोटी रुपयाचा निधी शासन अद्याप वितरित करु शकले नाही,अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे खते लवकरात लवकर देण्याच्या दृष्टिकोनातून किंवा रोखीच्या रुपाने देण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने फेर विचार करुन निर्णय घ्यावा अशा प्रकारची मी या ठिकाणी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SMT/ KGS/ MMP/ SBT/ KTG/ 18:00

श्री. सय्यद पाशा पटेल ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, गेल्या दहा-पंधरा वर्षामध्ये आमच्या भागामध्ये बऱ्यापैकी पाऊस पडलेला आहे. माननीय कृषि मंत्रिमहोदयांची यावर्षीची पहिली हेडलाईन अशी आहे की, महाराष्ट्रातील जवळपास निम्म्या जिल्हयातील शेतकऱ्यांना खताची मागणी करीत असताना पोलिसांनी काठया मारल्या. शेतकऱ्यांना खताची गरज असल्यामुळे हे खत विकत घेण्यासाठी ते पैसे घेऊन गेले होते.प्रत्येक विभागामध्ये खरीप पिकाच्या संबंधात आढावा बैठका घेतल्या जातात त्या बैठकांमध्ये शासनाने उर बडवून असे सांगितले की, शेतकऱ्यांना खत कमी पडू दिले जाणार नाही. त्यांना जेवढे खत लागेल तेवढे खत देऊ.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

झाले काय, निकाल काय लागला ? तुम्ही त्यांना मारले. याचा अर्थ शासनाकडे खत कमी होते हे कबूल करावे. दुसरे असे की, शासनाने 8 टक्के खतांच्या किंमतीत वाढ केली आहे. एका बाजूला 100 दिवसात महागाई कमी करणार असे सांगायचे. म्हणजे ही महागाई कोणाच्या बोकांडी मारली आहे ? एका बाजूला 30-35 रुपयांनी खताच्या पोत्याचे भाव वाढले आहेत. सोयाबीनचे एक पोते 3200 रुपये किंमतीला विकले जात होते त्याची किंमत 1800 रुपयांवर आणली आहे. लातूर जिल्हयात तर 1500 रुपयांपर्यंत भाव कोसळला आहे. त्यामुळे एकाही शेतक-याने सोयाबीन विकले नाही. 3200 रुपयांनी विकले जाणारे सोयाबीन 1500 रुपयांने कसे विकावयाचे असा त्यांच्यासमोर प्रश्न पडला आहे. म्हणजे पेरण्याच्या बियाण्याची किंमत कमी केली आहे.

सभापती महोदय, खताच्या बाबतीत नवीन चमत्कार झाला आहे. खताचे स्मगलिंग सुरु झाले आहे. आम्हाला नवीन शब्द ऐकावयास मिळत आहे. शेजारच्या पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका, मलेशिया या देशांमध्ये खतांच्या किंमती जास्त असल्यामुळे आपल्याकडील काही महाभागांनी खताची निर्यात केली. त्यांना शासनाची भीती असती तर आपल्याकडे खते कमी असताना बाहेरच्या देशात खतांची निर्यात करण्याची हिंमत झाली नसती. एकतर यामध्ये शासनाचा सहभाग असेल, आशीर्वाद असेल किंवा पार्टनरशीप असेल. एका बाजूला आपल्या राज्यामध्ये पुरेल एवढा खताचा पुरवठा नसताना आपल्या राज्यातून खतांची चोरुन निर्यात होत असेल तर याचा अर्थ काय आहे ? शासनाची भीती असती तर हे घडले नसते. सभापती महोदय, यावर्षी आणखी एक नवीन गोष्ट पहावयास मिळाली. बोगस खतांचा सुळसुळाट सुरु झालेला आहे. ओरिजिनल खताच्या पिशवीतून खत काढून त्यामध्ये बोगस खत घालून ती पिशवी शिवून खत विकले जाते. हा प्रकार अहमदनगर जिल्हयामध्ये झाला आहे. कृषी खात्याचे कॅबिनेट मंत्री यांच्या जिल्हयामध्ये खतांचे कारखाने जास्त आहेत आणि त्यांच्याच जिल्हयात बोगस खतांचा सुळसुळाट सुरु आहे. काय गबरु आहे ? काय मजा आहे ? हा प्रकार दुसऱ्या जिल्हयात झाला असता तर समजू शकतो.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

परंतु कृषी खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांच्या जिल्हयात बोगस खतांचा सुळसुळाट आहे. दुसरे असे की, ज्या कंपनीला जेवढा कोटा ठरवून दिला जातो तेवढा पुरवठा त्यांनी केला पाहिजे. परंतु या कंपन्यांनी तेवढा पुरवठा केला नाही. तिसरे असे की, व्यापा-यांनी पोत्यामागे 100-200 रुपये अधिक घेतले आहेत. हे सर्व खरीपाच्या हंगामातील महत्वाचे मथळे होते.

सभापती महोदय, आता मी विस्ताराने बोलतो. पोटॅशिअम नायट्रेट, कॅल्शिअम नायट्रेट व युरिया या खतांचा उपयोग काही केमिकल उद्योगांमध्ये सुरु आहे. आता पर्यायी पदार्थ म्हणून कारखानदार या खतांचा वापर करु लागले आहेत. खतांचा शेतीसाठी उपयोग करण्याऐवजी केमिकलसाठी करीत आहेत. हे सर्व दिवसाढवळया सुरु आहे. त्याच्यावर बंधने घातली पाहिजेत. यासाठी वेगळा कायदा करावा. त्याशिवाय त्याला आळा बसणार नाही.

सभापती महोदय, पूर्वी 1 किलो युरिया शेतामध्ये पेरल्यावर कमीत कमी 50 ते 60 किलो अधिक पीक येत होते. आता मात्र 1 किलो युरिया पेरल्यावर केवळ 7-8 किलो अधिक उत्पादन मिळत आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...

म्हणजे जमिनीची उत्पादकता कमी झालेली आहे. जमिनीतील कार्बन कमी झालेला आहे. हा रासायनिक खतांच्या वापराचा परिणाम आहे. जमिनीचा पोत कमी होत चालला आहे. संत कबीर असे सांगतात की, "सब भूमी गोपाल की". आता गो म्हणजे गाई राहिलेल्या नाहीत तर नुसते पाल राहिलेले आहेत. गावामध्ये 5-10 जनावरे देखील राहिलेली नाहीत. तेव्हा या राज्याचा विचार करायचा असेल,या राज्यातील जमिनीचा विचार करायचा असेल, जमिनीचा पोत सुधारण्याचा विचार करायचा असेल तर जनावरांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. पशुसंवर्धन मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आता राज्यात पशुच राहिलेले नाहीत. आपणाला जर रासायनिक खतांच्या तावडीतून सुटायचे असेल तर जनावरांची संख्या वाढली पाहिजे. जनावरांची संख्या वाढेल पण त्यांना खाण्यासाठी काही नाही. गेल्या वर्षीची परिस्थिती आपण पाहिली. कडबा संपला म्हणून ही परिस्थिती निर्माण होऊ लागली. सभापती महोदय, आपणाला लाँग टर्मचा विचार करावयाचा असेल तर जनावरांची संख्या कशी वाढेल यादृष्टीने देखील विचार करावयास पाहिजे.

देशातील खतांचे उत्पादन आणि खर्च यांचा विचार केला तर त्यामधील फरक निम्मा असल्याचे दिसून येईल. भारतामध्ये वर्षाला 13 दशलक्ष टन वेस्टेज तयार होते. या वेस्टेज पासून खते तयार करावयास पाहिजे. या वेस्टेजमध्ये काडी, कचरा आणि मैला आहे. या वेस्टेजचे नीट नियोजन केले तर 13 दशलक्ष टन खत आपण निर्माण करु शकू. ग्रामीण भागामध्ये फुगणारी पण न फुटणारी पुरणपोळी करणा-या स्त्रिला सुगरण म्हटले जाते. चीनमध्ये जी महिला मैला न सांडता शेतामध्ये नेऊन टाकते तिला सुगरण म्हटले जाते. ही गोष्ट आपल्याकडे होणे गरजेचे आहे. खताच्या एका पोत्या मागे विद्राव्य खताची पिशवी घ्यावी लागते. याबाबत लोकांच्या तक्रारी आहेत. खत तयार करण्यासाठी किती खर्च येतो आणि ते किती किंमतीला विकले जाते हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. शहाणे लोक सांगतात की, एक पिशवी खत तयार करण्यासाठी 30-35 रुपये खर्च येतो आणि ती शंभर रुपयास विकली जाते. या माध्यमातून परदेशात चलन चालले आहे. या संदर्भात विचार करण्याची गरज आहे. सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यामध्ये डुप्लीकेट खतांचे कारखाने निघालेले आहेत. हे महाभाग कोण आहेत ते शोधून काढा. अहमदनगर जिल्हयातील गाडेपिंपळगाव, ता. वैजापूर येथे जवळ जवळ 4 ते 5 हजार टन बोगस रासायनिक खत आलेले आहे.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.......

बोगस म्हणजे पोते तेच असते फक्त आतील माल बदलला जातो. ही वस्तुस्थिती वृत्तपत्रात छापून आली आहे. टीव्हीवर लोकांनी पाहिले आहे. हे मी माझ्या मनाचे सांगत नाही. माझी कृषिमंत्र्यांना विनंती आहे. माझ्याकडे औरंगाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांच्या सह्या असलेल्या निवेदनाची प्रत उपलब्ध आहे. मध्यंतरी माननीय कृषिमंत्री मराठवाड्यात आले होते. त्यावेळी त्यांनी जाहीर केले होते की, खरीप हंगामासाठी खते कमी पडू देणार नाही. परंतु शेतकऱ्यांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत शासनाने जरुर लक्ष घालावे.

सभापती महोदय, मी याठिकाणी काही उपाय सुचवू इच्छितो. खताचे रेशनिंग करता आले तर जरुर विचार करावा. ज्याप्रमाणे शिधापत्रिकेवर दरमहा ठराविक किलो गहू व तांदूळ उपलब्ध करुन देता, त्याच धर्तीवर खताचे वाटप करण्याबाबत विचार करावा. ज्याची 10 एकर जमीन असेल त्याला वर्षासाठी किमान 10 किलो खत उपलब्ध करुन देता येईल का याचा विचार व्हावा. जीवनावश्यक वस्तू कायद्याचा वचक निर्माण झाला तर खत आणि बियाण्यांबाबत गैरप्रकार करणाऱ्या मंडळींच्या मनामध्ये भीती निर्माण होईल. रासायनिक खते आणि बियाणे यामुळे पिकाचे नुकसान झाले तर त्या पिकाची किंमत खते आणि बियाणे पुरविणाऱ्या कंपनीकडून वसूल करण्यात यावी. म्हणजे चुकीच्या गोष्टी करण्यास कोणी धजावणार नाही. त्यादृष्टीने कायद्यात तरतूद करण्याबाबत विचार व्हावा. मी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्रीमहोदयांनी द्यावीत एवढे बोलून माझे भाषण संपवितो. जय हिंद.

------------

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, या सभागृहाचे विरोधी पक्षनेते माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे त्या प्रस्तावातील पहिली बाब "राज्यातील वाशिम, बुलढाणा, जळगाव आदी जिल्हयात वादळी पाऊस व अतिवृष्टीमुळे जमीन खरडून जाणे" अशी आहे. सातत्याने होणारे वादळ, अतिवृष्टी आणि त्याबद्दल शासनाकडून जे अनुदान मिळाले पाहिजे, जो परतावा मिळाला पाहिजे तो वेळेवर मिळत नाही. 11 जानेवारी, 2010 रोजी जळगाव जिल्हयात झालेल्या नुकसानीचे पंचनामे होऊन सहा महिने झ ाले तरी अद्याप शेतकऱ्यांना आर्थिक मदत प्राप्त झालेली नाही. मी शासनाला विनंती केली होती की, किमान पेरण्या होण्यापूर्वी ही रक्कम देण्यात यावी. पेरण्या होऊन दीड महिना झाला तरी निधी उपलब्ध झालेला नाही. याठिकाणी कृषिमंत्री उपस्थित आहेत. हा विषय पुनर्वसन खात्याशी निगडित असला तरी माझी शासनाला विनंती आहे की, महाराष्ट्रातील ज्या ज्या जिल्हयांमध्ये अतिवृष्टी, वादळ, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्या शेतकऱ्यांना त्वरेने अनुदान देण्याचा प्रयत्न करावा. मी यापूर्वी हे अनुदान वाढवून देण्याची देखील विनंती केली होती.

सभापती महोदय, शेती हा सर्वात मोठा जुगार आहे. बियाणे मिळाले तर खत मिळत नाही. खत मिळाले तर बियाणे मिळत नाही. दोन्ही मिळाले तर पाऊस येत नाही आणि तिन्ही असतील तर पेरणी होत नाही. अशी शेतकऱ्यांची अवस्था निर्माण झाली आहे. वेळेवर बियाणे आणि खत उपलब्ध करुन देणे अत्यंत महत्वाचे आहे. ज्या दिवशी पेरणी होते त्याच दिवशी त्याठिकाणी खताचा वापर झाला पाहिजे. म्हणून उपलब्धता सर्वात महत्वाची आहे. शासनाने 39 लाख मे.टन खताची मागणी केली होती. खत केव्हा प्राप्त झाले? किती प्राप्त झाले? कसे प्राप्त झाले? या संदर्भात आकडेवारी दिली जाईल. परंतु मी कृषिमंत्र्यांना विनंती करतो की, कृषि विभागात एप्रिल आणि मे महिन्यात स्पेशल सेल निर्माण करावा. त्याठिकाणी बियाण्यांची उपलब्धता आणि खतांची उपलब्धता या दोन बाबी असल्या पाहिजेत. बोगस बियाण्यांच्या संदर्भात देखील अत्यंत जागरुकतेने काम केले पाहिजे. मागील दहा वर्षापासून आपण हे एकत आहोत की, बियाण्यांच्या संदर्भात कायदा केला जात आहे. परंतु अद्याप कायदा अस्तित्वात आलेला नाही. केंद्र शासनाच्या माध्यमातून विलंब होत असेल तर पाठपुरावा करण्यात यावा अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितले की, पिशवी तीच असते, अंदर का माल अलग होता हैं.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ......

हे थांबण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. राज्यात आजच्या परिस्थितीत 30 हजाराच्या वर खताचे एजंट आहेत तरी देखील खत मिळत नाही. म्हणून योग्य वेळी योग्य पध्दतीने खताची व बियाण्याची उपलब्धता झाली पाहिजे अन्यथा एका किलोची बॅग घेण्यासाठी जास्तीचे पैसे द्यावे लागतात. त्या ठिकाणी जर अधिकारी असेल तर त्या पॅकेटची किंमत घेऊन त्या बदल्यात दुसरा माल घ्यायला लावतात, हे देखील थांबविले पाहिजे. म्हणून बोगस बियाण्याच्या संदर्भात जर शासनाला नियम करावयाचे असतील तर त्यामध्ये दंडाची तरतूद करावी आणि त्याची अंमलबजावणी सुध्दा काटेकोरपणे झाली पाहिजे. आमच्या जिल्ह्याचे माननीय पालकमंत्री सभागृहात बसलेले आहेत. त्यांच्या पारोळा गावात खतासाठी मागील वर्षी गोळीबार झाला होता, सुदैवाने यावर्षी मात्र राज्यात कोठेही गोळीबार होऊन शेतकरी मृत झाला नाही. पोलिसांना आणि शेतकऱ्यांनाही मारझोड झाली असेल, ही मारपीट थांबविणे हे सुध्दा अत्यंत महत्वाचे आहे, त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत.

खत आणि बियाण्यांच्या गुणवत्तेच्या तपासणीबाबत प्रत्येक जिल्ह्यात टेस्टिंगची व्यवस्था करुन घेतली तर खताची व बियाण्याची गुणवत्ता तपासता येईल. गेल्या 10 वर्षांची आकडेवारी पाहिली तर 1 लाख 39 हजार कोटीची सबसिडी खतावर दिलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे केंद्रशासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात खतावर जे अनुदान देण्यात येते ते कमी कमी होत आहे. हे अनुदान कमी होणार नाही यासंदर्भात सुध्दा माननीय कृषी मंत्र्यांनी योग्य ती दखल घेऊन शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान कमी होणार नाही असा प्रयत्न करावा. तसेच आपल्या देशात एकूण जे रासायनिक खत येते त्यातील 60 टक्के खत हे आयात करावे लागते. फक्त 40 टक्के खताची निर्मिती आपल्याकडे होते. ही निर्मिती वाढविण्याच्या दृष्टीने देखील प्रयत्न झाले पाहिजेत. शासनाच्या माध्यमातून तसेच कार्पोरेट सेक्टरच्या माध्यमातून जास्तीत जास्त खताची उपलब्धता करण्यासाठी कारखाने वाढविणे ही सुध्दा अत्यंत महत्वाची बाब आहे. परदेशातून जे खत येते ते उतरविण्यासाठी राज्यात एकाही बंदराचा उपयोग होत नाही. त्यातील काही खत गुजरातमध्ये उतरविण्यात येते. मागील वर्षी खत येत नव्हते तेव्हा वास्तविक राजस्थानमध्ये गुर्जर समाजाचे आंदोलन चालू होते. परंतु कारण मात्र सांगण्यात आले होते की, राजस्थानमध्ये रस्ते, रेल्वे

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ......

अडविलेल्या आहेत म्हणून खत मिळत नाही. यावर्षी मात्र तसे काहीही कारण नाही. गुजरातमध्ये खत येऊ शकते मग मुंबईत का येत नाही यासंबंधीची सहज माहिती घेतली असता गुजरातमधील मुंद्रा आणि कांडला बंदरामध्ये हे खत उतरविण्यात येते. या मुंद्रा पोर्टची उत्सुकता म्हणून मी ते बघायला प्रत्यक्ष तेथे गेलो होतो. हे बंदर गुजरात सरकारने प्रायव्हेट सेक्टरला विकसित करण्यासाठी देऊन त्यांच्यामार्फत ही गुंतवणूक करुन घेतली. तशाच पध्दतीचे बंदर आपल्याकडे विकसित केले तर त्याचा फायदा आपल्याला खत उतरविण्यासाठी होईल. अशा प्रकारे गुजरातकडून गाड्या आल्या नाहीत तर पुन्हा त्याचा त्रास होतो. आंध्र प्रदेशात विशाखापट्टणम, ओरिसामध्ये पॅराद्विप बंदरातून आपल्याकडे खत येते. अशा प्रकारे इतर ठिकाण खत उतरविले जाते त्याप्रमाणे आपल्या राज्यात कशा प्रकारे उतरविता येईल याचे नियोजन करावे. तसेच कधी कधी रेल्वेचे रॅक उपलब्ध नसल्याने खताचा पुरवठा होऊ शकत नाही अशी देखील परिस्थिती निर्माण होते. कधी रॅक उपलब्ध होतात पण हमाल मिळत नाही आणि हमाल मिळाले तरी मशिनरीज वापरल्या जात नाहीत आणि हे सर्व असले तरी तेथील लोक काम करीत नाही अशी परिस्थिती असते. खताची वॅगन आल्यानंतर ती 9 तासात खाली करावी लागते परंतु वर सांगितलेली परिस्थिती निर्माण होत असल्याने ती वॅगन 25-25, 30-30 तास खाली होत नाही. परिणामी त्याचा डॅमरेज चार्ज भरावा लागतो. त्यातून पाऊस पडला तरी देखील त्याची क्वॉलिटी बिघडते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

किती तरी छोटया छोटया बाबी आहेत त्या आपण बरोबर करुन घेतल्या तर निश्चितपणे आपल्या शेतक-याला त्याचा लाभ मिळू शकेल.

सभापती महोदय, आपण रासायनिक खत, रासायनिक खत म्हणतो त्यापेक्षा आपले जे नैसर्गिक खत आहे,कंपोस्ट खत आहे त्या खताचे उत्पादन जास्तीत जास्त कसे वाढेल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे गुरांची संख्या कमी होत असल्यामुळे रासायनिक खतांची उपलब्धता कमी झालेली आहे. त्यामुळे नैसर्गिक खतांची जास्तीत जास्त निर्मिती करण्याची आवश्यकता आहे. शेण, गोमूत्राचा उपयोग शेत पिकावर खूप चांगल्या प्रकारे होत असतो. मी काही काही गोशाळा पाहिल्या त्या आपल्या गोशाळेत गोमूत्र 3 रुपये लिटरपासून ते 7 रुपये लिटर दराने विकत असतात. यासाठी नैसर्गिक खतासाठी अनुदान देऊन जास्तीत जास्त नैसर्गिक खत तयार केले पाहिजे. सर्वात उत्तम खत गांडूळ खत असते. एका एका गावात 25-25 गांडूळ खताच्या प्लँटची निर्मिती केली पाहिजे. मध्यंतरी गांडूळ खतासाठी अनुदान दिले जात होते परंतु आता हे अनुदान बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे गांडूळ खतासाठी शासनाने अनुदान सुरु करणे व अनुदान वाढवून देण्याची आवश्यकता आहे. देशी खत जास्तीत जास्त तयार करणे, परेदशातील खत आपल्या पोर्टट्रस्टमध्ये उतरवणे, खत चांगल्या पध्दतीने स्वस्त व वेळेवर कसे मिळेल हे पाहिले तर आपल्याला यश मिळेल व त्यासाठी शासनाने जास्तीत जास्त प्रयत्न करावा अशी विनंती मी माननीय कृषी मंत्र्यांना तसेच माननीय कृषी राज्यमंत्र्यांना करतो व माझे विचार येथेच थांबवतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते माननीय भाऊसाहेब फुंडकर यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्यामध्ये त्यांनी शासनाचे तीन मुद्यांकडे लक्ष वेधलेले आहे.

सभापती महोदय, वाशिम, बुलढाणा, जळगाव आणि इतर भागात अतिवृष्टीमुळे जमिनीचा चांगला थर वाहून जाणे, घरांचे नुकसान होणे व खतांचा तुटवडा होणे या प्रश्नाकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे.

सभापती महोदय, गेल्या वर्षी कोकणात फयान वादळामुळे जे नुकसान झाले होते त्यावर या सभागृहात तास न तास चर्चा झाली होती. त्याच बरोबर पश्चिम महाराष्ट्रामध्ये वेगळया पध्दतीचे तसेच उत्तर महाराष्ट्रामध्ये वेगळया पध्दतीने शेतक-यांचे नुकसान झाले होते. नैसर्गिक आपत्ती शेतीवर येणे ही नित्याचीच बाब झालेली आहे. कधी अती वृष्टीमुळे, कधी दुष्काळ, वादळ किंवा किडीमुळे शेतीचे नुकसान होत असते. शेतक-यांना जे काही बियाणे उपलब्ध करुन दिले जाते त्या बियाण्यांची उगवण क्षमता चांगली नसल्यामुळे हजारो एकर शेतीचे नुकसान होते. मी शासनाला अशी विनंती करतो की, या राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील शेतक-यांना शासनाने दिलासा दिला पाहिजे. दर वर्षी शेतीवर जे आरिष्ट येते ते दूर करण्यासाठी पर्मनन्टली ॲग्रीकल्चर डिझॅास्टर मॅनेजमेंट यंत्रणा कायमस्वरुपी निर्माण केली पाहिजे व त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. असे जर झाले तर आपल्याला शेतक-यांना कायमस्वरुपी दिलासा देता येईल. खरे म्हणजे शेतक-यांच्या परिस्थितीला आपण सर्वजण सरावलो आहेत व त्यामुळे आपण या विषयावर हसत हसत बोलतो आहे. या सदनात या विषयावर आपण ब-याच बर्षापासून चर्चा करीत आहोत. आतापर्यंत 12 हजार शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत असा उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी केलेला आहे. मुंबई,पुणे, नागपूर किंवा प्रत्येक जिल्हयात आज जी काही गर्दी दिसत आहे ती प्रामुख्याने खेडयातील अल्प भूधारक शेतकरी किंवा शे्तीमध्ये उध्वस्त झालेला शेतकरी इकडे येत असल्यामुळे होते आहे. हताशपणे शहराकडे पोटापाण्यासाठी, स्वत:चे भविष्य शोधण्यासाठी तसे येत असतो. हा शेतकरी शेतीतून उध्वस्त झालेला आहे. त्यामुळे मी शासनाला अशी विनंती करतो की, राजकारणाच्या पलिकडे जाऊन

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे....

तुम्हा-आम्हाला यासंदर्भात विचार करावा लागणार आहे. महाराष्ट्रातील शेती निकोप कशी राहील, शेतकरी ख-या अर्थाने शक्तिशाली कसा होईल, बळी राजा कसा सुखी होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बियाणे आणि रासायनिक खताच्या वितरणामध्ये होत असलेला भ्रष्टाचाराच्या पलीकडे जाऊन मी शासनाचे लक्ष वेधणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी साहेबांनी पारंपारिक शेतीचा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ SBT/ KTG/ 18:30

श्री.भगवान साळुंखे....

आज आपण आधुनिकीकरणाच्या नावाखाली शेतकऱ्याला परावलंबी केले आहे. पूर्वी शेतकरी आपल्या घरामध्ये चांगले बियाणे साठवून ठेवत असे व त्यातूनच तो शेती करीत असे. आज त्या शेतकऱ्यांची बियाणे निर्माण करण्याची स्वत:ची क्षमता नष्ट करून टाकली आहे. त्यामुळे त्याला कंपन्यांनी तयार केलेल्या बियाण्यांवर विसंबून रहावे लागते. 1971-72 मध्ये बियाण्यांची जी पिशवी 9 रूपयाला मिळत होती, ती आज 300 ते 400 रूपयाला मिळते आहे. मी बियाण्यांच्या पिशवीबद्दल बोलत आहे. मी कृषि महाविद्यालयांशी,विद्यापीठांशी चर्चा केली. त्यांच्याकडे देखील ओरिजिनल सीडस बँक निर्माण करण्यात आल्या. आज गुणवत्ताधारी बियाणे देखील शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना कंपन्यांवर विसंबून रहावे लागत आहे. मी एकाच मुद्याकडे लक्ष वेधणार आहे. शेती माल उत्पादन करण्यासाठी येणारा खर्च पायाभूत मानून त्यासंबंधी काही विचार करतो का ? शेतकऱ्याला बियाणे विकत घ्यावे लागते, रासायनिक खते विकत घ्यावी लागतात. पूर्वी बैल-गाई-म्हशींकडून शेती करून घेणाऱ्या शेतकऱ्यांचे पशुपालन आता संपुष्टात आले आहे.

आता शेतकऱ्यांमध्ये चार प्रकार झाले आहेत. आता आपण अल्पभूधारक नावाचा शेतकरी तयार केला आहे. जमिनीचे हिस्से खूप पडल्यामुळे एक हेक्टरच्या आत जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना आपण अल्पभूधारक शेतकरी म्हणतो. या महाराष्ट्रामध्ये 70 टक्के शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. 1 पासून 5 हेक्टर जमीन असणारा शेतकरी हा दुसऱ्या वर्गामध्ये येतो. एक उत्पादक जमीनदार शेतकरी असा वर्ग आहे दुसरा अनुत्पादक जमीनदार शेतकरी वर्ग आहे. म्हणजे जमीन 100 एकर आहे, पण ती माळरान आहे. त्याचे जमीन पिकविण्याकडे लक्ष नाही असा शेतकरी वर्ग आहे. तो फक्त थोडी जमीन पिकवितो आणि कसा तरी जगतो. असे शेतकऱ्यांचे प्रकार आहेत. मी फक्त पहिल्या दोन प्रकारांबद्दल बोलणार आहे. अल्प आणि मध्यम भूधारक शेतकरी यांच्याबद्दल बोलणार आहे. हा शेतकरी एक एकर ते 5 एकर जमिनीचा मालक असतो. हा शेतीचा कणा असलेला शेतकरी आहे. हा शेतकरी प्रमाण मानला पाहिजे. त्याचा उत्पादन खर्च किती येतो हे पाहिले पाहिजे. त्याला बियाणे पुरतात किंवा नाही हे पाहिले पाहिजे. त्याला केंद्रबिंदू मानून बियाणे, खत पुरविले पाहिजे. पूर्वी तो पारंपरिक पद्धतीने शेती करीत होता. त्याला आता यांत्रिक शेती करावी लागत आहे. ट्रॅक्टरने नांगरणी करावी लागते. पूर्वी त्याला शेतमजूर सहजपणाने मिळत होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ SBT/ KTG/ 18:30

श्री.भगवान साळुंखे....

आपण मिनिमम वेजेस ॲक्ट आणला. पण आज खेड्यामध्ये त्याला मजूरसुद्धा उपलब्ध होत नाही. शेतमजुरांसाठी त्याला सव्वाशे ते दीडशे रूपये द्यावे लागतात. हा मजूर दिवसातील 4-5 तास सुद्धा शेतावर काम करीत नाही. कारण त्याच्या डोळ्या समोर शहरातील मजुरांच्या मजुरीचे चित्र असते. त्यामुळे शेतकऱ्याला नाईलाजाने जास्त मजुरी द्यावी लागते. शेतीवर नाना प्रकारची कीड देखील पडते. त्यातून शेतकरी काही तरी पिकवित असतो. पीक जेव्हा मार्केटमध्ये विकण्यासाठी घेऊन जातो त्यावेळी त्याची लुबाडणूक आणि फसवणूक करणारी एक प्रचंड यंत्रणा आपण या देशात निर्माण केलेली आहे. पोसलेली आहे, सांभाळलेली आहे. ती यंत्रणा आपण सुरक्षित केली आहे. त्या यंत्रणेला आपण आजही पाठीशी घालत आहोत. आदरणीय श्री.बाळासाहेब थोरात यांच्यासारखा भूमिपुत्र, शेतकरी मुलगा राज्याचा कृषि मंत्री आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांनी आजच्या परिस्थितीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे असे मला या निमित्ताने सुचवावयाचे आहे. शेतकऱ्यांना येणारा उत्पादन खर्च आणि अडचणी बाजूला काढून उत्पादनावर आधारित शेती कशी करता येईल याचा विचार केला पाहिजे. तसेच त्याच्या मालाला योग्य भाव कसा मिळेल यासाठी देखील यंत्रणा उभी केली पाहिजे. यासाठी उत्तम प्रकारची राजकीय इच्छा शक्ती असणे आवश्यक आहे. यासाठी भूमिपुत्राचे प्रेम आवश्यक आहे. ते जर नसेल तर आपण येथे पांडित्यपूर्ण ठिणग्या पाडून काहीही होणार नाही. म्हणून मी पोटतिडकीने आणि कळकळीने सांगेन की, इतर सगळ्या विषयामध्ये आपल्या भूमिका वेगळ्या असू शकतील .........

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्याच वेळी आपले खत हे व्यापाऱ्यांच्या गोडाऊनमध्ये पडलेले होते, पण व्यापारी खत देत नव्हता. दिनांक 22 जून रोजी आमच्या नांदूरा जिल्ह्यात प्रतीक ॲग्रो सेंटर आहे. तेथे DAP 102626 खत येणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी पहाटेपासून रांगा लावल्या. दुपारी 3.00 पर्यंत खताचे वाटपच केले नाही. शेतकरी उपाशी-तापाशी खतासाठी उभे होते. खत मिळाले नाही तर माऊलीची पेरणी होणार नाही. सकाळी उठल्या बरोबर शेतकऱ्याने काय केले असेल तर त्या दुकानासमोर रांग लावली. पण दुपारी 3 वाजेपर्यंत त्याला खताचे पोते देखील मिळाले नाही. मग कृषि अधिकारी आले. मग त्यांच्याच गाडीला घेराव घालण्यात आले. 1 जुलै - बीड जिल्ह्यात खतासाठी शेतकऱ्यांची झुंबड उडाली. त्यामुळे पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीहल्ला केला. त्यामुळे दुकानदाराने दुकान बंद केले. कोणाचे राज्य चालले आहे ? राज्य कोण करते आहे ? व्यापारी त्यांच्या मनाप्रमाणे दुकाने बंद करीत आहेत. शेतकऱ्यांची झुंबड झाली म्हणून व्यापारी दुकाने बंद करीत आहेत. शेतकऱ्यांनी लाईन लावली म्हणून व्यापारी दुकान बंद करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्याला खत मिळत नाही. 6 जून रोजी जळगाव जिल्ह्यातील शेतकरी खत केंद्र बंद पडल्यामुळे चिंतेत होता. रासायनिक खताच्या टंचाईचा फायदा घेऊन खत कंपन्यांनी मिश्र खता बरोबर सेंद्रीय व द्रवरूप खताशी लिंकिंग करून नवीन खताचे उत्पादन खपविण्याचा गोरख धंदा केला. हे ही धंदे आता सुरू आहे. दुकानदार सांगतो मी खत देतो पण त्या बरोबर अमूक एक बियाणे घेतले पाहिजे. निकृष्ट दर्जाचे खत घ्यावे लागेल. हे जर घेणार नसाल आपल्याला खताची एकही थैली देणार नाही हे ही धंदे आता सुरू झाले आहेत. एका बाजूला खत कंपन्या आणि विक्रेते संगनमत करून राज्यातील शेतकऱ्यांची लूट करीत आहेत. असे असताना कृषि खाते मात्र झोपलेले आहे. भरारी पथके निर्माण केली. या पथकाने किती ठिकाणी धाडी टाकल्या. शेतकऱ्यांनी फोन केले, ओरड केली, घेराव घातला म्हणून तिथल्या कृषि अधिकाऱ्याला जाग आली आणि मग त्याने धाडी टाकण्याचे काम केले आहे. 16 जून 2010 रोजी जाफ्राबाद जिल्हा जालना येथे पोलीस बंदोबस्तात खत वाटप करण्यात आले. असे कधी या राज्यात घडले आहे काय ? आता पोलीस बंदोबस्तात खत वाटप करावे लागत आहे. का ? आपण 80 टक्के साठा महाराष्ट्रात पाठविला आहे ना ? नियोजन केल्याप्रमाणे 80 टक्के खत राज्यात पोहोचले आहे ना ? असे जर असेल तर पोलिसांना रांगा लावून खत वाटण्याचे कारण काय आहे ? याचेही उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे. गतीवर्षीच्या तुलनेत पूर्णा खरेदी-विक्री संघाला 30 टक्के पुरवठा झाल्यामुळे खताची विक्री 100 ते 150 रूपये जादा घेऊन करण्यात आली. हे माझे म्हणणे नाही. मुख्यमंत्र्यांच्या नांदेड जिल्ह्यात खतावरून दगडफेक झाली. नवामुंडा नांदेड बसमत हिंगोली येथे लाठीमार करावा लागला. मग त्यावेळी पोलीस बंदोबस्तात रांगा लावून खतांचे वाटप मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात झाले. अजूनही माझ

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याकडे 10 पुरावे आहेत. मी आपला जास्त वेळ घेणार नाही. राज्यभर खताची तीव्र टंचाई आहे. शासन त्याचे कारण आम्हाला देते की, आम्हाला रॅक मिळाला नाही. मागच्या वर्षी वेगळे कारण आणि या वर्षी वेगळे कारण. मागच्या वर्षी सांगितले की, गुजरात, राजस्थानमध्ये आंदोलन चालू आहे. त्यामुळे आमचे खताचे रॅक अडकले. ह्याही वर्षी सांगितले की, रॅक उशिरा पोचत आहेत. हमलांचा संप आहे. रेल्वे बोगी मिळत नाही. अशा प्रकारची कारणे सांगून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. एका बाजूला ही कारणे सांगितली जातात आणि दुसऱ्या बाजूला गोदामे खताने भरलेली असतानासुद्धा त्याला कुलूपे लावून ठेवलेली आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे..

परंतु आपल्याला शेतकऱ्यांच्या हितासाठी एकाच व्यासपीठावर यावे लागेल. खेड्यातील उद्ध्वस्त शेतकरी, वैफल्यग्रस्त होऊन व्यसनग्रस्त होणारा शेतकरी, कर्जबाजारीपणामुळे उद्ध्वस्त होणारा शेतकरी आणि स्वत:ला अपराधी मानून मनोधैर्य खचलेला शेतकरी असे चित्र आपण खेड्यापाड्यात पाहतो आहोत. हे चित्र आपल्या लोकशाही आणि स्वातंत्र्याला आलेले एक निकृष्ट दर्जाचे फळ आहे. हे निकृष्ट दर्जाचे फळ कायमचे काढून टाकण्यासाठी आपणास योग्य पध्दतीची उपाय योजना केली पाहिजे एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांचे विचार मांडले. सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी आणि पाशा पटेल यांनी सांगितले की, जनावरांची संख्या कमी झालेली आहे, जमिनीची उत्पादकता कमी झालेली आहे आणि जमिनीतील कार्बन कमी झालेला आहे. जमिन जीवंत आहे आणि तिच्यात जीवाणू आहेत. जमिनीतून उत्पादन काढावयाचे असेल तर त्यासाठी खताची आवश्यकता आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांची खतांच्या बाबतीतील मक्तेदारी इतकी वाढली आहे की, केंद्र सरकार खतावर जी सबसिडी देते ती देखील कमी करण्यास भाग पाडले. आपण ही मक्तेदारी मोडून काढली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना सांगू इच्छिते की, "तुझे आहे तुज पाशी, परंतु जागा भुललासी".

सभापती महोदय, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने सेंद्रीय खत निर्मितीवर लक्ष दिले तर आपणास मक्तेदार कंपन्यावर विसंबून रहावे लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. सेंद्रीय खतामध्ये कार्बन निर्माण करण्याची क्षमता आहे. जी गोष्ट पाहिजे आहे ती गोष्ट निर्माण करण्याची क्षमता सेंद्रीय खतामध्ये आहे. सेंद्रीय खत तयार करण्यासाठी जास्त खर्च येत नाही. अत्यंत कमी खर्चात बायोडायनामिक नावाचे खत करता येते. यासाठी बांधावरील काडीकचरा, बेशरम, गाजरगवत, लव्हाळा, हरळी, सरमाड,गव्हाचे काड, ज्वारीची धसकट, केळीचे पाने, तसेच बांधावरील, शेतावरील किंवा पांदणमध्ये असलेल्या ओल्या किंवा वाळलेल्या कचऱ्यापासून आपण बायोडायनामिक खत तयार करु शकतो. त्यासाठी 15x20 चा डेपो करुन त्यामध्ये सीपीपी खताचे द्रावण करुन बायोडायनामिकतेतील अल्टरनेट लेअर्सला वापरले तर एक डेपा चार एकर जमिनीला पुरेल इतके सेंद्रीय खत निर्माण करतो. आपण हा प्रयोग का करीत नाही. प्रत्येक तालुका कृषी अधिका-याकडे बीडी 502, 503, 504, 506 असे कीटस् उपलब्ध आहेत. हे सर्व कीटस आणि दुभत्या गाईचे शेण घेऊन 3x2 चा खड्डा करुन त्यामध्ये 50 किलो शेण, 250 ग्रॅम खडीचा चुरा, 250 ग्रॅम अंड्याची टरफले आणि ज्यांना अड्यांना हात लावायचा नाही त्यांनी 250 ग्रॅम शिंपले

ॲड.उषा दराडे......

टाकावे या सर्वांच्या मिश्रणापासून सीपीपी खत तयार होते. या खताची क्षमता इतकी मोठी आहे की, एक किलो खत एक एकर जमिनीसाठी पुरे आहे. सीपीपी खत तयार करण्यासाठी जे कीटस् वापरले जातात ते कृषी कार्यालयामध्ये सहज उपलब्ध होतात. आपण या खताचा वापर का करीत नाही. या एक खताच्या पिशवीचा आपण बीजप्रक्रियेसाठी वापर करु शकतो. एक किलो सीपीपी खताचे ओले द्रावण करुन त्यामध्ये कापसाचे किंवा अन्य बियाणे भिजवून ते एक तास वाळत ठेवून नंतर त्याची लागवड केल्यास त्या बियाण्याची उगवण क्षमता चांगली होतेच, परंतु त्यावर कोणत्याही किडीचा प्रादूर्भाव होत नाही इतकी प्रचंड प्रतिकार शक्ती त्या बियाणामध्ये असते. म्हणून आपण सीपीपीचे खत तयार केले पाहिजे.

सभापती महोदय, गायीच्या शिंगापासून बीडी 500 नावाचे खत तयार केले जाते. 3x2 चा खड्डा करुन दुभत्या गाईचे शेण कोजागिरी पोर्णिमेच्या दिवशी गायीच्या शिंगामध्ये भरुन ते शिंग खड्डयामध्ये वरती तोंड करुन ठेवायचे आणि बाजूने लिंबाचा पाला टाकून तो खड्डा बंद करायचा. त्यांनतर रामनवमीपर्यत काहीही करायचे नाही. रामनवमीच्यादिवशी ते शिंग बाहेर काढायचे शिंगामध्ये अत्यंत सुगंधी पावडर तयार होते.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ..........

ही 30 ग्रॅमची सुगंधी पावडर क्लॉकवाईज आणि ॲन्टी क्लॉकवाईज 13 लिटर्स पाण्यामध्ये ताक घुसळल्याप्रमाणे घुसळून त्याचे द्रावण तयार केले आणि ते द्रावण एक एकर जमिनीमध्ये टाकले तर त्याचा फायदा चांगला होऊ शकतो. दिवसभर ऊन असल्यामुळे हे द्रावण शेतामध्ये टाकता येणार नाही परंतु संध्याकाळी लिंबाचा डहाळा घेऊन 30 ग्रॅम पावडरीचे द्रावण टाकण्याचे ठरविले तर हे सर्व द्रावण एक एकर जमिनीला पुरेल. असे असतांना विविध कंपन्यांच्या कशासाठी जास्त पुढे पुढे करतो ? बीडी 501 नावाचे खत रांगोळी पासून तयार करता येते.ग्रामीण भागातील महिला दारासमोर शेणाचा सडा आणि रांगोळी घालतात त्यामध्ये फार मोठे विज्ञान आहे.रांगोळी आणि शेणाचा सडा याचे एकत्रित मिश्रण झाल्यानंतर उकिरडयामध्ये ज्याप्रमाणे खत तयार होते तशा प्रकारचे खत तयार होत असते.गाईच्या शिंगामध्ये जर शिरगोळा ओला करुन भरला आणि 3 बाय 2 च्या खडड्यातून बीडी 501 नावाचे खत तयार करु शकतो. त्यामध्ये पुन्हा एकदा शिंग वर टोक करुन ठेवले व त्यामध्ये लिंबाचा पाला टाकून रामनवमीला ते झाकून टाकले आणि कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी काढले तर त्यापासून चांगले खत मिळते. हे शिंग जवळजवळ दहा वर्षे चालते.अशा प्रकारे बीडी 501 नावाचे खत तयार होऊ शकते. एक ग्रॅम खत एक एकर जमिनीला पहाटे चार वाजता 13 लिटर्स पाण्यामध्ये द्रावण टाकले आणि आभाळाकडे नोझल करुन संपूर्ण जमिनीवर सूर्य किरणे उगवण्याच्या आत ते फवारले तर कोणत्याही प्रकारचे दुसरे कीटक नाशक त्या जमिनीसाठी वापरण्याची गरज पडणार नाही. त्या पिकासाठी वा जमिनीसाठी ज्या प्रकारचे वातावरण आवश्यक असते ते वातावरण एक ग्रॅम खतामुळे निर्माण होऊ शकते असे मला सांगावयाचे आहे. त्यासाठी जी रांगोळी लागते ती विकत घेण्यासाठी फारसे पैसे लागत नाहीत. गाईचे शिंग एकदा वापरण्यासाठी घेतले की ते दहा वर्षे चालते.अशा प्रकारे कमी खर्चात जे खत निर्माण होऊ शकते ते खत आपण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,कोंबडीच्या विष्टेपासून अशा प्रकारे बायो डायनामिक खत तयार केले जाऊ शकते त्याचबरोबर 40 दिवसात खत तयार केले जाऊ शकते. गुळाच्या पाकाने भरलेल्या काचेच्या भरणीमध्ये बुडेल एवढें मासे टाकून 40 दिवस जर बंद करुन ठेवले व 40 दिवसानंतर 30 ग्रॅम द्रावण काढून ते पाण्यामध्ये मिक्स करुन पिकांवर मारले तर उत्कृष्ट प्रकारचे टॉनिक मिळू





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकते. त्याचबरोबर लिंबाच्या रसामध्ये 40 दिवस अंडी भिजत घातली तर त्यापासून जे द्रावण तयार होते त्यातूनही उत्कृष्ट प्रकाराचे खत मिळू शकते. त्याचबरोबर एक लिटर रॉकेलमध्ये एक किलो तंबाखू रात्रभर भिजत घालावयाची तसेच लसणाची आणि हिरव्या मिरचीची पेस्ट रात्रभर भिजत घालावयाची अशा प्रकारची ही तिन्ही द्रावणे दुस-या दिवशी सकाळी गाळून घेतल्यानंतर फवारणी केली तर दुसरे कोणतेही कीटक नाशक बाजारातून विकत आणण्याची गरज पडणार नाही. एवढी प्रचंड ताकद या द्रावणामध्ये आहे.

सभापती महोदय, वडाच्या झाडाच्या खालची माती, गाईचे शेण, गोमूत्र ,गूळ आणि डाळीचे पीठ एकत्र केले तर चांगल्या प्रकारचे जीवामृत तयार होऊ शकते. गांडूळ खताच्या संदर्भात सर्वाना माहिती आहेच त्यामुळे मला त्यासंबंधी वेगळे काही सांगण्याची गरज नाही.या सगळया खताचे पेस्ट करु शकतो आणि त्याचे द्रावण करुन शेतामध्ये शिंपडू शकतो वा .झाडाच्या बुडाला छिद्र पाडून त्यामध्ये हे द्रावण टाकू शकतो.बायोगॅसपासून देखील खत तयार केले जाऊ शकते. पूर्वीच्या काळी जमिनीमध्ये सोनखत तयार केले जात असावयाचे. या खताच्या बाबतीत शासनाने धोरण तयार करावे यासाठी मी अनेकदा या सभागृहामध्ये मागणी केली होती. माननीय कृषी मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांचे मला अभिनंदन करावयाचे आहे.मराठवाडा विभागामध्ये कृषीच्या संदर्भात मध्यंतरी एक बैठक आयोजित करण्यात आली होती त्या बैठकीमध्ये लवकरच सेंद्रिय खताच्या बाबतीत राज्य शासन धोरण जाहीर करील असे त्यांनी सांगितले होते. सभापती महोदय, या प्रस्तावाच्या चर्चेच्या निमित्ताने मला त्यांना अशी विनंती करावयाची आहे की,सेंद्रीय खतामुळे संपूर्ण जगामध्ये आपला देश श्रीमंत होऊ शकतो आणि मक्तेदाराच्या तावडीतून आपण वाचू शकतो.इतकेच नव्हे तर शेतक-यांनासुध्दा आपण वाचवू शकतो. कृषी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये सेंद्रिय खताचा समावेश करावा यासाठी मी या पूर्वी मागणी केली होती माननीय मंत्री महोदयांनी ही मागणी मान्यही केली होती परंतु त्याबाबतीत अजून अंमलबजावणी झालेली नाही.शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये शेती विषयाचा देखील समावेश करावा अशी मी मागणी केली होती त्या मागणीचीसुध्दा अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. सेंद्रिय खताच्या संदर्भात शासन

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अॅड.उषा दराडे ..........

लवकरच धोरण जाहीर करणार आहे असे सांगण्यात आले आहे. तेव्हा माननीय कृषी मंत्री लवकरच हे धोरण जाहीर करतील आणि मक्तेदारी असलेल्या परराष्ट्रीय कंपन्याच्या तावडीतून शेतक-यांना वाचवले जाईल तसेच जमीन आणि जमिनीतील जीवाणू जीवंत ठेवतील तसेच उत्पादकता वाढवतील अशी अपेक्षा माननीय कृषी मंत्र्याकडून मी व्यक्त करते आणि माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

----------------------------------------- नंतर सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

सभापती महोदय, या चर्चेमध्ये भाग घेत असतांना अनेक माननीय सदस्यांनी खताच्या टंचाईबाबत शासनाने कोणती कारवाई करावयास पाहिजे यावर सविस्तरपणे आपले विचार मांडले. या खताच्या टंचाईला जेवढे शासन जबाबदार आहे तेवढीच एक गोष्ट जबाबदार आहे ती मला याठिकाणी मांडावयाची आहे. आमच्या मराठवाडयामध्ये एक म्हण अशी आहे की, जर आपल्याला पंगतीमध्ये चांगले जेवायचे असेल तर चांगला वाढपी असावा लागतो, तो ओळखीचा असावा लागतो. आज आपण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खताच्या टंचाईची चर्चा ऐकतो, वर्तमानपत्रातील बातम्यांमध्ये वाचतो. परंतु त्याचबरोबर खताचा पुरवठा करणारी वितरण व्यवस्था सुध्दा कार्यक्षम नसल्यामुळे आज आपल्याला हे परिणाम पहावयास मिळत आहेत. याबाबतीत आमच्या परळीचे उदाहरण आपल्याला सांगता येईल. आमच्या परळीच्या रेल्वे स्टेशनवर साऊथ रेल्वेने आलेले खत 24 मे 2010 ते 24 जून 2010 पर्यंत उतरवून घेण्यात आले नाही. डॅमरेज चार्जेसमध्ये चार पटीने वाढ झाल्यामुळे खताचे अनलोडींग करणाऱ्या कॉट्रॅक्टरने कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता शासकीय पातळीवर डॅमरेज चार्जेस कमी करण्यासाठी चार-चार दिवस हालचाली केल्या. व त्यामधून फायदा मिळविण्यासाठी त्या कॉट्रॅक्टरने खत उतरवून घेतले नाही. त्याचा परिणाम असा झाला की, त्याठिकाणी आलेले हजारो टन खत पावसाच्या पाण्यामध्ये वाहून गेले, त्याचे पाणी झाले ही वस्तुस्थिती आहे. अशाप्रकारची अनेक प्रकरणे बीड, परभणी व नांदेड जिल्हयामध्ये झाली आहेत. त्यामुळे या गोष्टीला वितरण व्यवस्था सुध्दा कारणीभूत आहे. अशाप्रकारचे शासनाचे धोरण असल्यामुळे आज महाराष्ट्रामध्ये व देशामध्ये व्यवस्थित रितीने खत पुरवठा होत नाही. याठिकाणी माननीय सदस्यांनी सांगितले की, संपूर्ण देशामध्ये फक्त 40 टक्के खताचे उत्पादन होते व राहिलेले 60 टक्के खत आपल्याला परदेशामधून आयात करावे लागते. अशावेळी आपल्याला मुबलक खत मिळाले असते तर ते शेतकऱ्याला पुरविता आले असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. धनंजय मुंडे....

सभापती महोदय, आज जगभर जागतिक मंदी आहे. संपूर्ण जगामध्ये चीन आणि अमेरिकेमध्ये जास्त प्रमाणात खताची निर्मिती होते. जागतिक मंदीच्या काळात इतर देशांनी सुध्दा कमी भावामध्ये खत घेतले. त्याचबरोबर जगातील खत उत्पादकांनी सुध्दा खताचे भाव कमी-जास्त होतील म्हणून कमी भावामध्ये जगभर खत विकले. अशावेळी केंद्र सरकारचे कृषी खाते झोप काढीत होते. त्यावेळी जर आपण कमी भावामध्ये खत घेतले असते तर आज ही परिस्थिती निर्माण झाली नसती व शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असता. आज शेतकऱ्यांना खरीप पिकाच्या काळात खताची आवश्यकता असल्यामुळे कृषी खात्याने जागरुक राहिले पाहिजे. खताच्या मागणीप्रमाणे वितरण व्यवस्थेमार्फत खताचा पुरवठा करण्यात आला पाहिजे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांनी कृषी खाते खत विकत घेते असे सांगितले. मला त्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, केंद्र सरकारमध्ये खत विकत घेण्यासाठी स्वतंत्र फर्टिलायझर डिपार्टमेंट आहे. त्यामुळे चुकीची नोंद रेकॉर्डवर होऊ नये याकरिता मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या हरकतीच्या मुद्याच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे. श्री. रामविलास पासवान यांच्या अधिपत्याखाली जे खाते आहे त्या खात्याबाबत ते सांगत आहेत. पण या देशामध्ये खताची गरज किती आहे याचे धोरण ठरविण्याचा अधिकार कृषि खात्यालाच आहे.

सभापती महोदय, या हरकतीच्या मुद्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, केंद्र शासनातील कृषि खात्याचे मंत्रिमहोदय माननीय श्री. शरद पवार साहेबांनी विस्कळीत धोरण निर्माण केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी या ठिकाणी कोणाचेही नाव घेतले नाही. मी फक्त कृषि खात्यासंबंधी सांगितले. त्यावेळी या देशातील खताची मागणी जर कृषि खात्याला कळली नसेल तर याला जबाबदार कोण? ठीक आहे, खते विकत घेणारे खाते कदाचित दुसरे असेल. सभापती महोदय, मला या ठिकाणी एवढेच सागावयाचे आहे की, शासकीय धोरण खते टंचाईला जेवढे जबाबदार आहे तेवढेच ट्रान्स्पोर्टेशन सुध्दा जबाबदार आहे. या दोन्ही गोष्टी जोपर्यत व्यवस्थित होत नाहीत तोपर्यंत प्रत्येक वर्षी खताची टंचाई राहणार आहे. मागच्या वर्षी गोळीबार झाला. या वर्षी असंख्य लाठीचार्ज झाले. पुढच्या वर्षी आणखी काही अशीच परिस्थिती निर्माण होईल. शेतकरी अतिशय कठीण परिस्थितीत आहे. हा शेतकरी उद्या संपतो की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या परिस्थितीत शासनाने शेतकऱ्याला दिलासा देणे आवश्यक आहे. एवढीच सूचना करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना उत्तराच्या भाषणासाठी साधारणत: किती वेळ लागणार आहे?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, साधारणपणे 20 ते 25 मिनिटे लागतील.

**उपसभापती** : आपले उत्तराचे भाषण उद्या सकाळी ठेवले तर चालेल काय?

श्री. बाळासाहेब थोरात : ठीक आहे. काही हरकत नाही.

**उपसभापती** : उद्या सकाळी 10.30 ते 11.00 या वेळेत माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण घेण्यात येईल.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी नियम 260 अन्वये दिलेला प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला आहे. आता आपण सन 2009 चे वि. स. वि. क्रमांक 41 चर्चेला घेऊ.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वि.स.वि. क्रमांक 41 आज चर्चेला घेऊ नये. आज सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 9, सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 62 आणि सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 64 ही विधेयके चर्चेला घ्यावीत.

**उपसभापती** : ठीक आहे. यानंतर सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 9 चर्चेला घेऊ.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO. IX OF 2010.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.)**

श्री. प्रकाश सोळंके (पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 9- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 9- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक सभागृहात मांडण्यात आलेले आहे. या ठिकाणी कृषी पणन महासंघाच्या संचालकांचे अधिकार वाढविणे किंवा ज्यांच्याकडे जास्त अधिकार आहेत ते दोन संचालकांना देणे यासंदर्भात हे विधेयक आहे. संचालक मंडळाला अधिकार देणे किंवा त्यांचे अधिकार वाढविणे हा भाग सोडला तरी खऱ्या अर्थाने कृषी पणन महासंघाचे काम कसे आहे आणि त्या ठिकाणी शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळतो का हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, स्व. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणावर विचार केला होता आणि तो विचार करीत असताना त्यांनी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे भले केले. परंतु आता शेतकरी कापसाची विक्री करावयास गेला तर त्या ठिकाणी त्यांची लूट होते. त्या ठिकाणी ग्रेडर त्यांना लुटत असतात. कृषी पणन महासंघाच्या ठिकाणी त्यांचे पैसे बरोबर मिळत नाहीत. या सगळ्या गोष्टींकडे लक्ष देण्यास कोणालाही वेळ नाही. फक्त अधिकार वाढविणे आणि मोठ्या प्रमाणावर वरची पदे भरणे असाच प्रकार होणार असेल तर शेतकऱ्यांना न्याय मिळेल काय याचा विचार करण्याची गरज आहे. कृषी पणन महासंघ असेल, कृषी उत्पन्न बाजार समिती असेल या संस्था शेतकऱ्यांच्या भल्यासाठी निर्माण केलेल्या आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांचे खऱ्या अर्थाने भले होते की नाही याचा विचार कृषी खात्याने करणे आवश्यक आहे. पणन महासंघाच्या अनुषंगाने विचार केला तर त्या ठिकाणी ज्यावेळी शेतकरी कापूस विक्री करण्यासाठी जातो तेव्हा त्याचा कापूस बरोबर खरेदी केला जात नाही. त्याला पैसे सुध्दा बरोबर मिळत नाहीत. तीन तीन दिवस त्या शेतकऱ्यांना त्या ठिकाणी राहावे लागते. त्यांना तीन तीन दिवस त्या ठिकाणी राहावे लागत असताना बैलांसाठी लागणारा चारा, पोटासाठी लागणारी भाकरी तसेच तीन दिवस थंडी-पावसात त्यांना राहावे लागणे या सर्वच दृष्टीकोनातून त्यांच्यावर अन्याय होतो. अनेक वेळा धान विकावयास गेलेल्या शेतकऱ्यांना पोती मिळत नाहीत. शेतकरी कापूस विकावयास गेला तर त्या ठिकाणी मोठी रांग असते त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. कधी ग्रेडर नसतात तर कधी व्यवस्थापक नसतात. ज्यांच्यासाठी सगळे धोरण आखलेले आहे त्यांचा विचार करण्याचे सोडून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्रीमती शोभा फडणवीस ....

केवळ मोठ्या प्रमाणावर संचालकांची पदे वाढविणे, त्यांचे अधिकार वाढविणे आणि कृषी पणन महासंघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लुटण्यासाठी नवीन कुरण तयार करणे अशाच पध्दतीने काम होणार असेल तर शेतकऱ्यांना कोणीही न्याय देऊ शकणार नाही. एक तर शेतकऱ्यांनी कापूस पेरण्याचे प्रमाण कमी केलेले आहे. त्याचे कारण असे की, आज मिळालेला भाव उद्या मिळेल की नाही याची शाश्वती नाही. शासन आज कोणता भाव ठरविते आणि उद्या कोणता भाव ठरवील हे माहीत नाही. त्यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने फायदा होत नाही.

सभापती महोदय, कृषी पणन महासंघ कधी फायद्यात गेल्याचे दिसत नाही. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कापूस खरेदी केला जातो. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर ग्रेडींग ठरविले जाते. तरी सुध्दा कृषी पणन महासंघ तोट्यात का जातो, हे कळत नाही. प्रत्येक वेळी या जिनिंगला आग लागली, त्या जिनिंगला आग लागली असे प्रकार घडतात. या आगी कशा लागतात याचा विचार केला पाहिजे. अशा आगी लागल्यानंतर शॉर्ट सर्कीटमुळे आग लागली असे सांगितले जाते. म्हणजे विद्युत केंद्रावर ढकलून दिले की, पुन्हा पणन महासंघाला सवलत मिळत असते. म्हणून शासनाने संचालकांना अधिकार देण्याच्या अगोदर खऱ्या अर्थाने त्यांच्या कामाचा, महासंघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सोयीसवलतींचा आणि त्या महासंघाच्या यशाच्या बाबतीत सरकारने विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या बाबतीत विचार केला पाहिजे. संचालकाला हा अधिकार द्या, तो अधिकार द्या, कितीही अधिकार दिले तरी त्यांचे गुण जाणार नाहीत. जो अन्याय करावयाचा तो ते करणारच आणि शेतकऱ्यांना लुटण्याचा धंदा कधीही बंद होणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

कोणाला जास्त काम नसते ? या अधिका-यांना केवळ 4 महिने काम असते. बाकीच्या दिवसात हे अधिकारी काय काम करतात ? रुईला बाजारात जास्त भाव असतो तेव्हा ते विकत नाहीत. ज्यावेळी कापसाचे दर वाढलेले असतात त्यावेळी विकत नाही. ज्यावेळी कापसाचे दर पडलेले असतात त्यावेळी विकण्यासाठी जातात आणि त्यातून तोटा दाखविला जातो. म्हणजे हे अधिकारी कोणाच्या भल्यासाठी काम करीत आहेत, शेतक-यांच्या भल्यासाठी काम करीत आहेत की स्वत:च्या भल्यासाठी काम करीत आहेत ? म्हणून मी एकच विनंती करते की, हे विधेयक आता मंजूर करण्याऐवजी विधानसभा व विधानपरिषदेच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे, त्यानंतर ते सभागृहात मंजूर करावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके ( सहकार व पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य कृषी पणन अधिनियम 1963 यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आलेले आहे. आताच या विधेयकावर बोलताना सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी कापूस पणन महासंघाच्या बाबतीत याठिकाणी आपले विचार व्यक्त केले आहेत. मला एवढेच सांगावयाचे आहे की, कापूस पणन महासंघाच्या बाबतीत हे विधेयक आलेले नाही. हे विधेयक कृषी उत्पन्न पणन मंडळ यांच्या माध्यमातून राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीवर नियंत्रण करणे आणि राज्यातील पणन व्यवस्थेच्या विकासासाठी काम करणे हे मुख्यत: या महामंडळाचा उद्देश आहे. सध्या पणन संचालक या महामंडळाचे पदसिध्द व्यवस्थापकीय संचालक आहेत. पणन संचालकावर ही जबाबदारी सोपविलेली आहे. परंतु आपल्याला माहीत आहे की, शासनाने 2007 मध्ये महाराष्ट्र कृषी पणन अधिनियमामध्ये केंद्र शासनाच्या मॉडेल ॲक्टनुसार सुधारणा केलेली आहे आणि त्याची अंमलबजावणी राज्यामध्ये सुरु आहे. त्याच्या अनुषंगाने पूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीची मक्तेदारी होती त्याला स्पर्धा निर्माण व्हावी, शेवटी शेतक-यांना चांगला बाजारभाव मिळावा, या उद्देशाने आता खाजगी बाजार स्थापन करण्यासाठी, शेतकरी बाजार स्थापण्यासाठी परवानगी दिलेली आहे. या कायद्याद्वारे पणन परवाने देण्याची सुरुवात केलेली आहे. कंत्राटी शेतीची परवानगी दिलेली आहे. या सर्व घडामोडीमुळे आज महाराष्ट्रात 9 खाजगी बाजार अस्तित्वात आहेत, 33 शेतकरी बाजाराला व 86 थेट पणन परवाने दिलेले आहेत. पणन संचालकांच्या जबाबदारीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीबरोबर खाजगी क्षेत्रातील शेतकरी बाजार, थेट परवानाधारक आहेत यांच्याबाबतीतील विनियमनाची जबाबदारी मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. महाराष्ट्र कृषी पणन मंडळामार्फत जी विविध विकासाची कामे हात घेतली जातात त्याच्यामध्ये वाढ होत आहे. कांदा चाळ अनुदान योजना, शेत माल तारण योजना, 12 ठिकाणी निर्यात सुविधा केंद्राची स्थापना आणि राज्यातील कृषी मालाला निर्यातीला चालना देणे असे कोकण, मराठवाडा, नाशिक व विदर्भ पॅकेज अंतर्गत कार्यक्रमाचे काम या महामंडळाच्या माध्यमातून मुख्यत: पाहिले जाते. त्याचबरोबर जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून राबविणारा महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प, युनोच्या इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट या विकास संस्थेच्या साहाय्याने....

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 19:05

(श्री. प्रकोश सोळंके...

विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्याग्रस्त अशा 6 जिल्हयामध्ये राबवावयाचा समन्वयीक कृषी विकास प्रकल्प, आशियाई बँकेचा राबवावयाचा कृषी व्यापार विषयक पायाभूत सुविधा प्रकल्प, राज्यामध्ये तीन ठिकाणी टर्मिनल मार्केट उभारणे, या प्रकल्पांचे समन्वयन आणि नियंत्रण करण्याचे काम पणन महामंडळ करते. या पणन महामंडळाकडे प्राधान्याने विकासाची कामे आहेत. कृषी व्यापार आणि त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे काम या महामंडळाचे आहे. पणन संचालकाकडे कृषी उत्पन्न बाजार समिती, खाजगी बाजार समिती यांचे विनियमन करण्याचे काम आहे. विकास कामे एकीकडे आणि संनियंत्रण आणि विनियमन करणे एकीकडे असेल तर त्या कामामध्ये हितसंबंध उभे राहू शकतात. समन्वयीक विकास प्रकल्प हा 600 कोटीचा आहे. विदर्भातील 6 जिल्हयामध्ये हा प्रकल्प उभारावयाचा आहे. महाराष्ट्र समन्वयीक कृषी विकास प्रकल्पाची किंमत 705 कोटी आहे. 33 जिल्ह्याचे कार्यक्षेत्र आहे. . बाजार समितीमध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने हा प्रकल्प आपण राबवित आहोत. आशियाई बँकेच्या माध्यमातून कृषी व्यापार विषयक पायाभूत सुविधा आपण निर्माण करण्याचा प्रकल्प राबवित आहोत. या प्रकल्पाची किंमत 500 कोटी रुपये आहे. तसेच यामध्ये खाजगी क्षेत्रातून 750 कोटी रु.ची गुंतवणूक येईल असे अपेक्षित आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत 5 हजार गोडाऊन्सच्या दुरुस्तीचे काम हाती घेतलेले आहे. टर्मिनल मार्केटचा उल्लेख मी केलेला आहे. ही विकास कामे गतीने व्हावीत यासाठी व्यावसायिक संचालक या महामंडळाला असणे गरजेचे आहे. म्हणून त्याची नेमणूक करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. हे विधेयक विचारात घ्यावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 9 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2010चे वि.प.वि. क्रमांक 9 संमत झाले आहे.

----

नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXII OF 2010

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.)

श्री.गुलाबराव देवकर (कृषि राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 62- महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, 1983 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 62- महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, 1983 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक-62 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक-62 संमत झाले आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

L.A. NO. LXIV OF 2010

( A BILL TO AMEND THE MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY ACT, 1998.)

डॉ.नितीन राऊत (पशुसंवर्धन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 64- महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 64- महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठासंबंधीचे आहे. विद्यापीठाचे कुलगुरु नेमत असताना ते उच्चविद्याविभूषीत असले पाहिजेत. त्यांच्याद्वारे विद्यापीठाचे प्रशासन, विद्यार्थ्यांचे हित, उच्च शिक्षणामधील संशोधन आणि त्याचे विस्तार कार्य इत्यादी बाबी प्रकर्षाने त्याठिकाणी कार्यान्वित केल्या पाहिजेत. विद्यापीठामार्फत राज्यातील शेतकऱ्यांना चांगले ज्ञान कसे मिळू शकेल, शेतमजुरांना चांगला उद्योगधंदा कसा प्राप्त होऊ शकेल यासाठी सुध्दा विद्यापीठाने संशोधनात्मक भूमिका स्वीकारली पाहिजे. पशु आणि मत्स्यव्यवसाय विद्यापीठाचे कुलगुरु अधिक सक्षम, उच्च विद्याविभूषीत आणि विख्यात संशोधक असावेत, त्यांची शैक्षणिक अर्हता आणि अनुभव चांगल्या पध्दतीची असावी यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे. यापूर्वीच्या कायद्यात यासंबंधी तरतूद केलेली नव्हती. ती तरतूद करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक संमत करण्यात यावे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, विधेयक क्र. 64 च्या संदर्भात सभागृहाला माहिती देत असताना माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, उच्चविद्याविभूषित आणि चांगल्या प्रकारची शिक्षा असणारा कुलगुरु असावा. यापूर्वी जे कुलगुरु होते त्यांना मात्र खरी शिक्षेची आता वेळ आली आहे. म्हणून शिक्षण आणि अन्य अर्हता यासंदर्भात जो उल्लेख केला त्याबाबत बोलताना कुलगुरु नेमताना पात्रतेच्या शर्तींमध्ये तरतूद करण्यात आली नव्हती. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो त्या अनुषंगाने मी पु.ल.देशपांडे यांनी वर्णन केलेला प्रसंग सांगू इच्छिते. पु.ल.देशपांडे पुण्याच्या साहित्य सम्मेलनात असे म्हणाले होते की, रस्त्याने जाताना त्यांना एक ट्रक दिसला. तो ट्रक खळखळ करीत चालला होता. ते पाहून सगळे असे म्हणत होते की, किती आवाज होतो आणि या आवाजामुळे काय होत असेल आतील लोकांचे ? अशा पध्दतीने हे असेच चालायचे तशी परिस्थिती या विधेयकाची आहे की काय हा प्रश्न निर्माण होतो. यापूर्वी जे कुलगुरु होते त्यांना पदमुक्त करावे लागले आणि अँटी करप्शनच्या माध्यमातून चौकशी होऊन आता त्या कुलगुरुंना जेलमध्ये जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. हजारो प्रकरणात भ्रष्टाचार त्यांनी केला, मार्कशीट्स बदलल्या. म्हणून शासनाकडून प्रत्येक वेळेस अमुक तरतूद नव्हती, तमुक तरतूद नव्हती म्हणून सभागृहात विधेयक आणले जाते. यापूर्वी आम्ही सभागृहात वारंवार मागणी केली अशा प्रकारे वेळोवेळी बदल करण्यापेक्षा एखादा मॉडेल ॲक्ट शासनाने तयार करावा. हे सुध्दा डॉ. सरकटे यांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर ही वेळ आली आहे, ही बाब शासनाला शोभादायक नाही. माननीय मंत्री महोदय मात्र शासनाची तोकडी बाजू सांगणार नाही पण या माध्यमातून एखादा सुंदर नियम आपण बनवित आहोत या भ्रमात शासनाने राहू नये. कारण याअगोदरच्या व्यक्तिने केलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात पुन्हा काय करावयाचे यासाठी हा बदल करण्याचा प्रयत्न आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधून माझे भाषण संपविते.

-------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मागील कुलगुरुंच्या संदर्भात वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने छापून आलेले आहेत. या कायद्यात बदल करीत असताना मात्र सांगण्यात आले की, शेतकऱ्याच्या घरापर्यंत हे सर्व पोहचविणार असा कुलगुरु असावा पण यापूर्वीच्या कुलगुरुने काय केले त्याचे डिटेल्स मी वाचणार नाही. या निमित्ताने एकच विनंती मात्र मी करणार आहे की, ज्या पध्दतीने देवणी वगैरे गायींच्या जाती प्रसिध्द होत्या तो गोवंश आता बुडत चालला आहे. उदगीरला जे उपकेंद्र निर्माण झाले आहे तेथील गायींची परिस्थिती पाहिली तर रडायला येते. आपल्याला कोणता माणूस नेमायचा तो नेमा परंतु राज्यातील पशुधन जे संपायला लागले आहे त्याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. म्हणून या सुधारणेच्या निमित्ताने माझी अशी विनंती आहे की, आमचा गोवंश जगला पाहिजे तसेच ज्या जाती संपू लागल्या ती जात कशी जगेल यासाठी तरतूद करता येईल इ. गोष्टीचा अंतर्भाव या विधेयकात करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत ( दुग्धविकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी या विधेयकाच्या निमित्ताने काही गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, कुलगुरुंची नेमणूक ही कुलपतींमार्फत होत असते. त्या त्या क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीचे जे संशोधक असतात त्यांचा कुलगुरु म्हणून सुध्दा यामध्ये समावेश केला जात असतो. रिसर्च इंस्टिट्यूट कर्नाल, इंडियन पशुवैद्यक संस्था, जत तसेच केंद्रीय मत्स्य व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई या ठिकाणचे तज्ञांची कुलगुरु म्हणून नेमणूक केली जात असते. विद्यार्थ्यांचे शिक्षण योग्य प्रकारे व्हावे असा त्यामागील उद्देश असतो. शेती व्यवसायाला शाश्वतता देण्यासाठी दुग्धव्यवसायाचे फार मोठे योगदान राहिलेले आहे. राज्यात पुन्हा एकदा धवल क्रांती घडवून आणण्यासाठी व्यापक प्रयत्नांची गरज आहे व ही गरज लक्षात घेऊन विद्यापीठाचे संशोधनाचे, विस्ताराचे काम चांगल्या प्रकारे चालावे, शेतक-यांना उपयोगी व्हावे म्हणून या ठिकाणी हे विधेयक मांडलेले आहे ते सभागृहाने संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7, (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी आपल्या अुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 64 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 64 संमत झाले आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार दिनांक 16 जुलै,2010 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.30 ते 11.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर 11.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृहाची बैठक 7 वाजून 24 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 16 जुलै, 2010 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

अस्थारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही